


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, गुरुवार २२ जानेवारी २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०




# कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, ठाण्यात महायुतीचाच महापौर होणार



**मुंबई/प्रतिनिधी :** महानगरपालिकांमधील सत्तासंघर्ष, मित्रपक्षांतील कुरघोड्या आणि पडद्यामागील राजकीय हालचालींनंतर अखेर महायुतीच्या दोन्ही पक्षांनी आपापल्या तलवारी म्यान करत एकत्र सत्ता स्थापन करण्याची तयारी सुरू केली आहे. कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर आणि ठाणे या तिन्ही महत्त्वाच्या महानगरपालिकांमध्ये दोन्ही पक्ष मिळून महापौर बसवतील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोस दौ-यावरून परतल्यानंतर यावर अंतिम निर्णय जाहीर केला जाणार आहे, अशी माहिती भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिली.

मुख्यमंत्री फडणवीस मुंबईत परतल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत संयुक्त बैठक घेणार आहेत. या बैठकीत तिन्ही महानगरपालिकांतील सत्तावाटप, महापौरपद आणि इतर महत्त्वाच्या पदांबाबत अंतिम रूपरेषा ठरवली जाणार आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी यासंदर्भात माहिती देताना, तीनही महानगरपालिकांमध्ये महायुतीला स्पष्ट जनादेश मिळाला असून, त्या जनादेशानुसारच महायुतीची सत्ता स्थापन होईल, असे स्पष्ट केले. ठाणे महानगरपालिकेत शिवसेनेने १३१ पैकी ७५ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवले असले, तरी भाजपकडून अडीच वर्षांसाठी महापौरपद देण्याची जोरदार मागणी करण्यात आली. भाजप आमदार निरंजन डावखरे यांनी महापौर, स्थायी समिती अध्यक्ष आणि सभागृह नेतेपदासाठी आग्रही भूमिका घेतल्याने महायुतीत तणाव निर्माण झाला होता. सन्मानजनक वाटा न मिळाल्यास दुस-या भूमिकेचा पर्याय खुला असल्याचे सूचक विधानही त्यांनी केले होते. दुसरीकडे, कल्याण-डोंबिवली महापालिकेत शिवसेना (५३) आणि भाजप (५०) हे दोन्ही पक्ष बहुमतापासून दूर असतानाही आपापला महापौर बसवण्यासाठी प्रयत्नशील होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यादृष्टीने प्रयत्न सुरू केले होते. त्यांनी उबाठाचे चार नगरसेवक आपल्याकडे वळवून मनसेचाही पाठिंबा मिळवला होता. तर, उल्हासनगर महापालिकेत वंचित बहुजन आघाडीच्या दोन नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठिंब्याचे पत्र दिल्याने शिवसेना आघाडीने बहुमताचा आकडा गाठला होता. मात्र, महायुती म्हणून निवडणूक एकत्र लढवली असताना, जनादेशाचा अशाप्रकारे अपमान करणे भविष्यातील राजकारणासाठी घातक असल्याने दोन्ही पक्षांनी समन्वयातून तोडगा काढण्याचा निर्णय घेतला आहे.

## जिल्हा परिषद निवडणूक कार्यक्रम लांबणीवर ?

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी आरक्षणाचा प्रश्न अजूनही प्रलंबित आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणूक घेण्यासाठी न्यायालयाने अनुमती दिली असली तरी सर्व निवडणुका अंतिम निर्णयाच्या अधीन असतील, असे न्यायालयाने यापूर्वी स्पष्ट केले आहे. आज या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात पुन्हा सुनावणी होणार होती मात्र हे प्रकरण पोहोचू न शकल्यामुळे ही सुनावणी पुढे ढकलण्यात आली. यामुळे जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या दुस-या टप्प्यातील निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत. यापूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पहिल्या टप्प्यात नगरपालिका आणि नगरपरिषदेच्या निवडणुका पार पडल्या, त्यानंतर महानगरपालिकेच्या निवडणुका पार पडल्या. त्यानंतर जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका पूर्ण होणे अपेक्षित होते मात्र ज्या जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्ये ओबीसी आरक्षण मर्यादेचा प्रश्न नाही त्या निवडणुका पूर्ण करण्यासाठी कालावधी वाढवून द्यावा, अशी मागणी राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयाकडे केली होती. त्याला मान्य करता न्यायालयाने १५ फेब्रुवारी पर्यंत मुदत दिली आहे. मात्र राज्य निवडणूक आयोगाने ही मुदत ज्या जिल्हा परिषदेमध्ये आणि पंचायत समित्यांमध्ये ओबीसी आरक्षणाचा प्रश्न नव्हता त्याबाबत मागितली होती.



त्यामुळे उर्वरित २० जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गत येणा-या पंचायत समित्या यांच्याबाबत निर्णय काय लागेल, हे बुधवारच्या सुनावणीतून माहिती होउ शकले असते मात्र सुनावणी झाली नाही. त्यामुळे याबाबतचा निर्णय पुन्हा एकदा लांबणीवर पडला. परिणामी उरलेल्या २० जिल्हा परिषद आणि त्या अंतर्गत येत असलेल्या पंचायत समित्यांचा निवडणुकीचा कार्यक्रमही लांबणीवर पडला आहे.

**काय होता अर्जदारांचा दावा?**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागास प्रवर्गांच्या आरक्षणाला ५० टक्क्यांची मर्यादा आखून देत सर्वोच्च न्यायालयाने २०२१ मध्ये निकाल दिला होता. राज्य सरकारने ओबीसी प्रवर्गाला दिलेल्या २७ टक्के आरक्षणामुळे राज्यातील अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ५० टक्के आरक्षण मर्यादेचे उल्लंघन झाले आहे. काही ठिकाणी आरक्षण ७० टक्क्यांवर पोहोचले आहे. हा न्यायालयाच्या आदेशाचा अवमान असल्याचा दावा करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्-यात आली होती. यावर आज सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जायमल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल पांचोली यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली.

## महापालिका निवडणुकीचा फार्म्युला झेडपीमध्ये राबविणार!

### ◆ जानेवारीचा हप्ता जमा होणार ◆

**मुंबई :** राज्य सरकारची महत्त्वाकांक्षी ठरलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा निधी न मिळाल्याने लाडक्या बहिणी सध्या नाराज आहेत. अशातच त्यांच्यासाठी गुड न्यूज आहे. महापालिका निवडणुकीच्या आधी लाडक्या बहिणींना डिसेंबरचा हप्ता मिळाला होता. तोच फार्म्युला आता राज्य सरकार जिल्हा परिषद निवडणुकीत वापरणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली. जिल्हा परिषद निवडणुकीच्या आधी लाडक्या बहिणींच्या खात्यात १५०० रुपये जमा होणार असल्याची माहिती आहे. शेतक-यांना नमो शेतकरी योजनेचे केंद्र सरकारकडून दोन हजार रुपये तर राज्य सरकारकडून दोन हजार रुपये मिळणार आहेत. राज्यात नमो शेतकरी योजनेचे ९० ते ९४ हजार लाभार्थी आहेत. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेने विधानसभा निवडणुकीपूर्वी महिला वर्गामध्ये मोठा उत्साह निर्माण केला होता. आता राज्यातील अनेक जिल्ह्यांमधील हजारो महिलांना गेल्या दोन महिन्यांपासून हप्ता मिळालेला नाही, त्यामुळे लाडक्या बहिणी संभ्रमात आहेत. राज्यात दोन-तीन महिन्यांपासून स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका सुरू आहेत. आचारसंहितेमुळे लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात पैसे येणार नाहीत असे वाटत होते. मात्र, डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच ३१ डिसेंबरला लाडक्या बहिणींना नोव्हेंबर महिन्याचा हप्ता मिळाला. त्यानंतर डिसेंबर आणि जानेवारी या दोन्ही महिन्यांचा एकत्रित हप्ता मकर संक्रांतीच्या मुहूर्तावर खात्यात जमा होईल, असा दावा करण्यात येत होता. महानगरपालिका निवडणुकीवर परिणाम होईल असे सांगत कॉंग्रेसने तातडीने निवडणूक आयोगाकडे धाव घेतली. त्यानंतर निवडणूक आयोगाने डिसेंबर महिन्याचा हप्ता देण्यास मंजुरी दिली. डिसेंबरचा हप्ता मिळाला पण जानेवारी महिन्याचा हप्ता देण्यास नकार देण्यात आला. पण अद्यापही अनेक लाडक्या बहिणींचा नोव्हेंबर आणि डिसेंबरचा हप्ता रखडला आहे. त्यासाठी लाडक्या बहिणी रस्त्यावर उतरल्या आहेत. लवकरच जानेवारी महिन्याच्या हप्त्यासोबतच नोव्हेंबर आणि डिसेंबरची थकित रक्कम (एकूण ४५०० रुपये) जमा होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मात्र, या संदर्भात अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे लाभार्थ्यांमध्ये अस्वस्थता कायम आहे.




## आणीबाणीतील बंदीजनांचा सन्मान

**मुंबई :**राष्ट्रीय आणीबाणीला विरोध करताना तुरूंगवास भोगलेल्या बंदीजनांना आता प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन आणि स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात येणा-या शासकीय समारंभात निमंत्रित म्हणून सहभागी होण्याचा मान मिळणार आहे. सामान्य प्रशासन विभागाने बुधवारी याबाबतचे शासन परिपत्रक जारी केले.राज्यात प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी, महाराष्ट्र दिन -१ मे आणि स्वातंत्र्यदिन १५ ऑगस्ट या राष्ट्रीय सणांचे कार्यक्रम ध्वजारोहण आणि ध्वजवंदन करून साजरे केले जातात. या शासकीय कार्यक्रमात लोकप्रतिनिधी आणि इतर मान्यवरांना निमंत्रित केले जाते. आता १९७५ ते १९७७ या दरम्यान देशात लागू झालेल्या आणीबाणीला विरोध करताना ज्यांना कारावास भोगावा लागला, अशा व्यक्तींचा सन्मान म्हणून त्यांना जिल्हा, तालुका आणि ग्राम स्तरावर आयोजित केल्या जाणा-या प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन आणि स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात सन्मानपूर्वक निमंत्रित करावे, असे परिपत्रकात म्हटले आहे. संबंधित विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिका-यांनी या सूचेनानुसार योग्य ती कार्यवाही करण्याबाबत संबंधिताना अवगत करावे, असेही परिपत्रकात नमूद केले आहे. दरम्यान, राज्य सरकारने या पूर्वी आणीबाणीत कारावास भोगलेल्या बंदीजनांना महिना २० हजार रुपये मानधन देण्याचा निर्णय घेउन त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे.



## हवाईदलाचे ट्रेनी विमान तलावात कोसळले

**प्रयागराज :** उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये आज दुपारी भारतीय हवाईदलाचे एक प्रशिक्षण विमान कोसळून अपघात झाला. हे विमान शहरानजीक असलेल्या केपी कालेजमागील एका जलपर्णीने भरलेल्या तलावात कोसळले. वैमानिकांच्या प्रसंगावधानामुळे दाट लोकवस्तीच्या भागात कोसळण्याऐवजी विमान तलावात पडल्याने मोठी जीवितहानी टळली आहे.उड्डाण केल्यानंतर काही वेळातच विमानाचे संतुलन बिघडले. विमानाचे इंजिन निकामी झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. राकेटसारखा मोठा आवाज ऐकू आल्याने परिसरातील नागरिक घटनास्थळी धावले. विमानात दोन वैमानिक होते, त्यांनी तातडीने पॅराशूटच्या साहाय्याने विमानातून उडी घेतली. तलावात जलपर्णीचे दाट थर असल्याने विमान पाण्यात बुडाले नाही आणि वैमानिकांनाही सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले. ज्या ठिकाणी हा अपघात झाला, तिथे केपी कॉलेजमध्ये प्रात्यक्षिक परीक्षा सुरू होती आणि आसपास मोठी वस्ती आहे. वैमानिकांनी विमान रिकाम्या तलावाकडे वळवले आणि रेड क्रॅश सिग्नल दिला, ज्यामुळे जमिनीवरील नागरिक सावध झाले. दोन्ही वैमानिकांना किरकोळ दुखापत झाली असून त्यांना लष्करी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



## आज महापौरपदासाठी सोडत

### मुंबईच्या सोडतीकडे सर्वांचे लक्ष सत्ता स्थापनेच्या घडामोडींना येणार वेग

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील २९ महापालिकांच्या महापौरपदाच्या आरक्षणासाठी आज गुरूवारी मंत्रालयात सोडत काढली जाणार आहे. महापौरपदाच्या पहिल्या अडीच वर्षाच्या कालावधीसाठी ही सोडत आहे. या सोडतीनंतर महापौर पदाची लाटरी कुणाला लागणार, हे स्पष्ट होईल. महापौर पदाच्या आरक्षणात स्पष्टता आल्यानंतर महापालिकेतील सत्ता स्थापनेच्या घडामोडीना वेग येणार आहे. आजच्या आरक्षण सोडतीत सर्वाधिक प्रतिष्ठेच्या मानल्या जाणा-या मुंबई महापौरपदाच्या सोडतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी १५ जानेवारीला मतदान होउन दुस-या दिवशी निकाल जाहीर झाले. १६ जानेवारीला निकाल घोषित झाल्यापासून मुंबई, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगरच्या महापौर पदासाठी भाजप आणि शिवसेना शिंदे गटात रस्सीखेच सुरू आहे. या शिवाय भिवंडी, चंद्रपूर येथेही महापौरपद पटकावण्यावरून कॉंग्रेस, शिवसेना ठाकरे गट यांच्यात चढाओढ लागली आहे. या पार्श्वभूमीवर आज महापालिकांच्या महापौर पदाची सोडत निघत आहे. नगर विकास खात्याच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी सकाळी ११ वाजता मंत्रालयातील परिषद सभागृहात महापौर पदाची आरक्षण सोडत निघेल. या सोडतीत कोणत्या महापालिकेतील महापौर पद आरक्षित झाले आणि कोणत्या महापालिकेत खुल्या प्रवर्गातील महापौर बसणार हे स्पष्ट होईल. नगर विकास विभागात सध्या महापौर आरक्षण सोडतीची जोरात तयारी सुरू आहे. नव्याने गठीत करण्यात आलेल्या जालना आणि इचलकरंजी महापालिका वगळता अन्य महापालिकांमध्ये कार्यकाळ संपण्याआधी शेवटचे महापौर पदाचे आरक्षण कधी लागू झाले आणि त्याची मुदत कधी संपली, याची माहिती गोळा करण्यात आली आहे. महापौर पदाचे आरक्षण चक्राकार पद्धतीने काढले जाईल त्यामुळे या आधीचे संबंधित महापालिकेचे आरक्षण बाजूला ठेवण्यात येईल. आरक्षणासाठी २०११ च्या जनगणनेचा आधार घेण्यात आला.

**प्रथम एससी, एसटीसाठी होणार आरक्षण सोडत**

सुरुवातीला अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीसाठी आरक्षण सोडत निघेल. त्यानंतर नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी आरक्षण सोडत काढली जाईल. यात महिलांसाठी ५० टक्के आरक्षण असणार आहे, असेही या अधिका-याने सांगितले.

**या महापालिकांसाठी आज आरक्षण सोडत**

मुंबई, नवी मुंबई, ठाणे, मिरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, वसई-विरार, भिवंडी -निजामपूर, पनवेल, नाशिक, अहिल्यानगर, मालेगाव, धुळे, जळगाव, नागपूर, अकोला, अमरावती, चंद्रपूर, पुणे, पिंपरी-चिंचवड, सांगली, कोल्हापूर, इचलकरंजी सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, जालना, लातूर, नांदेड.

## विनोद तावडे केरळचे प्रभारी

### आशिष शेलार यांच्याकडे महत्त्वाची जबाबदारी





**मुंबई/प्रतिनिधी :** भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर नितीन नबीन यांनी संघटनात्मक पातळीवर निर्णय घेण्यास सुरूवातही केली आहे. देशभरातील विविध राज्यात होणा-या निवडणुकांची तयारी त्यांनी सुरू केली आहे. त्यासाठी महाराष्ट्रातील दोन बड्या नेत्यांवर महत्त्वाच्या जबाबदा-या सोपवण्यात आल्या आहेत. केरळ विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातील भाजपचे ज्येष्ठ नेते व राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांची प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. चंदीगड महापौर पदाच्या निवडणुकीसाठीही विनोद तावडे यांनाच प्रभारी म्हणून नेमण्यात आले आहे.

केरळ विधानसभा निवडणूक काही महिन्यांवर आली आहे. केरळमध्ये भाजपाला जास्त वाव नाही. विनोद तावडे यांना संघटनकौशल्य असणारा नेता म्हणून ओळखले जाते. बिहार आदी राज्यांत त्याची प्रचिती त्यांनी दिली आहे. या पार्श्वभूमीवर केरळसारख्या कठीण राज्याची जबाबदारी त्यांना देण्यात आली आहे.

***आशिष शेलार यांच्याकडे तेलंगणा*-** मंत्री आणि मुंबई भाजपाचे माजी अध्यक्ष आशिष शेलार यांची नियुक्ती तेलंगणामधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी निवडणूक प्रभारी म्हणून करण्यात आली आहे. नुकत्याच पार पडलेल्या मुंबई महापालिका निवडणुकांत शेलार यांनी प्रभावी कामगिरी बजावली होती. संघटन, प्रशासन, आक्रमकता, जनसंपर्क ही शेलार यांची खासियत आहे. मुंबईतील भाजपा आमदार संजय उपाध्याय यांच्याकडेही बंगळुरू महापालिका निवडणुकांचे सह-प्रभारी म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

## हवामानात मोठा बदल; ढगाळ वातावरणासह थंडी

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यासह देशात वातावरणात मोठा बदल होताना दिसत आहे. कधी पाउस, थंडी तर मध्येच उकाडा अशी स्थिती आहे. उत्तरेकडे कडाक्याची थंडी आहे. मात्र, असे असतानाही राज्यात म्हणावा तेवढा गारठा नक्कीच नाही. सकाळी आणि संध्याकाळी थोडी थंडी जाणवत आहे, दुपारी उकाडा जाणवतो. वर्षाच्या पहिल्याच दिवशी मुसळधार पाउस राज्यात झाला आणि तेव्हापासून थंडी गायब झाली. जानेवारी महिन्याच्या तुलनेत डिसेंबर महिन्यात थंडी जास्त होती. जानेवारी महिन्यातही थंडी कायम राहण्याचा भारतीय हवामान विभागाचा अंदाज होता. मात्र, प्रत्यक्षात उलट झाले आणि उकाडा जाणवत आहे. दुसरीकडे सध्या राज्यातील काही शहरांत प्रचंड वायुप्रदूषण वाढल्याचे बघायला मिळत आहे. कडाक्याची थंडी पडली. पुढील काही दिवसांत राज्यातील तापमानात मोठे बदल होण्याचे संकेत आहेत. यामुळे आरोग्याच्या काही समस्या जाणवू शकतात.पुण्यात पुढील दोन दिवस हवामान स्थिर राहण्याची शक्यता आहे. गेल्या काही दिवसांपासून शहरातील किमान आणि कमाल तापमानात मोठी वाढ झाली. त्यामुळे शहरात उन्हाचा चटका वाढला होता. मात्र, सोमवारी तापमानात लक्षणीयरीत्या घट झाली आहे परिणामी गारठा आवडला असून पुढील दोन दिवस हवामान स्थिर राहण्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे. राज्यातील सर्वांत नीचांकी तापमानाची नोंद निफाडमध्ये झाली. ७.९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद निफाडमध्ये झाली. गोंदियात ९.८ अंश सेल्सिअस तापमान होते. राज्यात गारठा कमी होण्याची शक्यता आहे. राज्यातील अनेक भागात आज ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता आहे. राज्यात सध्या निफाड, गोंदिया आणि धुळ्यात गारठा कायम राहण्याची शक्यता आहे. देशातील अनेक भागात थंडी कमी-जास्त होताना दिसत आहे. मात्र, नुकत्याच भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानंतर टेन्शन वाढल्याचे बघायला मिळत आहे. देशातील काही भागात पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला.

## महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावरील सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी लांबणीवर

**नवी दिल्ली :** महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावरील सर्वोच्च न्यायालयात बुधवारी सुनावणी होणार होती. मात्र, ती पुढे ढकलण्यात आली. न्यायालयात फक्त दोन न्यायाधीशांचे खंडपीठ उपलब्ध असल्यामुळे ही सुनावणी होउ शकली नाही. सीमाप्रश्-नासारख्या घटनात्मक आणि आंतरराज्यीय प्रकरणाची सुनावणी तीन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर होणे आवश्यक असल्याने प्रकरण पुढे ढकलण्यात आले. विशेष म्हणजे, तब्बल आठ वर्षांनंतर महाराष्ट्र सरकारने दाखल केलेल्या मूळ दाव्यावर सविस्तर सुनावणी होणार होती. या सुनावणीकडे सीमावासीयांचे लक्ष लागून रहिले होते. वरिष्ठ विधितज्ज्ञ ॲड. सी. एस. वैद्यनाथन आणि ॲडव्होकेट ऑन रेकार्ड शिवाजी जाधव यांनी सर्वोच्च न्यायालयात सीमाप्रश्नी लवकरात लवकर सुनावणी व्हावी, अशी विनंती केली होती. न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती आलोक आराध्ये यांनी ही विनंती मान्य करून बुधवारी सुनावणी घेण्यास सहमती दर्शवली होती. महाराष्ट्र सरकारने २००४ साली सर्वोच्च न्यायालयात हा दावा दाखल केला होता. त्यानंतर अनेक वर्षे विविध कारणांमुळे प्रत्यक्ष मुद्यावर सुनावणी होत नव्हती. अनेक लढे, आंदोलने करूनही न्याय मिळत नसल्यामुळे २००४ मध्ये महाराष्ट्र सरकारने सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयात दाखल केला आहे.


## मनसेची शिंदेसेनेला साथ!

**मुंबई/प्रतिनिधी :** एकत्र आलो आहोत ते एकत्र राहण्यासाठी अशी घोषणा ठाकरे बंधूंनी केली होती; परंतु निवडणुकीत अपयश आल्यानंतर विघटनाला सुरुवात झाली आहे. कल्याण-डोंबिवली महापालिकेतील निवडून आलेले ४ नगरसेवक बेपत्ता झाल्याने आधीच ठाकरे गटात अस्वस्थता असताना तेथे मनसेने एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला पाठिंबा जाहीर करून आणखी एक धक्का दिला आहे. आता मुंबईत मनसे उद्धव ठाकरे यांच्या सोबत राहणार की महायुतीत जाणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. मनसेच्या या निर्णयावर संताप व्यक्त करताना नेतृत्वाने त्या स्थानिक नेत्यांवर कारवाई केली पाहिजे, अशी मागणी ठाकरे गटाचे नेते संजय राउत यांनी केली. कल्याण-डोंबिवली महापालिकेत शिवसेना भाजप युतीला स्पष्ट बहुमत मिळाले असले तरी एकहाती सत्ता मिळवण्यासाठी युतीत जोरदार रस्सीखेच सुरू आहे. स्वबळावर सत्ता काबीज करण्यासाठी शिवसेनेने फोडाफोडी सुरू केली असून ठाकरे गटाचे ४ नगरसेवक गळाला लावले आहेत. आता मनसेनेही अधिकृतपणे शिवसेना शिंदे गटाला पाठिंबा जाहीर केला आहे. कोकण विभागीय आयुक्तालयात गट नोंदणीच्या वेळी शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याबरोबर मनसेचे स्थानिक नेते राजू पाटील हे उपस्थित होते. मनसेने विकासाच्या मुद्यावर आम्हाला पाठिंबा दिल्याचे श्रीकांत शिंदे यांनी सांगितले. मुंबई महापालिका निवडणुकीत युती करूनही मनसेला फारसा फायदा झालेला नाही. शिवसेना ठाकरे गटाचे ६५ नगरसेवक निवडून आले तर मनसेचे केवळ ६ नगरसेवक निवडून आले. २०१७ ला स्वबळावर लढून मनसेला ७ जागा मिळाल्या होत्या. या वेळी युती करून मनसेचे संख्याबळ एकने कमी झाले. युती केल्यामुळे पक्षातील अनेक नेते नाराजही झाले होते. मनसेचे नेते राजू पाटील यांनी शिवसेना शिंदे गटाला पाठिंबा जाहीर केला असला तरी त्याला पक्ष नेतृत्वाची संमती असल्याशिवाय ते असा निर्णय घेण्याची शक्यता नाही. राज ठाकरे यांना पूर्वकल्पना देउनच ही घोषणा केली असणार, असे मानले जात आहे.



## नागपुरात 'भारताच्या वाघांची' डरकाळी! किवींचा धुव्वा उडवत टीम इंडियाचा दमदार विजय; मालिकेत 1-0 ने आघाडी

**नागपूर/प्रतिनिधी :**भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये सुरू असलेल्या ३ टी-२० सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना नागपूरच्या विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर पार पडला. या सामन्यात न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाकडून अभिषेक शर्माने सुरूवातीला आणि शेवटी रिंकू सिंगने दमदार फलंदाजी करून २३८ धावांचा डोंगर उभारण्यात मोलाची भूमिका बजावली. या धावांचा पाठलाग करताना ग्लेन फिलिप्स आणि मार्क चॅपमन यांनी पूर्ण जोर लावला. पण शेवटी भारतीय संघाने हा सामना ४८ धावांनी जिंकून मालिकेत १-० ने आघाडी घेतली आहे. भारतीय संघाने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना न्यूझीलंडला सुरूवातीलाच मोठा धक्का बसला. डेव्हान कान्वे शून्यावर माघारी परतला. त्यानंतर रचिन रवींद्रनेही १ धाव करून पॅव्हेलियनची वाट धरली. सलामीला आलेल्या टीम राबिन्सनने १५ चेंडूत २१ धावा करून संघाचा डाव सांभाळण्याचा प्रयत्न केला. पण तो देखील बाद होउन माघारी परतला. त्यानंतर ग्लेन फिलिप्स आणि मार्क चॅपमनने तुफान फटकेबाजी करून न्यूझीलंडला सामन्यात पुनरागमन करून दिलं. ग्लेन फिलिप्सने ४० चेंडूत ७८ धावांची तुफानी खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने ४ चौकार आणि ६ षटकार खेचले. तर चॅपमनने २४ चेंडूत ३९ धावा केल्या.





# वलगावमध्ये दोन गटात राडा
## -घरासमोर ठेवलेली दुचाकी जाळली

**अमरावती/ प्रतिनिधीः-**
वलगाव येथील जुना बस स्टॅन्ड चौकात मंगळवारी रात्री दोन तरुणांमध्ये बाचाबाची व शिवीगाळ झाली होती. यानंतर आरोपीने असलम शाहा अजीम शाहा (वय ३०,बाजारपुरा, वलगांव) यांच्या घरासमोर ठेवलेली त्याची दुचाकी एमएच २७ ईडी ४०४७ व त्यांच्या राहते घराचा समोरचा भाग जाळण्यात आला. आग लागल्याची लक्षात येताच घरातील लोकांनी आग आटोक्यात आणण्यास सुरुवात केली व घटनेची माहिती वलगांव पोलिसांना दिली. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेताच तात्काळ घटनास्थळी अग्निशमन दलाच्या जवानासोबत पोलीस ही पोहोचले. त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली व पंचनामा केला. परिसरात लागलेल्या सीसीटीव्ही फुटेज व मोबाईल लोकेशन च्या माध्यमातून आरोपीचा शोध घेतल्या जात आहे. माहितीनुसार, मंगळवारच्या रात्री आरोपी आणि असलम शाहा यांच्यात वलगाव येथील बस स्टँड चौकात बाचाबाची व शिवीगाळ झाली होती. त्यातून हा प्रकार घडला असावा असा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.आरोपी पेट्रोल पंप वरून बॉटल मध्ये पेट्रोल घेताना सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये कैद देखील झाला आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून प्रक्रिया सुरू केली आहे. पुढील तपास वलगांव पोलीस करत आहे.



# भाजप उमेदवार अपर्णा ठाकरेंना मिळालेल्या कमी मतदानावर आक्षेप
## -ईव्हीएम मशीनवर शंका, अमोल ठाकरे यांची तक्रार

**अमरावती/ प्रतिनिधीः-**
स्थानिक प्रभाग क्रमांक १८ राजापेठ - संत कवंरराम येथून भाजपा, उमेदवार एड.अपर्णा ठाकरे यांना २ हजार पेक्षा कमी मतं मिळू शकत नाही असा असा दावा निवडणूक प्रतिनिधी अमोल ठाकरे यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी मनपा निवडणूक अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांना तक्रार दिली आहे. त्यांनी ईव्हीएम मशीन मध्ये तांत्रिकी गडबड असल्याचा आरोप केला आहे. त्यांनी सांगितले आहे की, प्रभागाच्या एका मतदान केंद्रावर अपर्णा ठाकरे यांना ६७ मतं मिळाले आहे. त्यांच्यानुसार या केंद्रावर त्यांना अधिक मतं मिळाले असावे. यामध्ये त्यांनी प्रभागातील शिव इंग्लिश स्कूल केंद्राचा उल्लेख केला आहे. त्यांच्यानुसार या केंद्रावर त्यांना १४० मतं मिळणे गरजेचे होते. संपूर्ण प्रभागामध्ये २ हजार मतं अपर्णा ठाकरे यांना मिळाले असते असा विश्वास त्यांनी वर्तविला आहे. अमोल ठाकरे यांनी म्हटले आहे की ईव्हीएम मशीन मध्ये तांत्रिक गडबड असल्यामुळे त्यांच्यावर अन्याय झालेला आहे. त्यांनी निवडणूक आयोगाला आवाहन करत पूर्ण तपास करण्याची मागणी केली आहे. आणि मतदान बॅलेट पेपर ने घेण्याची मागणी केली आहे. यामध्ये जर अपर्णा ठाकरे यांना २ हजार मतं नाही मिळाले तर निवडणूक आयोगाचा दंड भरण्यास ते तयार आहे असेही त्यांनी म्हटले.

# १ व १० वरिल उर्वरित

### दारूच्या नशेत मित्रानेच केली

विरुला आवाज दिली मात्र तो उठला नाही. यामुळे तो घाबरला आणि त्याने धावत जाऊन आपले मालक पंकज वानखडे यांना संपूर्ण घटनाक्रम सांगितला. हे ऐकून वानखडे यांच्या पाया खालची जमीन सरकली. त्यांनी तात्काळ पोलिसांना याची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळावर जाऊन पंचनामा केला आणि मृतदेह पोस्टमार्टम साठी पाठवला.आरोपी भोंदू कवडे याला पोलिसांनी अटक केली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.पुढील तपास परतवाडा पोलिस करीत आहेत.

### उमेश कोल्हे हत्याकांडाच्या

अपमान केल्याचा बदला घेण्यासाठी, आरोपींनी मुख्य आरोपीच्या नेतृत्वाखाली एक दहशतवादी टोळी तयार केली होती. त्यांनी कोल्हे यांची निर्घृण हत्या करून, शर्मा यांच्या टिप्पणीला पाठिंबा दिला होता की नाही याची पर्वा न करता, सामान्य जनतेच्या मनात भीती निर्माण करण्याचा प्रयत्न केला, असे सकृतदर्शनी आपल्याला वाटत असल्याचेही न्यायालयाने आदेशात म्हटले. निःसंशयपणे, आरोप केलेला गुन्हा गंभीर आणि घृणास्पद स्वरूपाचा आहे, अशी टिप्पणीही न्यायालयाने केली.तसेच, या सकृतदर्शनी निष्कर्षावर पोहोचल्यानंतर, आम्ही युसूफ याच्या बाजूने जामिनाचा अधिकार वापरण्यास इच्छुक नाही, असेही न्यायालयाने त्याला दिलासा नाकारताना नमूद केले. युसुफ याच्या याचिकेनुसार, तो या हत्येमध्ये सामील नव्हता आणि त्याने फक्त इतर डॉक्टरांना कोल्हे यांच्या दुकानातून औषधे न खरेदी करण्यास सांगितले होते. दरम्यान आता उच्च न्यायालयाने आरोपी डॉक्टर युसुफ खान यांची याचिका फेटाळली.

### किशनराव हुंडीवाले हत्याकांडाचा

अधिक कागदपत्रांचे सविस्तर आरोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले होते.

सुनावणीदरम्यान काही आरोपींच्या सहभागाबाबत ठोस व विश्वासार्ह पुरावे नसल्याचे निदर्शनास आल्याने विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी त्यांची निर्दोष मुक्तता करण्याची विनंती न्यायालयाकडे केली होती.

बुधवारी झालेल्या अंतिम सुनावणीत न्यायालयाने श्रीराम गावंडे यांच्यासह रणजीत गावंडे, विक्रम गावंडे, सूरज गावंडे, धीरज गावंडे, विशाल तायडे, सतीश तायडे, प्रतीक तोंडे, मयूर अहीर आणि दिनेश राजपूत या दहा आरोपींना दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. तर प्रवीण श्रीराम गावंडे, मंगेश गावंडे, दिपाली गावंडे, नम्रता गावंडे आणि शेख साबीर यांना निर्दोष मुक्त करण्यात आले.

या निकालामुळे हुंडीवाले कुटुंबीयांसह गवळी समाजात समाधान व्यक्त होत असून न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, या निर्णयाविरोधात आरोपी पक्षाकडून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात अपील दाखल करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे.

### रिद्धी ज्वेलर्स घोटाळा : महिलांचा

होता.

प्राप्त माहितीनुसार, रिद्धी ज्वेलर्सकडे अनेक नागरिकांनी सोने गहाण ठेवले होते, काहींनी दागिने बनवण्यासाठी सोने दिले होते तर काहींनी मोठ्या प्रमाणात रोख रक्कम जमा केली होती. मात्र अचानक दुकान बंद करून आरोपी सतीशचंद्र बहाड हा फरार झाला होता, त्याने सुमारे २० कोटी रुपयांहून अधिक रोख रक्कम तसेच कोट्यवधी रुपयांचे सोने हडप केल्याचा गंभीर आरोप तक्रारदारांनी केला आहे.या प्रकरणात महिला, शेतकरी, मजूर, व्यापारी अशा विविध स्तरातील नागरिकांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. काही महिलांनी आपल्या संसारातील सर्व दागिने गहाण ठेवले होते, तर काहींनी मुलींच्या लग्नासाठी, घरबांधणीसाठी अथवा वैद्यकीय खर्चासाठी पैसे जमा केले होते. आज हे सर्वजण आर्थिक संकटात सापडले आहेत त्यामुळे आज महिला वर्गानी नांदगाव पेठ पोलीस स्टेशनवर मोर्चा काढून आरोपीला अटक करण्याची तसेच आमचे सोने, दागिने व पैसे परत करण्याची मागणी केली आहे.

आज पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारींमध्ये महिलांनी ठेवलेले सोन्याचे गहाण दागिने, चांदीचे दागिने, लाखो रुपयांची रोख रक्कम, बनवण्यासाठी दिलेले दागिने व पूर्ण पैसे भरलेले व्यवहार यांचा समावेश आहे. तक्रारदारांची संख्या वाढण्याची शक्यता असून, हा घोटाळा अमरावती जिल्ह्यातील आतापर्यंतचा मोठा सराफ फसवणूक प्रकरण ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.संतप्त महिलांनी व नागरिकांनी आरोपीला तात्काळ अटक करून मुद्देमाल परत मिळवून देण्याची मागणी केली. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांनी नागरिकांना शांततेचे आवाहन करत लवकरच गुन्हा दाखल करून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.यावेळी मंदाबाई इंगळे,शुभांगी जवके,साधना मोशें, निखील पावडे,गंगुबाई मांडवकर,मारोतीभाऊ शिंदे, अनिल शिंदे,सुरेश शिंदे,पंचफुला सावंत,साईनाथ शिंदे, लखन सावंत,शीलाबाई कुकडे,संगीता सोळंके,अनामिका धोंडे,फैजान खान यांच्या सह असंख्य महिला, पुरुष,व्यावसायिक यांचा मोर्चात सहभाग होता.

### युवा स्वाभिमान पक्षाच्या मनपा

जागांसाठी झालेल्या निवडणुकी मध्ये शिंदे सेनेला ३ जागा मिळाल्या आहे. त्यांनी कोणत्याही राजकीय पक्षासोबत गठजोड न करता स्वतंत्र गट निर्माण करण्याचा निर्णय घेतलेला आहे. स्वतंत्र गटाला मंजुरी देण्यासाठी विभागीय आयुक्तांजवळ आपला दावा सादर केला आहे. प्रभाग क्रमांक २० सुतगिरणी सामरा नगर येथून निर्वाचित नगरसेवक डॉ. राजेंद्र तायडे यांना पार्टीने गटनेता बनविले आहे. गटनेता म्हणून राजेंद्र तायडे मनपा सभागृहात शिंदे सेनेच्या तीन सदस्यीय गटासाठी आवश्यक निर्णय घेणार आहेत. महानगरपालिकेमध्ये शिंदे सेनेच्या उमेदवारांचे प्रत्यक्ष स्वतंत्र गटाला मंजुरी आणि डॉ. राजेंद्र तायडे यांची गटनेता म्हणून नियुक्ती केल्याचे पत्र जिल्हाध्यक्ष संतोष बद्रे यांनी जारी केले आहे.

### नीलेश बदुकले हत्याकांडात

आले होते. १९ जानेवारी रोजी सकाळी ते पत्नीसमवेत चांदूर बाजार–वलगाव मार्गावर मॉर्निंग वॉकसाठी निघाले असताना, व्यवसायातील वादातून आरोपी अजय भुजंगराव लंगोटे याने चारचाकी वाहनाने त्यांच्यावर भरधाव गाडी घालून हत्या केली. या भीषण घटनेत नीलेश बदुकले यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांच्या पत्नी गंभीर जखमी झाल्या.

घटनेनंतर संतप्त नागरिक व नातेवाइकांनी चांदूर बाजार पोलीस ठाण्यात मोठी गर्दी करत हत्येचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांनी तातडीने वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देत खुनाचा गुन्हा नोंदवून आरोपी अजय लंगोटे याला अटक केली. त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडीदरम्यान तपासात या हत्याकांडात आणखी दोन जणांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानुसार चांदूर बाजार पोलीस ठाण्याचे निरीक्षक अशोक जाधव व सहायक पोलीस निरीक्षक उल्हास राठोड यांनी तत्काळ कारवाई करत संजय उर्फ गोलू भुजंगराव लंगोटे (वय ४०, रा. ठुगांव पिंपरी) आणि पवन विकास झटाले (वय २३, रा. शिरजगाव बंड) यांना उशिरा रात्री ताब्यात घेतले. चौकशीत दोन्ही आरोपींनी हत्येपूर्वी दोन दिवस नीलेश बदुकले यांची हालचाल, वेळापत्रक व मार्गाची रेकी केल्याची कबुली दिली आहे. नियोजनबद्ध कट रचून ही हत्या केल्याचे स्पष्ट झाले असून, पोलिस तपास अधिक तीव्र करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक जाधव व सहायक पोलीस निरीक्षक उल्हास राठोड करीत आहेत. या हत्याकांडामुळे परिसरात खळबळ उडाली असून, आरोपींवर कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### अचलपूर नप मध्ये सभापती पदाच्या

साफ झाला असून काँग्रेस पक्षाचे सर्वात जास्त १५ नगरसेवक निवडून आले आहे . अचलपूर नगर परिषद काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष खुर्शीदा बानो अत्ताउल्लाशा शा यांची पाणीपुरवठा सभापती पदी निवड झाली आहे. यामध्ये भाजपा ,राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट),एम. आय.एम आणि अपक्ष , प्रहार नगरसेवकाची सभापती पदी निवड झाली आहे .यात महिला व बालकल्याण सभापती पदी भाजपा पक्षाचे नगरसेविका सौ.दुर्गा सोनपरोते,आरोग्य सभापती पदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) चे नगरसेवक शमशेर खान बिस्मिल्ला खान ,नियोजन सभापती पदी अपक्ष नगरसेविका दर्शना ठाकूर ,शिक्षण सभापती पदी एम.आय. एम चे नगरसेविका रुखासना बी मो.इसा ,बांधकाम सभापतीपदी प्रहार चे नगरसेविका दिपाली जवंजाळ यांची अविरोध निवड करण्यात आली आहे. स्थायी समिती सदस्य मध्ये भाजपा पक्षाचे नगरसेवक सुरेंद्र तांबे,अपक्ष नगरसेविका सुशीला इंगळे,काँग्रेस पक्षाचे नगरसेवक मो.अस्लम मो .अहमद बंजारा यांची निवड करण्यात आली आहे.

### राख वाहून नेणाऱ्या सातशे

लघु व सूक्ष्म उद्योजकांकडून दोन कोटी रुपयांचा नफा-तोटा बॅलन्स शीट मागविण्यात आली असून, ही अट लघु उद्योगांसाठी अशक्य असल्याने त्यांना थेट निविदा प्रक्रियेबाहेर ठेवण्यात आले असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. याशिवाय राखेची किमान किंमत ५० रुपये प्रती मेट्रिक टन निश्चित करण्यात आली असून ती पूर्णतः चुकीची व नियमबाह्य असल्याचा दावा करण्यात आला आहे.

सध्या कंपनीकडून ५० मेट्रिक टन राख वाहतुकीसाठी एका वाहनामागे ३०० रुपये आकारले जात असून, त्या हिशोबाने राखेची मूळ किंमत प्रतिटन सुमारे ३ रुपये ५० पैसे इतकी आकारायला हवी होती मात्र प्रत्यक्षातकिमान दर थेट ५० रुपये प्रती टन ठेवणे अन्यायकारक असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.या संपूर्ण प्रक्रियेवरून लघु व सूक्ष्म उद्योजकांना राख कमी दरात मिळू नये आणि खुल्या लिलाव पद्धतीतून जास्त दराने विक्री करण्याचा कंपनीचा उद्देश स्पष्ट होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. खुल्या प्रवर्गातील निविदेमध्ये बोली वाढत गेल्याने राखेचा दर तब्बल १२० रुपये प्रती मेट्रिक टनपर्यंत नेण्यात आला असून, पुढे बोलीप्रमाणे दर वाढवून राख खरेदी करण्याची सक्ती केली जात असल्याचे सांगण्यात आले.

या धोरणामुळे जिल्ह्यातील शेकडो लघु व सूक्ष्म उद्योजकांसह सुमारे ७०० वाहनधारकांवर उद्योग बंद करण्याची वेळ येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे सदर टेंडर प्रक्रिया तात्काळ रद्द करून शासन निर्णयानुसार नव्याने, पारदर्शक पद्धतीने निविदा राबवावी, अशी मागणी अंबाई ब्रिक्स व ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या वतीने करण्यात आली आहे. मागणी मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करून कंपनीची कोळसा वाहतूक करणारी रेल्वे रोखण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. या उपोषणाला अंबाई ब्रिक्स व ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे बलविर चव्हाण, राजू चिरडे,सागर अंबडकार,मयूर दारोकार, अजय मोरवाल, मोरेश्वर इंगळे, सुरज बैस,सतीश तायडे,साजिद बडनेर वाले,कमरुद्दीन नजरुद्दीन सय्यद ( कम्मू ),अनिल भूतकर,किशोर अंबाडकर,श्रीकांत सरोदे, प्रणय मेहरे,सागर खराटे, पवन रावत,निखिल तायडे, जुनेद खान यांचेसह शेकडो वाहन मालक तसेच व्यावसायिक आदी उपस्थित असून जोपर्यंत ही निविदा प्रक्रिया थांबवून नव्याने निविदा राबविण्यात येत नाही तोपर्यंत आमचा लढा सुरूच असणार असा इशारा उपोषणकर्त्यांनी दिला आहे.

### विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचारी संघटनेची

पडलेली १० प्रकरणे आज तातडीने निकाली काढण्यात आली आहेत. यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

विद्यापीठातील हार्डवेअर इंजिनीअर या कर्मचाऱ्यांच्या 'सेवार्थ आयडी' समाविष्ट करण्यामध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणींवरही बैठकीत सविस्तर खल झाला. या तांत्रिक त्रुटी येत्या दोन दिवसांत पूर्णपणे दूर करून ही प्रक्रिया पूर्ण केली जाईल, असे आश्वासन सहसंचालकांनी संघटनेला दिले आहे.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या ग्रॅच्युइटीचे (उपदान) प्रश्न गंभीर असून, त्यावर तोडगा काढण्यासाठी सहसंचालक कार्यालयाने २७ जानेवारी रोजी विशेष बैठक आयोजित केली आहे. या बैठकीत सर्व आर्थिक प्रकरणांवर ठोस निर्णय घेण्याचे संकेत प्रशासनाने दिले आहेत. दरम्यान, संघटनेने आक्रमक पवित्रा घेत प्रशासनाला १५ दिवसांची मुदत दिली आहे. २७ जानेवारीच्या बैठकीत जर समाधानकारक निर्णय झाला नाही, तर सहसंचालक कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशारा 'संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचारी संघा'ने दिला आहे.

### तिवसा शहरातील पंचवटी चौकाजवळ

नाकाची जागा आहे,त्या जागेत रात्री अंदाजे १.३० ते २.०० वाजताच्या सुमारास हरणाची शिकार केली.त्यावेळी मोठ्या प्रमाणात कुत्र्यांचा भूकण्याचा आवाज येत असल्याने कदाचित बिबट्याने हरिणाची शिकार करीत असताना कुत्रे भुंकत असावे,असा अंदाज स्थानिक नागरिकांनी व्यक्त केला असून यास मात्र वनविभागाने दुजोरा दिला आहे.शिकार केल्यानंतर हरणाची शिखर (अवशेष) जुना टोल नाका परिसरात टाकून दिल्याचे आढळून आले. या घटनेदरम्यान परिसरातील काही कुत्र्यांनी मोठ्या आवाजात भुंकण्यास सुरुवात केल्याने नागरिकांचे लक्ष या प्रकाराकडे वेधले गेले. रात्रीच्या शांततेत आजूबाजूच्या परिसरात विचित्र आवाज येत असल्याने नागरिकांमध्ये भीती पसरली होती. सकाळी वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

या परिसरात आमची कायमस्वरूपी वस्ती आहे. अनेक नागरिक रात्री उशिरा घरी ये-जा करतात. अशा परिस्थितीत बिबट्याचा वावर अत्यंत धोकादायक आहे.हरिणाची शिकार ही बिबट्यानेच केली,त्याचे ठसे देखील उमटले असताना कुठलेही हरिणाचे शवविच्छेदन न करता वनविभागाने ते त्याच ठिकाणी दफन केली. या घटनेची वनविभागाने सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करावी अन्यथा स्थानिक नागरिक याबाबत आंदोलन करतील.- **भूषण यावले, स्थानिक नागरिक,तिवसा**

घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी पाहणी केली.मृत हरिणाचा पंचनामा केला असता तेथे बिबट्याचे कुठलेही ठसे आढळून आले नाही.कुत्र्यांच्या कळपाने रात्रीच्या अंधारात शेताच्या कंपाउंड मध्ये भिर-भिर फिरणाऱ्या हरिणावर झडप घालून शिकार केल्याचा अंदाज आहे.मृत हरिणाला त्याच ठिकाणी पंचनामा करून दफन करण्यात आले.- **एस डब्ल्यू घोडमारे -वनपाल,तिवसा.**

### आर्वीत 'सायको'चा रक्तपात

हल्ला करून त्याला जखमी केले. परिसरात प्रचंड गोंधळ उडाला.

याच अवस्थेत आरोपी हातात लाकडी पाटी घेऊन इंदिरा चौकाकडे धावला. चौकात गभने यांच्या घराजवळून जात असलेल्या रामकृष्ण श्रावण राऊत (वय ७०, रा. हनुमान वॉर्ड) यांच्या डोक्यावर त्याने जोरदार वार केला. रक्ताच्या थारोळ्यात कोसळलेल्या राऊत यांचा जागीच मृत्यू झाला. काही मिनिटांतच आरोपी भाजी बाजारात पोहोचला. शेतमाल विक्रीसाठी आलेले रामराव महादेव वांगे (वय ८५, रा. मारुती वॉर्ड) यांच्यावरही त्याने बेछूट हल्ला चढवला. गंभीर जखमी अवस्थेत वांगे यांना प्रथम उपजिल्हा रुग्णालयात व नंतर सेवाग्राम येथे हलविण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचाही मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच आर्वी पोलिसांनी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत संतप्त नागरिकांनी आरोपीला पकडले होते. वाटेत येणाऱ्यांवर तो सतत हल्ले करत असल्याने सुमारे ५० ते ६० नागरिकांनी त्याला चोप दिला. त्याचे हातपाय बांधून लाकडी काठीला बांधण्यात आले आणि खांद्यावर उचलून थेट पोलिस ठाण्यात नेण्यात आले. मारहाणीत आरोपी जखमी झाल्याने त्यालाही जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या घटनेनंतर आर्वी शहरात तीव्र असंतोष उसळला आहे. मानसिक आजार असलेला युवक नग्न अवस्थेत शहरात मोकळेपणाने कसा फिरत होता, कुटुंबीयांनी योग्य ती खबरदारी का घेतली नाही, पोलिस व प्रशासनाची यंत्रणा कुठे होती, दोन निष्पाप वृद्धांचा बळी गेल्याला जबाबदार कोण, असे अनेक प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.


**महानिर्मिती** महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## ई निविदा प्रकाशनाची सूचना

महानिर्मिती, औ.वि. केंद्र परळी– वै. कडून अनुभवी व नामांकित उत्पादक / पुरवठादार / कंत्राटदारा कडून खालील काम / वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी ई–निविदा मागविण्यात येत आहेत.

| ई–निविदा क्रमांक | विषय | अंदाजित रक्कम /बयाना रक्कम | ई–निविदा विक्रीचा कालावधी | ई–निविदा स्वीकृत (१२.०० पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| ई–निविदा क्र ३००००६४९८२ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ स्पेअर्स फॉर बर्नर टिल्ट मेकॅनिजम फॉर एओएच वर्क ऑफ यूनिट ७ रीक्वायर्ड ॲट बीएम–१, २५० मे.वॅट, टीपीएस, परळी वै. | ६.२६ लाख ९७६०/– | २२.०१.२०२६ ते ०१.०२.२०२६ | ०२.०२.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६५१४३ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ व्हेरियस स्पेयर्स रीक्वायर्ड फॉर मे. ॲटलस कोपको मेक झेडआर–२७५ एयर कॉम्प्रेसर ड्यूरिंग सीओएच ॲट एएचपी, यू–८, टीपीएस, परळी वै. | ६.८५ लाख १०३५९/– | २२.०१.२०२६ ते ०१.०२.२०२६ | ०२.०२.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६५१४४ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ व्हेरियस स्पेयर्स रीक्वायर्ड फॉर मे. ॲटलस कोपको मेक झेडआर–९० एयर कॉम्प्रेसर ड्यूरिंग सीओएच ॲट एएचपी, यू–८, टीपीएस, परळी वै. | ४.२८ लाख ७७८३/– | २२.०१.२०२६ ते ०१.०२.२०२६ | ०२.०२.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६५१२२ (आर) | वर्क ऑफ रीपेयर ऑफ वेंट लाइन ॲंड सेफ्टी वॉल्व ड्रेन पॅन(ट्रे) ऑफ यू–७ इन एओएच ॲट बीएम–१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | २.२०लाख ५७०९/– | २२.०१.२०२६ ते ०६.०२.२०२६ | ०७.०२.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६५१३२ (आर) | वर्क ऑफ ओएचपी ड्यूरिंग यू–७, एओएच ॲट बीएम–१,२५० मे.वॅट टीपीएस,परळी वै. | १.७३ लाख ५२१२/– | २२.०१.२०२६ ते ०६.०२.२०२६ | ०७.०२.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६५१३४ (आर) | प्रॉक्यूरमेंट ऑफ कोल मिल लुब ऑइल स्पेयर्स ॲट बीएम–१, २५०मे.वॅट टीपीएस, परळी वै. | ६.७१ लाख १०२७४/– | २२.०१.२०२६ ते ०६.०२.२०२६ | ०७.०२.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६५१४६ (आर) | कॉम्प्रिहेन्सीव वर्क ऑफ रिपेर ॲंड रेक्टिफिकेशन ऑफ एनआरव्ही गेट ऑफ एयर हॅंडलिंग यूनिट ॲट एएचपी–१ , २५० मे.वॅट, टीपीएस, परळी वै | ६.६२ लाख १०१२०/– | २२.०१.२०२६ ते ०६.०२.२०२६ | ०७.०२.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६१९४३ | एएमसी फॉर वर्क ऑफ नायट्रोजन फिलिंग, चेकिंग ऑफ क्रिटिकल ॲक्यूम्यलेटर्स ऑफ एचपीसीव्हीएस, आयपीसीव्हीएस, एचपीबीपी, एलपीबीपी ॲंड सीडब्ल्यू डिस्चार्ज वॉल्वज अलॉन्ग वीथ सप्लाय ऑफ एन २ गॅस सिलिंडर्स ॲट टीएम–२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ४.०८ लाख ७५८१/– | २२.०१.२०२६ ते ०६.०२.२०२६ | ०७.०२.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६२७७७ | एएमसी ऑफ कॉम्प्रेहेंसीव वर्क्स ऑफ एचर ड्रायर्स , एयर ड्रायर्स ॲंड एसडब्ल्यूएएस लॅब चिलर्स ॲट टीएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ५.९५ लाख ९४५४/– | २२.०१.२०२६ ते ०६.०२.२०२६ | ०७.०२.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४८४६ | टू ईयर ॲन्युअल मेंटेनेंस कॉंट्रॅक्ट फॉर कंप्लीट ओवरहौलिंग ॲंड शिफ्टिंग ऑफ एल.टी. मोटर्स रेटिंग फ्रॉम २ कि.वॅट टु १६०कि.वॅट ॲट ईएम–१,२५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | २०.५२ लाख २४०२२/– | २२.०१.२०२६ ते ०६.०२.२०२६ | ०७.०२.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४९८१ | एएमसी ऑफ रीपेरिंग / सर्विसिंग ऑफ व्हेरियस मोटोराइज्ड ॲच्युयटर ॲट टीएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | २.२८ लाख ५७८२/– | २२.०१.२०२६ ते ०६.०२.२०२६ | ०७.०२.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४९९७ | टू ईयर ॲन्युअल मेंटेनेंस कॉंट्रॅक्ट फॉर एच.टी मोटर ओवरहौल ॲंड शिफ्टिंग ॲट ईएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | १८.८८ लाख २२३८३/– | २२.०१.२०२६ ते ०६.०२.२०२६ | ०७.०२.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४९९८ | एएमसी वर्क ऑफ ओवरहौलिंग ऑफ मल्टी स्टेज पम्पस ॲट टीएम–२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | १.३० लाख ३९०६/– | २२.०१.२०२६ ते ०६.०२.२०२६ | ०७.०२.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४९९९ | टू ईयर ॲन्युअल वर्क कॉंट्रॅक्ट ऑफ शिफ्टिंग ऑफ मटेरियल फ्रॉम सेक्शन स्टोर टू साइट ॲंड वाइस वर्सा ॲंड मिसलेनिअस वर्क ॲट ईएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | २१.४७ लाख २४९७५/– | २२.०१.२०२६ ते ०६.०२.२०२६ | ०७.०२.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६५०३८ | ॲन्युअल वर्क कॉंट्रॅक्ट फॉर शिफ्टिंग ॲंड ओवरहौलिंग ऑफ एच.टी. मोटर्स इंस्टॉलड ॲट ईएम–२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ९.०६ लाख १२५६३/– | २२.०१.२०२६ ते ०६.०२.२०२६ | ०७.०२.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४०५१ | सप्लाय ऑफ रीक्वायर्ड स्पेयर्स अलॉन्ग विथ रीपेयर ॲंड इन्स्युलेशन वर्क ऑफ चिमणी स्टॅक ॲट १X२५० मे. वॅट, यू–८, टीपीएस, परळी वै. | १५.६८ लाख १९१८६/– | २२.०१.२०२६ ते १२.०२.२०२६ | १३.०२.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४४६४ | प्रॉक्यूरमेंट ऑफ के टाइप थर्मोकपल केबल ॲंड अदर केब्लस ॲट आय ॲंड सी–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ६.८८ लाख १०३९०/– | २२.०१.२०२६ ते १२.०२.२०२६ | १३.०२.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४४७९ | वर्क ऑफ सर्विसिंग ॲंड रीपेरिंग ऑफ व्हेरियस हीट एक्सचेंचजर्स ड्यूरिंग यू–७, सीओएच ॲट टीएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | २.०३ लाख ५५३६/– | २२.०१.२०२६ ते १२.०२.२०२६ | १३.०२.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४७१२ | वर्क ऑफ सर्विसिंग ऑफ ओएलसीसी सिस्टिम ॲंड व्हेरियस कूलर्स ड्यूरिंग यू–७ ओवरहौल ॲट टीएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ८.१८ लाख ११६८८/– | २२.०१.२०२६ ते १२.०२.२०२६ | १३.०२.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४८३५ | प्रॉक्यूरमेंट ऑफ कोल मिल इनलेट एसएस पाइप फॉर कोल मिल बीबीडी ४७७२ ड्यूरिंग एओएच ऑफ यू–७ ॲट बीएम–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ३२.०० लाख ३५५०९/– | २२.०१.२०२६ ते १२.०२.२०२६ | १३.०२.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४९२९ | प्रॉक्यूरमेंट ऑफ मायक्रोप्रोसेसर बेस्ड डिजिटल इलेक्ट्रॉनिक एनर्जि मिटर फॉर एनर्जि मॅनेजमेंट सिस्टम (ईएमएस) ॲट ईटी–२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | २.६१ लाख ६११६/– | २२.०१.२०२६ ते १२.०२.२०२६ | १३.०२.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००६४९८७ | टेक्निकल सर्विसेस ऑफ टेस्टिंग ॲंड कॅलिब्रेशन ऑफ इलेक्ट्रॉनिक मॉड्यूल फॉर बीटीएस २००० सिस्टिम ॲट ईटी–२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | २.०३ लाख ५५३१/– | २२.०१.२०२६ ते १२.०२.२०२६ | १३.०२.२०२६ |

वरील तारीखेस ई–निविदा विक्री सुरू होण्याची वेळ ११:०० व ई–निविदा विक्री बंद होण्याची वेळ १६:००, निविदा किंमत व बयाना रक्कम ऑनलाइन पद्धतीने भरावयाची आहे.सर्व निविदा करिता निविदा किंमत रु. ११८०/– (जीएसटी सह) संपर्क व्यक्ती: मुख्य अभियंता, टीपीएस परळी–वैजनाथ. मेल आय डि: parlitpsrp@mahagenco.in, cegenparli@mahagenco.in अधिक माहितीसाठी आणि विक्रेता नोंदणीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्याः https://eprocurement.mahagenco.in, SRM help desk E-mail ID etendering.prl@mahagenco.in
एस.आर.एम. मदत लाईन क्रमांक ८४११९७१५२५

**मुख्य अभियंता**

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, २२ जानेवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## मनपा सत्तेसाठी महासंग्राम!

### भाजपविरोधी सत्तास्थापनेसाठी काँग्रेसचे निर्णायक पाऊल

# ‘आम्हाला कुठलंच पद नको, फक्त भाजपला रोखा’ – आ. साजिद खान पठाण यांचे आवाहन

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

**अकोला महापालिकेतील सत्तासंघर्ष आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला असून शहरात ‘हाय व्होल्टेज पॉलिटिक्स’ला उधाण आले आहे. भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असला, तरी बहुमताच्या जादुई आकड्यापासून तो तीन जागा दूर आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसने भाजपविरोधी पक्षांना एकत्र आणण्यासाठी आक्रमक पावले उचलली असून, उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेला (उबाठा) काँग्रेसकडून मोठा प्रस्ताव देण्यात आला आहे.**



‘काँग्रेसला कुठलेही पद नको. भाजपविरोधी सर्व पक्षांनी एकत्र येऊन अकोला महापालिकेत सत्ता स्थापन करावी,’ असे स्पष्ट आवाहन काँग्रेसचे आमदार साजिद खान पठाण यांनी पत्रकारांशी संवाद साधताना केले.

‘सर्व पक्षांशी बोलणी सुरू असून, अकोला महापालिकेत लवकरच सत्ता स्थापन होईल,’ असा ठाम दावाही त्यांनी केला.

महापालिकेतील सत्तासमीकरणे बदलण्यासाठी काँग्रेसने रणनीती आखली आहे. आ. साजिद खान पठाण यांनी ठाकरेंच्या शिवसेनेचे आमदार नितीन देशमुख यांच्याशी बैठक घेतली असून, आज वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांची भेट घेण्याचे नियोजन आहे.यामुळे भाजपविरोधी आघाडीची मोट बांधण्याचे प्रयत्न वेग घेत असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

भाजपा सत्तेचा दावा जरी करीत असली तरी मात्र भाजपकडे कोणत्याही पक्षाचे किंवा अपक्ष नगरसेवक सुद्धा नाही. भाजपकडे केवळ त्यांचेच ३८ नगरसेवक आहेत. त्यांच्याकडे कुठलेही अन्य पक्षाचे अथवा अपक्ष नगरसेवक जात नसल्याने ते अस्वस्थ होत असून उगाच अन्य नगरसेवक, अपक्ष नगरसेवक आपल्या संपर्कात असल्याच्या अफवा ते उडवत असल्याचा टोला यावेळी आ. पठाण यांनी लगावला.

### पक्षीय बलाबल

| | | | |
|---|---|---|---|
| भाजप | : ३८ | शिंदेसेना | : ०१ |
| काँग्रेस | : २१ | अजित पवार राष्ट्रवादी | : ०१ |
| उबाठा (ठाकरे शिवसेना) | : ०६ | अकोला विकास समिती | : ०१ |
| वंचित | : ०५ | मनसे | : ०० |
| शरद पवार राष्ट्रवादी | : ०३ | अपक्ष | : ०१ |
| एमआयएम | : ०३ | | |

### शिवसेनेनंतर भाजपाचे प्रत्युत्तर

# ‘विकासकामांचा प्रस्ताव नाही, फक्त पदाबाबत चर्चा’

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

महानगरपालिकेतील सत्तासंघर्षावरून वातावरण तापले असतानाच शिवसेनेच्या पत्रकार परिषदेनंतर भाजपाचे माजी महापौर विजय अग्रवाल यांनी पत्रकारांशी संवाद साधत अनेक मुद्द्यांवर सडेतोड भूमिका मांडली. ‘आ. देशमुखांचा विकासकामांना घेऊन कोणताही अधिकृत प्रस्ताव आमच्याकडे आलेला नाही. माझी आणि दातकर यांची भेट झाली होती, मात्र ती केवळ पदाबाबतची चर्चा होती,’ असे स्पष्ट करत शिवसेनेच्या आरोपांना त्यांनी थेट छेद दिला.

अग्रवाल म्हणाले की, ‘अनेक पक्षांचे नगरसेवक आमच्या संपर्कात आहेत. मात्र कोणत्याही पक्षाला अडचणीत आणणे हा भाजपाचा हेतू नाही.’ मनपा सत्तास्थापनेबाबत भाजपाची भूमिका स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, ‘केवळ बहुमत नाही तर सहमतीच्या आधारावर सत्ता स्थापन होईल. लोक सोबत येत असतील, तर त्यांना सोबत घेऊन चर्चा करण्यास आम्ही तयार आहोत.’

राजकीय गणितांबाबत बोलताना अग्रवाल यांनी स्पष्ट भूमिका मांडली. ‘एमआयएम आणि काँग्रेस वगळता जे पक्ष आमच्या सोबत येऊ इच्छित आहेत, त्यांच्यासाठी दार खुले आहे,’ असे सांगत त्यांनी संभाव्य राजकीय आघाड्यांचे संकेत दिले. मात्र, ‘कोणाशीही अधिकृत चर्चा झालेली नाही,’ असेही त्यांनी नमूद केले.

शहर विकासाच्या मुद्द्यावरून विरोधकांकडून होत असलेल्या टीकेला प्रत्युत्तर देताना अग्रवाल म्हणाले, ‘शहरातील सुमारे ३००० कोटींची विकासकामे सुरूच आहेत. शिवसेना ज्या कामांचा दावा करत आहे, ती कामे आधीपासूनच कार्यान्वित आहेत.’ विकासकामांवर राजकारण केले जात असल्याचा आरोपही त्यांनी अप्रत्यक्षपणे केला.

#### देशमुखांना फोन का केला ?

‘४१ नगरसेवकांच्या गणितात विरक, मेश्राम यांच्या महानगर विकास आघाडीतील एक आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मधील एका व्यक्तीचा संदर्भ आला. त्यांच्या काही नगरसेवकांचा निरोप होता, म्हणूनच देशमुख यांना फोन केला,’ असे स्पष्टीकरण अग्रवाल यांनी दिले. मात्र पुन्हा एकदा त्यांनी ठामपणे सांगितले की, ‘कोणताही प्रस्ताव नव्हता, फक्त पदाबाबत चर्चा होती.’



माजी महापौर विजय अग्रवाल यांची स्पष्टोक्ती

#### उपमहापौर पदावरून तणाव

शिवसेनेकडून उपमहापौर पदाची मागणी करण्यात आल्याचेही अग्रवाल यांनी मान्य केले. मात्र, ‘सत्ता स्थापनेसाठी कोणतीही अडचण नाही. सर्वांना सोबत घेऊन जाणे हीच भाजपाची भूमिका आहे,’ असे सांगत त्यांनी समन्वयाचा सूर लावण्याचा प्रयत्न केला.

#### ४८ ते ३८ – आत्मपरीक्षणाची गरज

भाजपाचे नगरसेवक ४८ वरून ३८ वर येण्याबाबत विचारले असता अग्रवाल म्हणाले, ‘आत्मपरीक्षण, चिंतन आणि अवलोकन करणे ही भारतीय जनता पक्षाची परंपरा आहे.’ निकालातून बोध घेऊन पुढील रणनीती ठरवली जाईल.

# भाजपकडून विकासाचे मुद्दे बाजूला ठेवून राजकारण; शहराचे प्रश्न प्राधान्याचे – आमदार नितीन देशमुख

## भाजपाच्या प्रस्तावाला अद्यापही होकार नाही

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

*शहराच्या विकासाच्या नावाखाली अफवा पसरवून राजकीय समीकरणे मांडली जात असतील, तर ते अकोल्याच्या हिताचे नाही. सत्ता कोणाकडे आहे यापेक्षा शहराचे मूलभूत प्रश्न सुटणे महत्त्वाचे आहे, भाजपकडून आमचे प्रस्तावावर अद्यापही कुठल्याही प्रकाराचे उत्तर नाही, आमचे प्रस्ताव जो मान्य करेल आम्ही त्यांच्यासोबत सत्तेत जाऊ ठाम मत आमदार नितीन देशमुख यांनी व्यक्त केले. शिवसेनेच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.*



आमदार देशमुख म्हणाले की, ‘विकासाच्या मुद्द्यांवर चर्चा होणे अपेक्षित असताना नगरसेवक फोडाफोडीच्या अफवा पसरवल्या जात आहेत. शिवसेनेचे नगरसेवक एकसंध असून कोणताही निर्णय हा शहराच्या हिताचा विचार करूनच घेतला जाईल.’ शहरातील स्थितीवर नाराजी व्यक्त करताना त्यांनी महिलांच्या सुरक्षिततेचा मुद्दा उपस्थित केला.

‘अकोला शहरात महिलांमध्ये भीतीचे वातावरण आहे. सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना राबविल्या जात नाहीत, ही गंभीर बाब आहे,’ असे ते म्हणाले.

हद्दवाढीनंतर नागरिकांवर करवाढीचा बोजा पडला, मात्र अपेक्षित सुविधा मिळाल्या नाहीत, असा आरोप करत आमदार देशमुख म्हणाले, ‘रस्ते, नाल्या, सिटी बस सेवा, पाणीपुरवठा या सर्व बाबींमध्ये अपयश दिसून येत आहे. १०० कोटी रुपयांचा निधी खर्च झाल्याचा दावा केला जातो, पण तो शहराच्या विकासात कुठेच दिसत नाही. या निधीच्या वापराची चौकशी झाली पाहिजे.’ विकासाच्या नावावर भाजपाने निवडणूक लढली मात्र त्यांचा विकासा मतदारांना न दिसल्याने मतदारांनी ४८ वरून ३८ जागांवर भाजपाला आणून ठेवले असल्याचा टोला आ. देशमुख यांनी यावेळी लगावला.

पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर त्यांनी स्पष्ट भूमिका मांडत सांगितले की, शहराला वाण धरणातून पिण्याचे पाणी देणे हाच शाश्वत पर्याय आहे. जिगाव धरणाचे पाणी पिण्यायोग्य नसल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. आरोग्य सुविधांबाबत बोलताना त्यांनी झोननिहाय आरोग्य सेवा सुरू करण्याची मागणी केली. ‘मनपाच्या माध्यमातून सुसज्ज रुग्णालये उपलब्ध झाली पाहिजेत. केवळ घोषणा करून आरोग्य प्रश्न सुटणार नाहीत,’ असे ते म्हणाले. रस्त्यांच्या कामांबाबत चौकशी करून दोषींवर कारवाई व्हावी, शहरात फोफावत चाललेल्या कॅफे संस्कृतीमुळे अनेक तरुणींचे आयुष्य बरबाद होत आहे, त्यामुळे अशा कॅफे ना मनपाने परवानगी नाकारत कॅफे बंद करण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.

राज्य सरकारवर टीका करताना आमदार देशमुख म्हणाले, ‘साडे आठ वर्षे राज्यात सत्ता असूनही हद्दवाढ विकासासाठी १५० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला नाही. मात्र मालमत्ता करात मोठी वाढ करण्यात आली. हा अन्याय आहे.’ ‘शहराचा विकास आमच्यासाठी सर्वोच्च आहे. सत्ता मिळवणे हा उद्देश नाही. जो पक्ष अकोल्याच्या विकासाच्या मुद्द्यांना प्राधान्य देईल, त्याच्यासोबत आम्ही उभे राहू,’ अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली.

या पत्रकार परिषदेला गोपाल दातकर, आशिष गावंडे, अतुल पवनीकर, गटनेते विजय इंगळे, मनोज पाटील, सागर भारुका, अभय खुमकर, सोनाली सरोदे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महापालिकेत वंचित बहुजन आघाडीच्या गटनेतेपदी नीलेश देव

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

महानगरपालिकेतील राजकीय हालचालींना वेग आला असताना वंचित बहुजन आघाडीने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. प्रभाग क्रमांक ३ चे नगरसेवक नीलेश देव यांची बुधवारी महापालिकेतील वंचित बहुजन आघाडीच्या गटनेतेपदी नियुक्ती करण्यात आली. पक्ष कार्यालयात पार पडलेल्या बैठकीत हा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.



वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, महासचिव मिलिंद इंगळे तसेच संतोष रहाटे, भिरड साहेब, ज्ञानेश्वर सुलताने यांच्या उपस्थितीत पक्षाचे पाच नवनिर्वाचित नगरसेवकांची महत्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत महापालिकेतील आगामी भूमिका, सत्तासंघर्षाची स्थिती आणि शहरातील नागरिकांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

चर्चेनंतर नगरसेवक नीलेश देव यांची गटनेतेपदी नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला. सामाजिक कार्यात सक्रिय असलेले नीलेश देव हे नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने आंदोलनात्मक भूमिका घेत असल्याचे पक्ष पदाधिकाऱ्यांनी नमूद केले. त्यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेत वंचित बहुजन आघाडीचा आवाज अधिक ठामपणे मांडला जाईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या बैठकीस नगरसेवक पराग गवई, जयश्री बहादूरकर, उज्वला पातोडे तसेच शेख शमसु कमर उर्फ शेख साबीर उपस्थित होते.

## सोनार समाज महिलामंडळ यांचा हळदी-कुंकू कार्यक्रम उत्साहात संपन्न



**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

सोनार समाज महिला मंडळाच्या वतीने पारंपरिक हळदी-कुंकू कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात श्री संत नरहरी सोनार मंदिर येथे संपन्न झाला. समाजातील महिलांनी तसेच गावातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

कार्यक्रमात महिलांना हळदी-कुंकू व भेटवस्तू देण्यात आल्या. समाजातील ऐक्य, परंपरा व संस्कृती जपण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. विविध सांस्कृतिक उपक्रम व खेळांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सोनार समाजातील पदाधिकारी व महिला मंडळाच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थित महिलांनी अशा उपक्रमांमुळे समाजातील सलोखा अधिक दृढ होतो, अशी भावना व्यक्त केली.महिला अध्यक्ष सौ विद्यताई प्रभूदास कल्यानकर यांच्या साथी ने समाजातील अनेक महिला यात सहभागी झाल्या होत्या.

# शिव चौकाची मोकळा श्वास घेण्याला सुरवात

**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

मंगळवार या बाजाराच्या दिवशी मालेगाव शहरातील शिव चौक येथे भयंकर मोठ्या प्रमाणात गर्दी होत होती आणि रस्ता पूर्णतः बंद होत होता तो आज काही अंशतः सुरू करण्यात आला असून तेथील दुकाने हटवण्यात आल्याने शिव चौकात मोकळा श्वास घेण्याला सुरुवात झाली आहे.

मालेगाव चा बाजार मंगळवार या दिवशी भरतो त्यादिवशी खेड्यापाड्यातून तसे आसपासच्या गावातून अनेक व्यापारी माल विक्रीसाठी येतात परंतु ते शिव चौकात रस्त्यावर दुकान मांडत असल्याने त्या ठिकाणी प्रचंड मोठ्या प्रमाणात गर्दी होत होती पर्यायाने वाहनधारक सुद्धा त्याच ठिकाणी वाहन लावत होते त्याच ठिकाणी जर जड वाहन आले तर पूर्ण रस्ता ब्लॉक होत होता त्याचे रुपांतर अनेक वेळा आपसातील भांडण तंटे पर्यंत जात होते महिलांना जाण्यासाठी जागा सुद्धा उरत नव्हती ही बाब नगरपंचायत अपडेट या मार्ग ग्रुपच्या मार्फत सर्व गावात चर्चा झाली त्याला अनुसरून नगरपंचायत चे कर्मचारी यांनी या मंगळवार ला सकाळी जाऊन रस्त्यावर बसणाऱ्या व्यवसायिकांना तिथून त्यांचे दुकान हलवण्याचे सांगितले त्यामुळे त्या ठिकाणी होणारी गर्दी आज य टळली मात्र वाहनधारकांनी कोठेही रस्त्यावर वाहन लावल्याने ती उणीव आज जाणवली हळूहळू ती सुद्धा दूर होईल अशी सर्वांना आशा आहे. दुचाकी धारकानी आपली वाहने व्यवस्थित लावावी जेने करून लोकांना जा ये करणे सोयीचे होईल आणि महिला पुरुषांना रस्त्याने जाणे येणे करणे अवघड होणार नाही .



> नगरपंचायत कर्मचाऱ्यांनी सकाळी जाऊन तेथील रस्त्यावर बसणाऱ्या दुकानदारांना आत मध्ये दुकान देण्याचे सांगितले त्यामुळे स्वस्ता मोकळा करण्यात आला हळूहळू सर्व सुरळीत होईल ’
>
> **रज्जू गजानन काळे,** नगरसेविका


### चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग अमरावती**

फेरफार अहवाल / अर्ज क्र. २४५/१९/२०२५

सार्वजनिक न्यासाचे नाव नोंदणी क्रमांक न्यू कॅरीस्मा फेलोशिप असोसिएशन परतवाडा ता. अचलपुर जि. अमरावती

**बाबत अर्जदार :-** श्री. अनुग्रह मोजेस नवगिरी

सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त - ०१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमूद केलेल्या फेरफार अहवाल / अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे का ? आणि सदरचा न्यासाचा सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ? (२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाची मालकीची आहे काय ? (अ) जंगम मिळकत (वर्णन) :- निरंक (ब) स्थावर मिळकत (वर्णन ) :- १. निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणे असेल त्यांनी लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफीयत विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय-०१, अमरावतीयांचे शिक्यानिशी आज दिनांक ०६/०१/२०२५ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक न्याय शाखा**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अमरावती


# पंचाळ्यात अवैध दारू विक्रीविरोधात महिलांचा आक्रोश; जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

## अवैध दारू विक्री तात्काळ बंद करा – वज्रदेही महिला विकास संघ

**वाशिम :** तालुक्यातील पंचाळा गावात अवैध दारू विक्रीने कळस गाठला असून, गावातील सामाजिक, नैतिक व कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर वज्रा देही महिला विकास संघाच्या संस्थापक अध्यक्षा आरती ठोके यांच्या नेतृत्वाखाली महिलांच्या शिष्टमंडळाने थेट जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथे धडक देत अवैध दारू विक्री तात्काळ बंद करण्याची ठाम मागणी केली आहे.जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात आलेल्या निवेदनात महिलांनी अवैध दारू विक्रेत्यांकडून गावात सुरू असलेल्या दहशतीचे, धमक्यांचे व पोलिसांच्या कथित दुर्लक्षाचे गंभीर आरोप केले आहेत. यावेळी मोठ्या संख्येने महिलांची उपस्थिती होती. महिलांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, ‘दारू विक्रीला विरोध केल्यास खोट्या गुन्ह्यांत अडकवण्याच्या व जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत.’ निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, पूर्वी गावाच्या बाहेर लपूनछपून सुरू असलेली अवैध दारू विक्री आता थेट नागरी वस्तीत, पोलिसांच्या नाकावर टिचून सुरू आहे. काही पोलीस कर्मचारी व बीट जमादार अवैध दारू विक्रेत्यांना अभय देत असल्याचा गंभीर आरोप महिलांनी केला आहे.‘कायदा व सुव्यवस्था अस्तित्वात आहे की नाही?’



असा थेट सवाल महिलांनी प्रशासनाला केला आहे.अवैध दारू विक्रीमुळे गावातील युवक व्यसनाधीन होत असून, घरगुती हिंसाचार, आर्थिक अडचणी, महिलांवरील अन्याय व सामाजिक वातावरणाचा ऱ्हास वाढत असल्याचे निवेदनात नमूद आहे. कधीकाळी सुसंस्कृत व पुरोगामी महाराष्ट्राची ओळख असलेला परिसर आज दारू माफियांच्या विळख्यात सापडत चालल्याची खंत व्यक्त करण्यात आली.महिलांनी यापूर्वीही ग्रामीण पोलीस स्टेशनकडे अनेक वेळा निवेदने दिली.

मात्र, ‘फक्त आश्वासनांपलीकडे काहीच घडले नाही. काही दिवस शांतता आणि पुन्हा जैसे थे परिस्थिती,’ असे अनुभव महिलांनी मांडले. त्यामुळे आता संयमाचा बांध तुटण्याच्या मार्गावर असल्याचा इशाराही देण्यात आला.जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून पंचाळा येथील अवैध दारू विक्री कायमस्वरूपी बंद करावी, दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा नाईलाजास्तव आमरण उपोषण करण्याचा इशारा महिलांनी दिला आहे. अशा परिस्थितीत उद्भवणाऱ्या कायदा-सुव्यवस्थेच्या परिस्थितीस संपूर्ण जबाबदारी पोलीस प्रशासनाची राहील, असेही निवेदनात नमूद आहे.

e paper www.janmadhyam.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## आशियातील सर्वात मोठा विकेंद्रित सौर उर्जा कार्यक्रम राबवून महाराष्ट्राने रचली यशोगाथा

# सौर उर्जेच्या माध्यमातून वर्षअखेरपर्यंत 16 गिगावॅट वीज निर्मिती -मुख्यमंत्री

**दावोस/वृत्तसंस्था :** महाराष्ट्राने आशियातील सर्वात मोठा विकेंद्रित सौर उर्जा कार्यक्रम राबवून यशोगाथा रचली आहे, असे नमूद करून या वर्षाच्या अखेरपर्यंत १६ गिगावॅट वीज सौर उर्जेच्या माध्यमातून उपलब्ध होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

वर्ल्ड ईकानामिक फोरमच्या वार्षिक बैठकीच्या निमित्ताने इंडिया पॅव्हेलियनमध्ये इंटरनॅशनल सोलर अलायन्सच्या वतीने आयोजित स्केलिंग सोलर एनर्जी व्हेअर इट मॅटर या विषयावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी मांडणी केली. यावेळी केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय उर्जा मंत्री प्रल्हाद जोशी आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी रूफटाप सोलर, सौर पंप, अब्जावधींची वीजखर्च बचत, कार्बन उत्सर्जनात मोठी घट, तसेच सौरउर्जा, बॅटरी स्टोरेज आणि पंप स्टोरेजद्वारे भविष्यात राज्य व राष्ट्रीय वीज ग्रीड स्थिर करण्याच्या योजनांची माहिती दिली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राने दशकापेक्षा कमी काळात संपूर्ण उर्जा क्षेत्राचा चेहरामोहरा बदलून टाकला आहे. महाराष्ट्रातील वीज ग्राहकांमध्ये १० टक्के हे कृषि पंपधारक आहेत, जे एकूण विजेच्या ३०ऽ वीज वापरत होते. त्यांना वीज पुरवठा करण्याचा खर्च प्रति युनिट ८ रुपये होता, तर त्यांच्याकडून फक्त १ रुपया आकारला जात असे. उर्वरित ७ रुपये राज्याकडून किंवा 'क्रास सबसिडी'च्या स्वरूपात दिले जात होते, ज्यामुळे औद्योगिक आणि इतर ग्राहकांसाठीच्या विजेच्या दराचा भार वाढत होता. हे एक दुष्टचक्र होते. मात्र, प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजींच्या दूरदृष्टीने आम्ही शेतीचा संपूर्ण वीज भार सौर उर्जेवर हलवण्याचा निर्णय घेतला. आशियातील सर्वात मोठी 'विकेंद्रित सौर उर्जा योजना' सुरू केली. याद्वारे प्रत्येक कृषी फिडर स्वतंत्रपणे सौरउर्जेवर आणला गेला. शेतक-यांना वीज पुरवण्यासाठी आम्ही स्वतंत्र कंपनी स्थापन केली. आता या वितरण प्रणालीद्वारे सुमारे १६ गिगावॅट वीज निर्माण केली जाईल आणि या वर्षाच्या अखेरीस आम्ही हा प्रकल्प पूर्ण करू. हे काम प्रगतीपथावर आहे. आम्ही दरमहा सुमारे ५०० मेगावॅट समर्पित करत आहोत आणि लवकरच १ गिगावॅट वीज निर्मिती पर्यंत पोहोचू. या दरम्यान, शेतक-यांना वीज पुरवठ्याचा जो खर्च ८ रुपये होता, तो आता ३ रुपयांपेक्षा कमी झाला आहे. यामुळे उद्योग आणि घरगुती ग्राहकांवरील खर्चाचा बोजा कमी झाला असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.



महाराष्ट्रात 'पीएम सूर्य घर योजना' उत्तमरित्या राबविली जात आहे. यातून सुमारे ४ गिगावॅट क्षमतेचे रूफटाप सोलर संयत्र कार्यान्वित होणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, यातून आता केवळ घरा-घरासाठी वीज मिळते आहे, असे नाही, तर ती प्रकाशाने उजळून निघताहेत. शिवाय यातून शिल्लक वीज ग्रीडलाही पुरवली जात आहे. यामुळे कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी होउ लागले आहे. आम्ही आता केंद्र कृषि पंपाच्या नवीन जोडण्यांसाठी केंद्र सरकारच्या योजनेच्या धर्तीवर ' मागेल त्याला सौर पंप योजना सुरू केली. यात संपूर्ण भारतात जेवढे सौर पंप बसवले आहेत, त्यापैकी ६०% महाराष्ट्रात आहेत. लवकरच ही संख्या १० लाखांच्या पार जाईल. याचा परिणाम असा झाला आहे की, पुढील ५ वर्षांसाठी आमचा 'मल्टी-इयर टॅरिफ' (विजेचे दर), जो दरवर्षी ९ऽ ने वाढत होता, तो आता कमी होत आहे. पुढील ५ वर्षांत आम्ही वीज खरेदीच्या खर्चात १० अब्ज डालर्सची बचत करू, असेही त्यांनी सांगितले.सौरउर्जा कार्यक्रमामुळे होणारी कार्बन उत्सर्जन कपात ही ३०० कोटी झाडे लावण्याइतकी असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, २०३२ पर्यंत आम्ही आणखी ४५ गिगावॅट वीज निर्माण करू, ज्यापैकी ७०% सौर उर्जा असेल. ३-४ वर्षांपूर्वी आमचे नूतनीकरणक्षम उर्जेचे प्रमाण १३% होते, जे २०३० पर्यंत ५२% होईल. ग्रीड स्थिर करण्यासाठी आम्ही बॅटरी स्टोरेज आणि पश्चिम घाटातील भौगोलिक परिस्थितीचा फायदा घेत 'पंप स्टोरेज' प्रकल्पांवर भर देत आहोत. आम्ही ८०,००० मेगावॅट क्षमतेचे पंप स्टोरेज प्रकल्प सुरू केले आहेत, जे लवकरच एक लाख मेगावॅटपर्यंत पोहोचतील, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# अरावली वाद : सुप्रीम कोर्ट स्थापन करणार नवीन समिती, 100 मीटरच्या नियमावरील बंदी कायम

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा अरावली टेकड्यांच्या व्याख्येबाबत सुरू असलेल्या वादावर महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले आहे. न्यायालयाने असे म्हटले की, हा मुद्दा केवळ तांत्रिक नाही तर देशाच्या पर्यावरणीय भविष्याशी देखील संबंधित आहे. न्यायालयाने स्पष्टपणे निर्देश दिले की, अरावली प्रदेशात कोणतेही बेकायदेशीर खाणकाम सहन केले जाणार नाही, कारण अशा खाणकामाचे परिणाम 'अपरिवर्तनीय आणि दूरगामी' आहेत, जे नंतर दुरुस्त करता येणार नाहीत.न्यायालयाने असाही पुनरुच्चार केला की अरावली प्रदेशाची वैज्ञानिक आणि स्पष्ट व्याख्या निश्चित करण्यासाठी एक उच्च-शक्तीशाली समिती स्थापन केली जाईल. या समितीमध्ये पर्यावरण, वनीकरण, भूगर्भशास्त्र आणि संबंधित क्षेत्रातील स्वतंत्र तज्ज्ञांचा समावेश असेल. न्यायालयाने सर्व पक्षांना, ज्यात अमिकस क्युरीचा समावेश आहे, चार आठवड्यांच्या आत संभाव्य समिती सदस्यांची नावे आणि सूचना सादर करण्यास सांगितले आहे.



न्यायालयाने त्यांच्या पूर्वीच्या निर्णयावरील स्थगिती देखील वाढवली आहे. केवळ शून्य मीटरपेक्षा जास्त उंची असलेल्या टेकड्या अरावली मानण्याची शिफारस करण्यात आली होती. न्यायालयाने यापूर्वी पर्यावरण मंत्रालयाच्या समितीची ही शिफारस पुनर्विचार म्हणून पुढे ढकलली होती. न्यायालयाचे मत आहे की, हा मुद्दा संवेदनशील आहे आणि त्यावर घाईघाईने निर्णय घेता येणार नाही. म्हणून, एक नवीन तज्ज्ञ समिती तथ्यात्मक आणि वैज्ञानिक आधारांवर आधारित नवीन व्याख्या शिफारस करेल.सुनावणी दरम्यान, एका वकिलाने राजस्थानच्या अनेक भागात सुरू असलेल्या बेकायदेशीर खाणकामाचा मुद्दा उपस्थित केला. न्यायालयाने राजस्थान सरकारच्या वकिलाला त्वरित कारवाई करण्याचे निर्देश दिले, असे नमूद करून की, अरावली पर्वतरांगासारखा पर्यावरणीय प्रदेश कोणत्याही निष्काळजीपणाचा भार सहन करू शकत नाही. न्यायालयाने असेही म्हटले आहे की, बेकायदेशीर खाणकाम भविष्यातील पिढ्यांच्या पर्यावरणीय हक्कांवर थेट परिणाम करते आणि म्हणूनच, न्यायालय या प्रकरणाच्या सर्व पैलूंची सखोल तपासणी करणार आहे.

# सोने 5 हजारांनी महाग, चांदीही उसळली

**जळगाव/प्रतिनिधी :** जागतिक बाजारातील वाढती अनिश्चितता तसेच भू-राजकीय तणावाचा परिणाम थेट भारतीय सराफा बाजारावर जाणवत आहे. सुरक्षित गुंतवणुकीच्या शोधात गुंतवणूकदारांचा ओढा सोन्या-चांदीकडे वाढल्याने दोन्ही मौल्यवान धातूंच्या किमती विक्रमी पातळीवर पोहोचल्या आहेत. परिणामी, सर्वसामान्य खरेदीदारांची चिंता अधिक वाढली आहे. आज बाजार सुरू होताच सोन्याच्या दरात मोठी उसळी पाहायला मिळाली. सोन्याच्या किमतीत प्रति तोळा तब्बल ५ हजार रुपयांची वाढ झाली असून, त्यामुळे सोन्याने दीड लाखांचा आकडा पार केला आहे. याचबरोबर चांदीच्या दरातही वाढीचा सिलसिला कायम असून आज चांदीही प्रतिकिलो ५ हजार रुपयांनी महागली आहे. आज २४ कॅरेट सोन्याच्या दरात प्रति तोळा ५ हजार २० रुपयांची वाढ झाली असून, एक तोळा सोने १ लाख ५४ हजार ८०० रुपयांवर पोहोचले आहे. ८ ग्रॅम सोन्याचे दर ४ हजार १६ रुपयांनी वाढून १ लाख २३ हजार ८४० रुपये झाले आहेत. २२ कॅरेट सोन्याचे दर प्रति तोळा ४ हजार ६०० रुपयांनी वाढून १ लाख ४१ हजार ९०० रुपये झाले आहेत. ८ ग्रॅम २२ कॅरेट सोन्याचे दर ३ हजार ६८० रुपयांनी वाढले आहेत. १८ कॅरेट सोन्याच्या दरातही प्रति तोळा ३ हजार ७७० रुपयांची वाढ झाली असून, ८ ग्रॅम सोन्याचे दर ३ हजार १६ रुपयांनी वाढून ९२ हजार ८८८ रुपये झाले आहेत. सोन्याच्या पाठोपाठ चांदीच्या दरातही मोठी वाढ नोंदविण्यात आली आहे. आज प्रतिकिलो चांदीच्या दरात ५ हजार रुपयांची वाढ झाली असून, एक किलो चांदीचा भाव ३ लाख २५ हजार रुपयांवर गेला आहे. जळगाव सराफ बाजारात चांदीच्या दराने विक्रम मोडले आहेत. मंगळवारी एकाच दिवसात चांदीच्या भावात तब्बल १७ हजार रुपयांची वाढ झाली. जळगावच्या सुवर्ण बाजाराच्या इतिहासातील ही एका दिवसातील सर्वाधिक दरवाढ ठरली आहे. सोमवारीही चांदीच्या दरात १० हजार रुपयांची वाढ झाली होती. त्यामुळे अवघ्या दोन दिवसांत चांदीच्या दरात एकूण २७ हजार रुपयांची वाढ झाली आहे.



# 'हिंद-दी-चादर' शहीदी समागमासाठी नांदेडमध्ये आरोग्य यंत्रणा सज्ज

## 10 लाखांहून अधिक भाविकांसाठी 5 दिवस व्यापक वैद्यकीय सेवा

**नांदेड/प्रतिनिधी :** शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम- हिंद-दी-चादर शताब्दी कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यातील संपूर्ण आरोग्य यंत्रणा सज्ज झाली असून, लाखो भाविकांच्या आरोग्य सुरक्षेसाठी अत्यंत काटेकोर, बहुस्तरीय व समन्वयित वैद्यकीय व्यवस्थापन उभारण्यात आले आहे.२४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड शहरात होणा-या मुख्य सोहळ्यासाठी राज्यभरासह देशाच्या विविध भागांतून १० लाखांपेक्षा अधिक भाविक सहभागी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर २२ ते २६ जानेवारी २०२६ या पाच दिवसांच्या कालावधीत अखंड आरोग्य सेवा उपलब्ध असणार आहे. मुख्यमंत्री कार्यालयाच्या स्पष्ट निर्देशानुसार विभागीय आयुक्तजितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले तसेच मुख्यमंत्री कार्यालयातील मुख्य समन्वयक डॉ. रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य व्यवस्थापनाबाबत सविस्तर कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. यासाठी



जिल्हास्तरीय आरोग्य व्यवस्थापन समिती गठीत करून वारंवार आढावा बैठका घेण्यात आल्या आहेत. या नियोजनात जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्था, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, जिल्हा परिषद आरोग्य विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय विष्णुपुरी, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय यांचा सहभाग आहे. यासोबतच नांदेड व परभणी जिल्ह्यातील महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी योजनेशी संलग्न असलेली खाजगी रुग्णालयेही आरोग्य सेवा देणार आहेत. मुख्य कार्यक्रमस्थळी दोन स्वतंत्र बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) उभारण्यात येणार असून, येथे विविध तज्ज्ञ ड?क्टरांच्या माध्यमातून पुढील सेवा दिल्या जाणार आहेत. असंसर्गजन्य आजारांची तपासणी, कर्करोग व दंतरोग तपासणी, महिलांच्या आजारांची विशेष तपासणी, मोफत वैद्यकीय सल्ला व औषधोपचार तसेच तातडीची संदर्भ सेवा व २४ तास रुग्णवाहिका सुविधा,नेत्र तपासणी, मोफत चष्मे व ज्येष्ठांसाठी सहाय्य, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फतही मोफत नेत्र तपासणी शिबिरे, गरजूंना मोफत चष्म्यांचे वाटप तसेच तपासणीनंतर गरजू ज्येष्ठ नागरिकांना काठ्यांचे वितरण केले जाणार आहे.

# किशोरी पेडणेकरांची शिवसेना ठाकरे गटाच्या गटनेतेपदी निवड

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना ठाकरे गटाच्या माजी महापौर आणि नगरसेविका किशोरी पेडणेकर यांची महापालिकेतील गटनेतेपदी निवड करण्यात आली आहे. ठाकरेंच्या शिवसेनेकडून झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत वार्ड क्रमांक १९९ मधून किशोरी पेडणेकर विजयी झाल्या होत्या. त्यांनी शिवसेना शिंदे गटाच्या रुपल कुसळे यांचा पराभव केला होता. गटनेतेपदासाठी शिवसेना ठाकरे गटाकडून विशाखा राउत, किशोरी पेडणेकर, मिलिंद वैद्य आणि श्रद्धा जाधव यांची नावे चर्चेत होती. मात्र अखेरीस पक्षाने किशोरी पेडणेकर यांच्यावर विश्वास दाखवत त्यांची निवड केली. मुंबई महानगरपालिकेत विविध पदांवर कामाचा मोठा अनुभव असलेल्या किशोरी पेडणेकर यांची ही नियुक्ती ठाकरे गटासाठी महत्त्वाची मानली जात आहे. या निवडीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना किशोरी पेडणेकर यांनी सांगितले की, मुंबईच्या महापौरपदाबाबत उद्धव ठाकरे जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल. तसेच महापौरपदासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत, असेही त्यांनी सांगितले. आमच्यावर



कायम संकटं येत राहिली आहेत. पण त्या संकटांना सामोरे जायला आम्ही तयार आहोत. तसेच सभागृहात विरोधकांची पावर दाखवण्यापेक्षा मुंबईच्या भल्या करिता जे काही करता येईल, ते आम्ही करू, असेही किशोरी पेडणेकर यांनी सांगितले. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपा आणि शिंदेसेनेच्या महायुतीला कडवं आव्हान देत उद्धवसेनेने ६५ जागांवर दणदणीत विजय मिळवला होता. या विजयानंतर शिवसेना ठाकरे सेनेने महापौर आणि इतर पदांच्या निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. त्या पार्श्वभूमीवर आज उद्धवसेनेच्या निवडून आलेल्या सर्व नगरसेवकांनी आज आपल्या गटाची नोंदणी केली आहे. दरम्यान, देशातील सर्वात श्रीमंत महापालिका आणि तब्बल २५ वर्षे ठाकरे गटाची सत्ता असलेल्या मुंबई महानगरपालिकेत यावेळी भाजप युतीने सत्ता उलथवून लावली आहे. भाजपला ८९ जागा मिळत ते सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला ६५ जागा, शिंदे गटाच्या शिवसेनेला २९, काँग्रेसला २४, मनसेला ६, एमआयएमला ८, राष्ट्रवादी अजित पवार गटाला ३, राष्ट्रवादी शरद पवार गटाला १ आणि समाजवादी पार्टीला २ जागा मिळाल्या आहेत. दरम्यान, महाराष्ट्रातील सर्व २९ महानगरपालिकांतील महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत २२ जानेवारी रोजी काढली जाणार आहे. सकाळी ११ वाजता मंत्रालयात नगरविकास विभागाकडून ही सोडत होणार असून, कोणत्या प्रवर्गाचा महापौर कोणत्या महानगरपालिकेत बसेल हे त्यादिवशी निश्चित होणार आहे.

# भारताच्या 77 व्या प्रजासत्ताक दिनी जिल्ह्यांमध्ये पालकमंत्री व मंत्री करणार ध्वजवंदन

**मुंबई/प्रतिनिधी :** भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी २०२६ रोजी ध्वजवंदनाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यभर एकाच वेळी सकाळी ९.१५ वाजता आयोजित करण्यात येणार आहे. या मुख्य शासकीय समारंभात निमंत्रितांना सहभागी होता यावे यासाठी या दिवशी सकाळी ८.३० ते १० या दरम्यान ध्वजवंदनाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अर्ध शासकीय समारंभ आयोजित करण्यात येउ नये. जर एखाद्या कार्यालयास अथवा संस्थेला आपला स्वतःचा ध्वजवंदन समारंभ करावयाचा असल्यास त्यांनी तो समारंभ सकाळी ८.३० च्या पूर्वी किंवा १० वाजेनंतर करावा, असे राजशिष्टाचार विभागामार्फत परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

मुंबई येथील प्रमुख समारंभात मुख्यमंत्री यांच्या हस्ते शिवाजी पार्क, दादर मुंबई येथे ध्वजवंदन व समारंभपूर्वक संचलन कार्यक्रम होईल. विभागीय आणि जिल्हा स्तरावर पुढे दर्शविल्याप्रमाणे पालकमंत्री / मंत्री अथवा राज्यमंत्री ध्वजवंदन करतील.

ठाणे- उपमुख्यमंत्री एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे; पुणे- उपमुख्यमंत्री अजित आशाताई अनंतराव पवार; नागपूर- चंद्रशेखर प्रभावती कृष्णराव बावनकुळे; अहिल्यानगर- राधाकृष्ण सिंधुताई एकनाथराव विखे पाटील; सांगली- चंद्रकांत (दादा) सरस्वती बच्चू पाटील; नाशिक- गिरीश गीता दत्तात्रय महाजन; पालघर- गणेश सुभद्रा रामचंद्र नाईक; जळगाव- गुलाबराव रेवाबाई रघुनाथ पाटील; अमरावती- दादाजी रेशमाबाई दगडू भुसे; यवतमाळ- संजय प्रमिला दुलीचंद राठोड; मुंबई शहर- मंगलप्रभात प्रेमकंवर गुमनमल लोढा; रत्नागिरी- उदय स्वरुपा रवींद्र सामंत; धुळे- जयकुमार नयनकुवर जितेंद्रसिंह रावल; जालना- श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे; नांदेड- अतुल लीलावती मोरेश्वर सावे; चंद्रपूर- डॉ.अशोक जनाबाई रामाजी वूईके; सातारा- शंभुराज विजयादेवी शिवाजीराव देसाई; मुंबई (उपनगर)- ॲड.आशिष मिनल बाबाजी शेलार, वाशिम- दत्तात्रय गिरीजाबाई विठोबा भरणे; लातूर- शिवेंद्रसिंह अरुणाराजे अभयसिंहराजे भोसले; सोलापूर- जयकुमार कमल भगवानराव गोरे; हिंगोली- नरहरी सावित्रीबाई सिताराम झिरवाळ; भंडारा- संजय सुशिला वामन सावकारे, छत्रपती संभाजीनगर- संजय शकुंतला पांडुरंग शिरसाट, धाराशिव- प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक, रायगड- भरत विठाबाई मारुती गोगावले; बुलढाणा- मकरंद सुमन लक्ष्मणराव जाधव (पाटील); सिंधुदुर्ग- नितेश निलम नारायण राणे; अकोला- आकाश सुनिता पांडुरंग फुंडकर; बीड- बाबासाहेब शांताबाई मोहनराव पाटील; कोल्हापूर- प्रकाश सुशीला आनंदराव आबिटकर; गडचिरोली- ॲड. आशिष उमादेवी नंदकिशोर जयस्वाल; वर्धा- डॉ.पंकज कांचन राजेश भोयर; परभणी- मेघना दीपक साकोरे-बोर्डीकर; गोंदिया- इंद्रनील अनिता मनोहर नाईक आणि नंदुरबार- योगेश ज्योती रामदास कदम.

राष्ट्रध्वजवंदन करणारे पालकमंत्री / मंत्री अथवा राज्यमंत्री काही अपरिहार्य कारणामुळे कार्यक्रम स्थळी उपस्थित राहू



न शकल्यास विभागीय मुख्यालयी विभागीय आयुक्तांनी आणि जिल्हा मुख्यालयी जिल्हाधिकारी यांनी तसेच इतर विभागीय व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी अनुक्रमे संबंधित विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी राष्ट्रध्वजवंदन करतील. संबंधित प्रांत अधिकारी व तहसीलदार हे अनुक्रमे जिल्हा उपविभागीय व तालुका मुख्यालयी ध्वजवंदन समारंभाच्या ठिकाणी शासकीय कार्यक्रमांचे अध्यक्षस्थान स्वीकारतील.

राज्यात वरील दिवशी सर्व शासकीय व सार्वजनिक इमारतींवर, किल्ल्यांवर तसेच जिल्ह्यांमध्ये ऐतिहासिक महत्त्वाच्या ठिकाणी राष्ट्रध्वज उभारण्यात यावेत. राष्ट्रध्वजाला वंदन करताना राष्ट्रगीत म्हणण्यात यावे अथवा वाजविण्यात यावे आणि त्यानंतर सावधान स्थितीत येउन राज्यगीत वाजविण्यात यावे, असेही कळविण्यात आले आहे.

राष्ट्रध्वज लावण्याच्या योग्य पद्धतीबाबत शासन परिपत्रक क्रमांक एफएलजी-१०९१/३०, दिनांक २ मार्च १९९१ तसेच क्रमांक एफएलजी-१०९१(२)/३०, दिनांक ५ डिसेंबर १९९१ तसेच क्रमांक एफएलजी १०९८/ ध्वजसंहिता/३०, दिनांक ११ मार्च १९९८ अन्वये दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी. याप्रसंगी सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थित रहावे. तसेच उत्सव अथवा औपचारिक प्रसंगी परिधान करावयाचा राष्ट्रीय पोशाख प्रजासत्ताक दिन समारंभप्रसंगी उपस्थित राहणा?या सर्व अधिकारी, कर्मचारी व व्यक्तींनी परिधान करावा. स्थानिक लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्यसैनिक, शहीद जवानांच्या पत्नींना व आई-वडील यांना तसेच आणिबाणीच्या कालावधीमध्ये कारावास भोगलेल्या व्यक्ती यांना समारंभास निमंत्रित करावे. अधिकाधिक नागरिकांना हा सोहळा घरबसल्या पाहता यावा, यासाठी वेबसाईटद्वारे थेट प्रक्षेपण करण्याचा प्रयत्न करावा, अशा सूचना या परिपत्रकाद्वारे देण्यात आल्या आहेत.

# लग्नास नकार म्हणजे आत्महत्येचे कारण होत नाही -उच्च न्यायालय

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** प्रेमसंबंधांनंतर दुरावा निर्माण होउन प्रेयसीकडून लग्नास नकार मिळाल्यामुळे तरुणाने जीवन संपवले असेल तर त्याला 'आत्महत्येस प्रवृत्त केले' असे म्हणता येणार नाही, असा स्पष्ट निर्वाळा देत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद ( छत्रपती संभाजी नगर) खंडपीठाचे न्या. संतोष चपळगावकर यांनी तरुणीविरुद्ध दाखल प्राथमिक माहिती अहवाल (एफआयआर) आणि दोषारोपपत्र रद्द करण्याचे आदेश दिले आहेत.

बीड येथील शिवाजीनगर पोलिस ठाण्यात तक्रारदाराचा मुलगा (नाव बदललेले) आत्महत्येप्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला होता. मुलाने डिसेंबर २०२३ मध्ये गळफास लावून आत्महत्या केली होती. अर्जदार तरुणीसोबत असलेल्या प्रेमसंबंधांमुळे आणि तिने लग्नास नकार दिल्याने त्याने हे पाउल उचलल्याचा आरोप आकाशच्या पालकांनी केला होता. या प्रकरणात तरुणीच्या वतीने ॲड. सय्यद तौसीफ यासीन यांनी युक्तिवादात केवळ प्रेमसंबंध तुटणे किंवा मोबाईल फोनवर संवाद होणे ही कृती आत्महत्येला प्रवृत्त करण्याच्या व्याख्येत बसत नाही, असे न्यायालयात सांगितले.



न्या. चपळगावकर यांनी हा युक्तिवाद मान्य करत स्पष्ट केले की, आत्महत्येचा गुन्हा सिद्ध होण्यासाठी आरोपीचा विशिष्ट हेतू असणे आवश्यक आहे, जो या प्रकरणात दिसून येत नाही. केवळ लग्नास नकार देणे हा कोणताही सकारात्मक गुन्हा किंवा चिथावणी ठरू शकत नाही. पुराव्यांवरून आकाशला आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याचे दिसून येत नाही. न्यायालयाने बीड येथील मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्याकडे प्रलंबित असलेले आरोपपत्र रद्द करण्याचे आदेश दिले.

# जेन-जीच्या निषेधानंतर नेपाळमध्ये निवडणुकीची तयारी सुरु

**काठमांडू/वृत्तसंस्था :** नेपाळमध्ये गेल्या वर्षी जनरेशन झ च्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनांनंतर आता मार्चमध्ये होणा-या निवडणुकांची तयारी जोरात सुरू आहे. सत्तास्थापन करण्याच्या या शर्यतीत आतापर्यंत चार माजी पंतप्रधानांनी वेगवेगळ्या मतदारसंघांतून आपले नामांकन अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे २०२६ मधील नेपाळची निवडणूक अत्यंत मनोरंजक ठरण्याची चिन्हे दिसत आहेत. नेपाळमध्ये सार्वत्रिक निवडणूक येत्या ५ मार्च रोजी होणार आहे.



यावेळी नेपाळचे चार माजी पंतप्रधान पुन्हा एकदा सत्तेसाठी मैदानात उतरले आहेत. यामध्ये नेपाळ कम्युनिस्ट पार्टी (युनिफाइड मार्क्सिस्ट-लेनिनिस्ट) चे अध्यक्ष आणि अपदस्थ पंतप्रधान के. पी. शर्मा ओली हे प्रमुख आहेत. ते झापा५ मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत.नेपाळ कम्युनिस्ट पार्टी (माओवादी सेंटर) चे माजी पंतप्रधान पुष्पकमल दाहाल प्रचंड यांनी रुकुम पूर्व मतदारसंघातून नामांकन दाखल केले आहे. याशिवाय, नेपाळ कम्युनिस्ट पार्टीचे माजी पंतप्रधान माधव कुमार नेपाळ यांनी रौतहट१ मतदारसंघातून, तर प्रगतिशील लोकशाही पक्षाचे नेते आणि माजी पंतप्रधान बाबुराम भट्टराई यांनी गोरखा २ मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

नेपाळच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीत चार माजी पंतप्रधान निवडणूक रिंगणात असले, तरी दोन अन्य माजी पंतप्रधान- नेपाळी काँग्रेसचे नेते शेर बहादुर देउबा आणि नेपाळ कम्युनिस्ट पार्टीचे ज्येष्ठ नेते झाला नाथ खनाल-या शर्यतीतून बाहेर आहेत.

उल्लेखनीय म्हणजे, ९ सप्टेंबर रोजी युवा नेतृत्वाखालील जनरेशन झ च्या हिंसक आंदोलनांनंतर के. पी. शर्मा ओली यांनी पंतप्रधान पदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळेच नेपाळमध्ये पुन्हा सार्वत्रिक निवडणूक घेणे अपरिहार्य झाले.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ५८ ■ गुरुवार, २२ जानेवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# आर्वीत 'सायको'चा रक्तपात, भाजी बाजारात मृत्यूचा थरार; दोन वृद्धांची निर्घृण हत्या

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील आर्वी शहरात बुधवारी (दि. २१) सकाळी असा थरार अनुभवला, की क्षणात शांत शहर मृत्यूच्या सावलीत गेले. मानसिक आजाराने ग्रस्त २२ वर्षीय तरुणाने शहराच्या मध्यवस्तीत अक्षरशः हैदोस घालत दोन निष्पाप वृद्ध नागरिकांची निर्घृण हत्या केली. इंदिरा चौक, भाजी बाजार आणि आसपासच्या वॉर्डात घडलेल्या या रक्तरंजित घटनेने संपूर्ण शहर सुन्न झाले असून नागरिकांच्या मनात भीती, संताप आणि अस्वस्थता दाटून आली आहे.

मथुरेश गजानन लाडके ऊर्फ मत्या (वय २२, रा. नेताजी वॉर्ड) असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी मानसिक आजाराने ग्रस्त असून त्याची औषध संपली होती, त्यात त्याने बुधवारी सकाळी त्याची आजी वत्सलाबाई सोबत घरगुती वाद झाला. वाद इतका टोकाला गेला की त्याने आजीचा गळा आवळून ठार मारण्याचा प्रयत्न केला. नागरिकांच्या आरडाओरडीनंतर तो तेथून पळून गेला, मात्र त्यानंतर जे घडले, ते आर्वीच्या इतिहासात काळा दिवस ठरला.

बुधवारी सकाळी सुमारे ८ वाजताच्या सुमारास आरोपी नग्न अवस्थेत नेताजी वॉर्डात फिरताना दिसला. राजू गुप्ता यांच्या घरासमोर अंगणात खेळत असलेल्या आठ वर्षांच्या चिमुकलीवर त्याने अचानक हल्ला चढवून गळा दाबण्याचा प्रयत्न केला. क्षणात किंकाळ्या उठल्या. नागरिक



धावले. मुलगी कशीबशी सुटली; पण तिला वाचवण्यासाठी गेलेल्या एका व्यक्तीवर आरोपीने हल्ला करून त्याला जखमी केले. परिसरात प्रचंड गोंधळ उडाला.

याच अवस्थेत आरोपी हातात लाकडी पाटी घेऊन इंदिरा चौकाकडे धावला. चौकात गभने यांच्या घराजवळून जात असलेल्या रामकृष्ण श्रावण राऊत (वय ७०, रा. हनुमान वॉर्ड) यांच्या डोक्यावर त्याने जोरदार वार केला. रक्ताच्या थारोळ्यात कोसळलेल्या राऊत यांचा जागीच मृत्यू झाला. काही मिनिटांतच आरोपी भाजी बाजारात पोहोचला. शेतमाल विक्रीसाठी आलेले रामराव महादेव वांगे (वय ८५, रा. मारुती वॉर्ड) यांच्यावरही त्याने बेछूट हल्ला चढवला. गंभीर जखमी अवस्थेत वांगे यांना प्रथम उपजिल्हा रुग्णालयात व नंतर सेवाग्राम येथे हलविण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचाही मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच आर्वी पोलिसांनी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत संतप्त नागरिकांनी आरोपीला पकडले होते. वाटेत येणाऱ्यांवर तो सतत हल्ले करत असल्याने सुमारे ५० ते ६० नागरिकांनी त्याला चोप दिला. त्याचे हातपाय बांधून लाकडी काठीला बांधण्यात आले आणि खांद्यावर उचलून थेट पोलिस ठाण्यात नेण्यात आले. मारहाणीत आरोपी जखमी झाल्याने त्यालाही जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या घटनेनंतर आर्वी शहरात तीव्र असंतोष उसळला आहे. मानसिक आजार असलेला युवक नग्न अवस्थेत शहरात मोकळेपणाने कसा फिरत होता, कुटुंबीयांनी योग्य ती खबरदारी का घेतली नाही, पोलिस व प्रशासनाची यंत्रणा कुठे होती, दोन निष्पाप वृद्धांचा बळी गेल्याला जबाबदार कोण, असे अनेक प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.दरम्यान, या प्रकरणी आर्वी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास ठाणेदार सतीश डेहणकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. रक्तरंजित घटनेच्या धक्क्यातून शहर सावरत असतानाच, 'उद्या पुन्हा असे काही घडणार नाही ना' हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात घर करून बसला आहे.

# कृष्णगीरी धोत्रा रेल्वे येथे शिवमहापुराण कार्यक्रमात खासदारांचा सन्मान

## मंदिर प्रतिष्ठानतर्फे शाल-श्रीफळ देऊन सत्कार; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**कृष्णगीरी धोत्रा जनमाध्यम:** स्थानिक कृष्णगीरी धोत्रा रेल्वे स्टेशन परिसरात आयोजित शिवमहापुराण कार्यक्रमात खासदार अमर काळे यांनी उपस्थिती नोंदवून दर्शन घेतले. या वेळी मंदिर प्रतिष्ठानतर्फे महेश गुल्हाने यांनी खासदारांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मानपूर्वक सत्कार केला. यावेळी राष्ट्रवादीचे (श.प) जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले उपस्थित होते,



खासदारांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष शोभा प्राप्त झाली. उपस्थित शिवभक्त व नागरिकांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. मार्गदर्शनपर भाषणात खासदार काळे यांनी धार्मिक उपक्रमांबरोबरच सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग वाढवण्याचे आवाहन केले. अशा कार्यक्रमांतून सामाजिक ऐक्य, संस्कार आणि परंपरेचे जतन घडते, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाची सुरुवात भक्तीगीत व पुराणसादरीकरणाने झाली. सत्कारप्रसंगी मंदिर प्रतिष्ठानचे पदाधिकारी, स्थानिक मान्यवर व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांनी शिवमहापुराणासारख्या धार्मिक कार्यक्रमांचे नियमित आयोजन व्हावे, तसेच लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीमुळे या उपक्रमांना अधिक प्रेरणा मिळते, अशी भावना व्यक्त केली.

## 'लाडकी बहीण' केवळ कागदावरच

# निधी गायब; महिलांची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

### दोन महिने पैसे नाहीत, ई-केवायसी करूनही फसवणूक; आधी मतं घेतली, आता दुर्लक्ष चा आरोप

**वर्धा जनमाध्यम :** राज्य शासनाची गाजलेली लाडकी बहीण योजना आज जिल्ह्यातील महिलांसाठी डोकेदुखी ठरत असल्याचे चित्र आहे. मागील दोन महिन्यांपासून योजनेचा निधी जमा न झाल्याने संतप्त महिलांनी बुधवारी थेट जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढत प्रशासनाला जाब विचारला. आम्हाला आमचा हक्क द्या, योजना सुरू ठेवा नाहीतर बंद जाहीर करा, अशा संतप्त घोषणांनी परिसर दणाणून गेला.



महिलांना आर्थिक आधार देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत दरमहा १५०० रुपये देण्याचे आश्वासन शासनाने दिले होते. सुरुवातीला नियमितपणे निधी जमा झाला, मात्र निवडणुकीनंतर या योजनेचा फज्जा उडाल्याचा आरोप महिलांनी केला आहे. अपात्र महिलांना वगळण्यात आले असले, तरी पात्र महिलांनाही निधीपासून वंचित ठेवण्यात येत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला.

जून महिन्यापासून एकही रुपया खात्यात आलेला नाही, ई-केवायसी पूर्ण असूनही दोन महिने पैसे नाहीत, अशा तक्रारी करत महिलांनी आपली व्यथा मांडली. शासनाने ई-केवायसीची अट घालून महिलांची कागदपत्रे पूर्ण करून घेतली; मात्र लाभ देताना हात आखडता घेतल्याने महिलांमध्ये प्रचंड असंतोष आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील विविध गावांमधील महिलांनी एकत्र येत जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. मात्र प्रशासनाकडून शासनाकडून निधी आला तरच पैसे जमा होतील, असे उत्तर मिळाल्याने महिलांचा संताप आणखी वाढला. ठोस उत्तर वा वेळापत्रक न मिळाल्याने अखेर हताश मनाने महिला आपल्या गावाकडे परतल्या.

दरम्यान, लाडकी बहीण योजनेचा निधी तात्काळ जमा न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा महिलांनी दिला असून शासनाच्या आश्वासनांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### जिल्हा रुग्णालयातील मृत अर्भकानंतर पुन्हा धक्कादायक प्रकार; प्रशासन झोपेतच

# आई कोण, पाप कोणाचे, जुनापानी चौकात अर्भक आढळल्याने वर्धा हादरला

**वर्धा जनमाध्यम :** काही दिवसांपूर्वी जिल्हा रुग्णालयाच्या शौचालयात नवजात मृत अर्भक आढळून आलेल्या घटनेचा उलगडा होत नाही, तोच बुधवारी (दि. २१) दुपारी वर्धा शहरातील पिपरी मेघे येथील जुनापानी चौकात राष्ट्रीय महामार्गालगत मोकळ्या जागेत जखमी अवस्थेत जिवंत नवजात स्त्री अर्भक आढळून आल्याने संपूर्ण जिल्हा हादरून गेला. जिथे विकासाचे दावे केले जातात, तिथे माणुसकीला काळीमा फासणारी ही घटना समाजाच्या संवेदनशीलतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी ठरली आहे.

नागपूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गाच्या सर्व्हिस रोडलगत मांस व खाद्यपदार्थ विक्रीची दुकाने



आहेत. याच परिसरातील मोकळ्या जागेत अचानक बाळाच्या रडण्याचा आवाज ऐकू आला. आवाजाच्या दिशेने पाहताच रक्ताने माखलेले, जखमी अवस्थेतील नवजात अर्भक दिसल्याने नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली. त्या वेळी तेथून जात असलेले गौरव वीरखडे व त्यांची बहीण श्रद्धा श्रीकांत प्रधान यांनी प्रसंगावधान राखत थांबले. काही क्षणातच रोहित येटे, सार्थक वाघाडे व अभिषेक सिंगणधुपे हेही घटनास्थळी दाखल झाले.

क्षणाचाही विलंब न करता गौरव वीरखडे यांनी बाळाला ताब्यात घेतले आणि पोलिसांना माहिती देत स्वतःच्या वाहनातून जिल्हा रुग्णालय गाठले. माहिती मिळताच रामनगर पोलिसांचे पथक रुग्णालयात पोहोचले, तर दुसऱ्या पथकाने घटनास्थळी पंचनामा केला. वैद्यकीय तपासणीत अर्भकाच्या शरीरावर जखमा आढळून आल्या असून ते स्त्री अर्भक असल्याचे स्पष्ट झाले.

जिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचारानंतर अर्भकाला सेवाग्राम येथील रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी नागपूर येथील रुग्णालयात रेफर करण्यात आले. महिला पोलिस कर्मचारी सविता वैरागडे व पोलिस कर्मचारी हरी राठोड यांनी रुग्णवाहिकेद्वारे डॉक्टरांच्या पथकासह अर्भकाला नागपूरला हलविले. सध्या तिच्यावर उपचार सुरू असून तिची प्रकृती नाजूक असल्याचे सांगण्यात येत आहे.

### रक्ताने माखलेले रडणे... नागरिकांच्या सतर्कतेमुळे चिमुकलीला जीवदान

**अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल**

या अमानुष कृत्याप्रकरणी रोहित येटे यांच्या तक्रारीवरून रामनगर पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाळाची आई कोण, प्रसूती कुठे झाली, बाळाला महामार्गालगत कोणी व कशासाठी टाकले, याचा तपास अत्यंत गोपनीय पद्धतीने सुरू आहे. दरम्यान, नागरिकांच्या सतर्कतेमुळे आणि वेळेवर दाखवलेल्या माणुसकीमुळे त्या चिमुकलीचे प्राण वाचले. मात्र वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे समाज कुठे चालला आहे, असा प्रश्न उपस्थित होत असून दोषींना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी सर्वत्र होत आहे.

### २ तासांत चोरट्याचा गेम ओव्हर

# रापम बसमधील ४६ हजारांची चोरी; कारंजा पोलिसांची कारवाई

**कारंजा (घा.) जनमाध्यम:** बसमध्ये खिसेकापूचा डाव, पण पोलिसांच्या वेगवान कारवाईने चोरट्याचा अवघ्या दोन तासांत खेळ खल्लास! तळेगाव बसस्थानकावरून कारंजाकडे येणाऱ्या रापमच्या बसमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशाच्या खिशातून ४६ हजार रुपयांची रोकड लंपास करणाऱ्या चोरट्याला कारंजा पोलिसांनी क्षणाचाही विलंब न लावता जेरबंद केले. चोरीची संपूर्ण रक्कमही पोलिसांनी हस्तगत केली.



नरेंद्र राजाराम मोटघरे (रा. कारंजा) हे २० रोजी दुपारी तळेगाव येथून कारंजाच्या दिशेने रापमच्या बसने प्रवास करत होते. गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या खिशातील ४६ हजार रुपये चोरून पोबारा केला. कारंजा बसस्थानकावर उतरताच खिशाला हात घातल्यावर चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. क्षणाचाही विलंब न करता त्यांनी थेट कारंजा पोलिस ठाणे गाठून तक्रार नोंदवली.

तक्रार मिळताच ठाणेदार प्रल्हाद मदन यांनी तपासाची सूत्रे हातात घेतली. पोलिसांचे स्वतंत्र पथक तात्काळ मैदानात उतरले. बसस्थानक परिसर, मार्गावरील हालचाली, संशयितांची माहिती आणि तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी अवघ्या दोन तासांत चोरट्याचा माग काढत त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने चोरीची कबुली दिल्यानंतर त्याच्याकडून संपूर्ण ४६ हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली. या धडाकेबाज कारवाईत पोलिस उपनिरीक्षक सतीश जायभाये, निलेश मंडारी, दिनेश घसाड, आशिष कालोकार, अमोल मानमोडे व समाधान पांडे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. कारंजा पोलिसांच्या या झटपट कारवाईमुळे प्रवाशांनी समाधान व्यक्त केले असून बसमधील चोरी करणाऱ्यांना कडक संदेश मिळाला आहे.

# कृषि, पशुसंवर्धन व मिनी सरस वर्धीनी महोत्सव शेतकऱ्यांसाठी सुवर्णसंधी

## पालकमंत्री डॉ. भोयर यांचे नागरिकांसाठी आवाहन

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा शहरातील स्वावलंबी विद्यालयाच्या मैदानावर दि. २३ ते २७ जानेवारी या कालावधीत जिल्हास्तरीय कृषि, पशुसंवर्धन व मिनी सरस वर्धीनी महोत्सव आयोजित केला जाणार आहे. पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवात २०० स्टॉल्स उभारण्यात येणार असून शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, शासनाच्या योजना आणि उत्पादन विक्रीची थेट संधी मिळणार आहे.

महोत्सवाचे उद्घाटन दि. २३ जानेवारी रोजी होईल. दुसऱ्या दिवसापासून तीन दिवस शेतकऱ्यांसाठी परिसंवाद आणि व्याख्याने होणार आहेत. पाचव्या दिवशी शेतकऱ्यांचा सन्मान व समारोप करण्यात येणार आहे.




यामध्ये कृषि तंत्रज्ञान, निविष्ठा, यंत्रसाधने, रोपवाटिका, सुक्ष्मसिंचन, मूल्यवर्धन प्रक्रिया, निर्यात संधी आणि ग्राहक विपणन साखळी यावर मार्गदर्शन दिले जाणार आहे. तसेच शेतकऱ्यांनी उत्पादन केलेला माल, जसे तूर, मूग, हळद, मसाले, तीळ, सेंद्रिय गुळ, भाजीपाला व फळे थेट ग्राहकांना विक्रीसाठी उपलब्ध होईल. महोत्सवात शासकीय योजना ४०, कृषि निविष्ठा ४०, शेतकरी उत्पादक कंपनी ४०, महिला बचत गट १५, खाद्यपदार्थ १५, सुक्ष्म अन्न प्रक्रिया २०, इतर विक्री २०, यंत्रसाधने व रोपवाटिका ८, देखावे १०, सूक्ष्मसिंचन ३ असे स्टॉल्स राहणार आहेत.

पालकमंत्री डॉ. भोयर यांनी नागरिकांना आणि शेतकऱ्यांना महोत्सवाला भेट देऊन आधुनिक तंत्रज्ञान आणि शासनाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# स्मृतिदिनातून समाजऋणाची परतफेड गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**हिंगणघाट जनमाध्यम :** समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण हाच खरा आधार असून, गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणप्रवासाला बळ देण्याचा स्तुत्य उपक्रम दे. सि. हेमके गुरुजी स्मृती प्रतिष्ठान, वर्धा यांच्या वतीने राबविण्यात आला. स्व. कमलबाई देवरावजी हेमके यांच्या स्मृतिदिन व स्व. रमेश नारायण धात्रक यांच्या जयंतीनिमित्त स्पंदन वसतिगृह, हिंगणघाट येथे गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.



या कार्यक्रमास हिंगणघाट नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष डॉ. नयना तुळसकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. यावेळी नगरसेवक रवीला आखाडे, संचालक मंडळातील लोणारे, हेमके तसेच प्रतिष्ठानचे पदाधिकारी, कार्यकर्ते व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शैक्षणिक साहित्याचे वाटप करताना नगराध्यक्ष डॉ. नयना तुळसकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, शिक्षणामुळेच व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो. आर्थिक अडचणींमुळे कोणाच्याही शिक्षणात खंड पडू नये, यासाठी समाजाने पुढे येणे गरजेचे आहे. स्मृतिदिन व जयंतीनिमित्त असे उपक्रम राबविणे ही समाजाप्रतीची जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

गरजू विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आत्मविश्वास दिसून येत होता. शिक्षणाच्या माध्यमातून संधीची समानता निर्माण होते आणि उज्ज्वल भविष्यासाठी भक्कम पायाभरणी होते. स्मरणातून समाजोपयोगी कार्याची प्रेरणा देणारा हा उपक्रम उपस्थितांसाठी आदर्श ठरला.

# मांडगाव ग्रामपंचायतचे विजेचे बिल थकीत; गाव अंधकारमय

## विद्युत पुरवठा बंद, पथदिवे गाढ अंधारात

**मांडगाव जनमाध्यम :** स्थानिक मांडगाव ग्रामपंचायतचे विजेचे बिल न भरल्यामुळे संपूर्ण गाव अंधकारमय झाले आहे. ग्रामपंचायतीच्या स्ट्रीट लाईटचे १२९ दिवसांचे विजेचे बिल, एकूण ६,३२,९३६ रुपये थकीत असल्याने विजेचा पुरवठा बंद करण्यात आला आहे.

गावातील रस्ते, चौक, बाजारपेठा आणि सार्वजनिक स्थळांवर अंधार पसरला, नागरिकांना सुरक्षिततेसाठी मोठ्या धोक्यांना सामोरे जावे लागले आहे. बाजाराच्या दिवशीही गाव गढद अंधारात बुडल्याने नागरिकांचा संताप वाढला आहे.

**जिल्हा परिषदेच्या निधीचा अभाव : ग्रामपंचायतीवर परिणाम**

विजेचे बिल दरवर्षी जिल्हा परिषदेच्या विशेष निधीवरून भरले जाते, मात्र यंदा निधी उपलब्ध नसल्यामुळे ग्रामपंचायतीला बिल भरणे शक्य झाले नाही. विद्युत अभियंत्यांनी सांगितले की, आम्ही आधीही नोटीस दिल्या होत्या, शेवटच्या क्षणीही आदेश ऐकण्यास तयार नसल्यामुळे आम्हाला वरिष्ठांच्या आदेशानुसार विजेचा पुरवठा बंद करावा लागला.

**पथदिवे बंद : नागरिकांचा राग उफाळला-** गावातील बस स्टॉप चौकातील पथदिवे चार ते पाच वर्षांपासून बंद आहेत. नागरिकांनी वारंवार निवेदन दिले, तरीही प्रशासनाकडून कोणतीही कारवाई झाली नाही. यामुळे तिर्थक्षेत्र नगरीतील स्ट्रीट लाईट बंद असणे गंभीर प्रश्न ठरला आहे, सामाजिक कार्यकर्ते हेमंत पाहुणे, अनिल आडकिने आणि इतर नागरिकांनी विजेचे बिल लवकर भरणे आणि स्ट्रीट लाईट चालू करण्याची मागणी केली आहे. ग्रामस्थांनीही सुरक्षितता आणि अंधकारमुक्त गावासाठी तातडीने कारवाई करण्याची ताकीद दिली आहे.


## जाहिर नोटिस

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार प्रशांत सुरेशराव बोकडे यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणे: मौजा सावंगी मेघे, मौजा नं. १३८, प. ह. नं. १९, ता. व जि. वर्धा येथील मालमत्ता कं. १३६६ शेत सर्वे कं. ४०५/१ प्लॉट कं. ३ एकूण आराजी ४२२.५० चौ. मी. या वर बांधलेल्या लक्ष्मी अपार्टमेन्ट मधील दुसऱ्या मजल्या वरील फ्लॅट कं. ब-३ ज्याची बिल्ट अप आराजी ७९.७१ चौ. मीटर म्हणजेच ८५७.६७ चौ. फुट ज्याचा अविभक्त हिस्सा ८.७१% इतकी असुन त्याची चतुःर्सिमा :-

पुर्वेसः सावंगी मेघे ते पालोती रोड,

पश्चिमेसः प्लॉट नं. १४ व १५, उत्तरेसः प्लॉट नं. २, दक्षिणेसः प्लॉट नं. ४, वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. २०,००,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून तीन दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**ॲड. सचिन एस. कुरझडकर**
**साई नगर वर्धा**
**मो. नं. ९८६००४१३६१**

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# ग्रीनलँडचा गुंता

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे ‘अमेरिका फर्स्ट’च्या नावाखाली सध्या मनमानी करत सुटले आहेत. संयुक्त राष्ट्रे, जी-८, क्वाड अशा वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय संघटनांच्या व्यासपीठावरून लोकशाही शांतता, परस्पर सामंजस्य अशा तत्त्वांचा उद्घोष करणारे ट्रम्प ‘अमेरिका फर्स्ट’ या नावाखाली उघड उघड दमदाटीचे राजकारण करत आहेत. इराणमधील निदर्शकांना उचकावतानाच त्या देशावर हल्ला करण्याची त्यांनी धमकी दिली आहे. व्हेनेझुएलाचे अध्यक्ष मादुरो यांच्या मुसक्या बांधून, त्यांना अटक करून अमेरिकेत आणण्यात आले. ग्रीनलँड बेट ताब्यात घेण्याचा मानस व्हाईट हाऊसने यापूर्वीच व्यक्त केला होता आणि त्यासाठी लष्करी बळाच्या वापराचा पर्याय खुला असल्याचेही स्पष्ट केले होते. ट्रम्प यांचा ग्रीनलँडच्या नकाशाकडे पाहतानाचा एक फोटो व्हाईट हाऊसने शेअर केला. ‘परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहे’, अशी कॅप्शन या फोटोला दिली होती. हा फोटो पोस्ट केल्यानंतर डेन्मार्कने अमेरिकेशी वाटाघाटी करणार असल्याचे जाहीर केले आहे. डेन्मार्कचे ग्रीनलँडवरील काही भागांवर प्रभुत्व आहे. कोणत्याही परिस्थितीत ट्रम्प यांना ग्रीनलँड ताब्यात हवे आहे. अन्यथा चीन किंवा रशिया ग्रीनलँड ताब्यात घेतील, असे त्यांचे मत आहे. युरोपियन युनियनने याबाबत तीव्र मतभेद व्यक्त केले आहेत. डेन्मार्क हा ‘नाटो’चा (नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन) सदस्य असलेला देश आहे. ग्रीनलँडवर नियंत्रण मिळवण्यासाठी लष्कराचा वापर करण्यापेक्षा शक्यतो ‘डील’ करण्यास अग्रक्रम दिला जाईल, असे ट्रम्प यांचे धोरण आहे. शेवटी ट्रम्प हे एक शुद्ध व्यापारी आहेत, हे लक्षात ठेवले पाहिजे! ग्रीनलँडवर लष्करी कारवाई केल्यास ‘नाटो’मधील देशांशी असलेले संबंध बिघडतील, असे डेन्मार्कला वाटते. उलट ‘नाटो’चे काय व्हायचे ते होऊद्या, पण ग्रीनलँड कब्जात घेणार म्हणजे घेणार. आम्हाला ‘नाटो’ची जितकी गरज आहे, त्यापेक्षा अधिक गरज ‘नाटो’ला आमची आहे, अशी गर्जना ट्रम्प यांनी केली आहे. जगातील सर्वात मोठे बेट असलेल्या ग्रीनलँडच्या सभोवतालचा समुद्र सध्या रशियन आणि चिनी जहाजांनी व्यापलेला आहे. हेच कारण देत ट्रम्प यांच्याकडून ग्रीनलँडचा ताबा मिळवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या पार्श्वभूमीवर फ्रान्स, जर्मनी, ब्रिटन, नेदरलँड, फिनलंड, नॉर्वे आणि स्वीडन या युरोपीय देशांनी आपल्या सैन्य तुकड्या ग्रीनलँडमध्ये पाठवल्या आहेत. ग्रीनलँडला पाठिंबा दर्शवण्यासाठीच हे पाऊल उचलण्यात आले आहे. ट्रम्प हे कोणाचेही ऐकण्याच्या मनःस्थितीत नसून, त्यामुळे त्यांनी या सर्व युरोपीय देशांवर दहा टक्के आयात शुल्क लादण्याची घोषणा केली आहे. एक फेब्रुवारीपासून या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे. अमेरिकेचा ग्रीनलँडच्या खरेदीचा करार पूर्णत्वास गेला नाही, तर एक जूनपासून हे शुल्क २५ टक्क्यांपर्यंत वाढवले जाईल, अशी थेट भीतीही त्यांनी दाखवली आहे. एवढेच नव्हे, तर जागतिक शांतता आणि सुरक्षिततेचे रक्षण करण्यासाठी या देशाने स्वतःच निर्माण केलेली धोकादायक परिस्थिती लवकरात लवकर संपवणे गरज आहे. अन्यथा कठोर उपाययोजना केल्या जातील, अशी उघड धमकी ट्रम्प यांनी दिली आहे. रशिया किंवा चीन हे ग्रीनलँड ताब्यात घेण्याची शक्यता असून, त्यांना रोखण्यासाठी हा भूभाग अमेरिकेच्या ताब्यात असणे आवश्यक असल्याचा युक्तिवाद ट्रम्प यांनी केला आहे. वास्तविक हे दोन देश ग्रीनलँड ताब्यात घेतील, असा कोणताही पुरावा नाही, अथवा तसा इरादा या देशांनी व्यक्तदेखील केलेला नाही. वस्तुतः ग्रीनलँड अमेरिकेलाच हवा आहे आणि त्यासाठी ट्रम्प यांनी हा बागुलबुवा निर्माण केला आहे. खरे तर ग्रीनलँड हा कित्येक वर्षे डेन्मार्कचा अधिकृत भूभाग मानला जात असे. १९५३ मध्ये ग्रीनलँडला डेन्मार्कचा भाग म्हणून मान्यता मिळाली. तेथील ५६ हजार नागरिकांपैकी १९ टक्के हे ‘इन्युइट’ आहेत. आर्क्टिक किंवा उत्तर ध्रुवीय प्रदेशातील स्थानिक लोकांचा गट, जो प्रामुख्याने उत्तर कॅनडा, अलास्का आणि ग्रीनलँडमध्ये राहतो, त्यांना ‘इन्युइट’ असे संबोधले जाते. ते पारंपरिकरीत्या शिकार, मासेमारी आणि फरचे कपडे बनवणे ही कामे करतात. डेन्मार्कने १९७८ साली ग्रीनलँडच्या नागरिकांना ‘होमरूल’ किंवा मर्यादित स्वातंत्र्य घेण्याविषयी सार्वमत घेण्याची मान्यता दिली. २००८ साली अशाप्रकारे सार्वमत घेतले गेले, तेव्हा ग्रीनलँडमधील ७६ टक्के लोकांनी ‘होमरूल’ला पसंती दिली. याअंतर्गत ग्रीनलँडमध्ये स्वतंत्र संसद उभारण्यात आली. परराष्ट्र धोरण, चलन आणि संरक्षण यांचा अपवाद करता इतर बहुतेक क्षेत्रांबाबतचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य डेन्मार्कने ग्रीनलँडला बहाल केले आहे. एकूण ग्रीनलँड हा स्वतंत्र देश नसला, तरी तो डेन्मार्कचा स्वायत्त प्रांत मानला जातो. ग्रीनलँड ताब्यात घेण्याची कल्पना १८६७ मध्ये अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष अँड्र्यू जॉन्सन यांनी प्रथम मांडली होती. १९१० मध्ये तेव्हाचे अध्यक्ष विल्यम टॅफ्ट यांनीही ग्रीनलँड घशात घालण्याचा प्रस्ताव मांडला होता. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी अमेरिकेने ग्रीनलँडचा ताबा घेतला होता. अन्य कोणत्याही देशाला तेथे येण्यापासून रोखले होते. त्यानंतर डेन्मार्ककडे ग्रीनलँडच्या खरेदीचा प्रस्ताव सादर केला होता. आता हे बेट हातात आल्यास आर्क्टिकजवळून अटलांटिक पॅसिफिक सागरभ्रमण अमेरिकेच्या दृष्टीने सोपे होईल. यामुळे रशियावर लक्ष ठेवण्यासाठी अमेरिकेला अधिक तळ उभारता येतील. शिवाय हे बेट खनिजे आणि नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध आहे. ग्रीनलँड, डेन्मार्क येथील नेते आणि अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स यांच्यातील वाटाघाटीतून ग्रीनलँडचा प्रश्न सुटू शकलेला नाही. ट्रम्प हे ‘नाटो’सारख्या आंतरराष्ट्रीय संघटनेची पर्वा करत नाहीत. रशिया-युक्रेन प्रश्नावरून अमेरिका व ‘नाटो’ यांचे संबंध अगोदरच बिघडलेले आहेत आणि त्यात आता ग्रीनलँडच्या गुंत्याची भर पडली आहे. आपले स्वार्थी हेतू साध्य करण्यासाठी धमक्या देणे, हल्ले करणे अथवा वाटेल तसे शुल्क लादून व्यापारयुद्ध छेडणे, ही ट्रम्प यांची नीती आहे. २१व्या शतकातील ट्रम्प हे नवे साम्राज्यशहा असून, त्यांना रोखण्याची आवश्यकता आहे.

# तांदूळ निर्यातीला वेसण



**भारताशी चाललेले शुल्क युद्ध, रशियाकडून भारत करत असलेली कच्च्या तेलाची आयात आणि त्या पार्श्वभूमीवर रशियाचे अध्यक्ष पुतिन यांचा अलीकडेच झालेला भारत दौरा या घटनांनी हवालदिल झालेल्या अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी आता भारताच्या तांदूळ निर्यातीला वेसण घालण्याची नवी खेळी केली आहे. त्याद्वारे त्यांनी भारताला एका नवीन मुद्द्यावरून घेरण्याचा प्रयत्न केला आहे.**

भारत आणि अमेरिका यांच्यात अनेक दशकांपासून व्यापारविषयक वाद असले तरी, ज्याला व्यापकपणे शुल्क युद्ध म्हटले जाते, तो काळ २०१९ मध्ये राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाखाली सुरू झाला. १ ऑगस्ट २०१९ पासून अमेरिकेने बहुतेक भारतीय आयातीवर सुरुवातीला २५ टक्के शुल्क आकारण्याची घोषणा केली. मात्र त्यामुळे भारतावर काही परिणाम होत नाही, हे पाहून २७ ऑगस्ट २०१९ रोजी अतिरिक्त २५ टक्के शुल्क लागू केले. यामुळे बहुतेक भारतीय वस्तूंवरील एकूण शुल्क ५० टक्के झाले. अमेरिकेने विविध व्यापार कायद्यांनुसार या शुल्कांचे समर्थन केले आणि भारताने तेलाची सतत खरेदी केल्याने युक्रेनविरुद्ध चाललेल्या युद्धामध्ये रशियाची एक प्रकारे मदत केल्याचा आरोप लावला. रशियाकडून कच्च्या तेलाची आयात थांबवण्यासाठी अमेरिका भारताला आग्रह करण्याचे मुख्य कारण म्हणजे युक्रेनमधील युद्धासाठी मॉस्कोला मिळणारा महसूल मर्यादित करणे होय. पाश्चात्त्य खरेदीदारांनी मोठ्या प्रमाणात रशियन तेल टाळल्यामुळे मॉस्कोने चीन आणि भारताला दिलेल्या सवलती आणि स्वस्त किमतीचा फायदा घेत भारताने अल्पावधीतच रशियन कच्च्या तेलाची एकूण आयात सुमारे ४० टक्क्यांपर्यंत नाट्यमयरीत्या वाढवली. अमेरिकेची पोटदुखी वाढण्याचे हे मूळ कारण आहे. पण भारताने अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता रशियाकडून मिळत असलेल्या कच्च्या तेलाची खरेदी थांबवली नाही. त्यामुळे चिडलेल्या ट्रम्प यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारात अमेरिकेसोबत करार करण्यास भारतावर येनकेनप्रकारे दबाव टाकण्याचा प्रयत्न केला.

ट्रम्प यांनी नुकताच भारताने बासमती तांदळाचे डम्पिंग केल्याचा आरोप करत भारतीय आयात मालावर शुल्क वाढवण्याची धमकी दिली. व्हाईट हाऊसमध्ये आयोजित एका गोलमेज परिषदेत ट्रम्प बोलत होते. त्यांनी परिषदेत म्हटले की, भारताला अमेरिकेत तांदळाचे ‘डंपिंग’ करण्याची परवानगी दिली जाऊ नये. तसेच भारताने तांदळाचे डंपिंग करू नये. आंतरराष्ट्रीय व्यापार नियमानुसार ते असे करू शकत नाहीत. त्यांच्या म्हणण्यानुसार भारतावर नवीन शुल्क आकारणे हा या समस्येवर एक जलद आणि सोपा उपाय असेल, कारण बेकायदेशीरपणे माल पाठवणाऱ्या देशांवर शुल्क लादल्यास ही समस्या सोप्या पद्धतीने सोडवली जाईल. काही अमेरिकन शेतकऱ्यांनी तक्रार केली की भारत, व्हिएतनाम आणि थायलंडसारख्या देशांमधून होणाऱ्या स्वस्त आयातीमुळे त्यांनी पिकवलेल्या तांदळाच्या किमती कमी होत आहेत. त्यामुळे अमेरिकेने शेतकऱ्यांसाठी एका संघीय मदत पॅकेजची घोषणा केली होती. भारत अमेरिकेत निर्यात करत असलेल्या तांदळाबद्दल भारतीय निर्यातदार आणि विश्लेषकांचे म्हणणे आहे की, बासमती हा एक विशेष प्रकारचा तांदूळ आहे, जो अमेरिकेत पिकवलेल्या तांदळाचा थेट पर्याय नाही आणि म्हणूनच डंपिंगचा दावा त्यांना मान्य नाही. कारण बासमती तांदळाचा व्यापार विशिष्ट ग्राहकांच्या आवडीनिवडीवर आधारित आहे. आपल्या उद्योगांना संरक्षण देण्यासाठी अमेरिकेने इंटरनॅशनल मॉनिटरी फंड आणि इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन या संस्थांची निर्मिती केली. १९८०-९० च्या दशकात वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन निर्माण केले. या ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून शेतीचा व्यापार कसा केला जावा याची नियमावली तयार केली गेली. या नियमावलीअंतर्गत कोणत्याही देशाने दुसऱ्या देशात माल डम्पिंग करून स्थानिक शेतकऱ्यांना तोटा होईल अशी कृती करू नये, असे निर्बंध घालण्यात आले आहेत. ट्रम्प यांनी भारतावर सर्वाधिक टॅरिफ लादले असूनही भारत अमेरिकेमध्ये बासमती तांदूळ डम्पिंग करतो, हे नक्कीच भूषणावह आहे. अमेरिकेने गव्हाच्या बाबतीत क्रांती केली आणि भारताने बासमती तांदूळ पिकवत वाद निर्माण करून या क्षेत्रामध्ये उज्ज्वल यश संपादित केले आहे. बासमती तांदळाला जगभर मागणी असल्याने भारताच्या शेतीक्षेत्रातील चहा बरोबरच बासमती तांदळालाही अनन्य महत्त्व प्राप्त झाले आहे. बासमती तांदळाची जात प्रामुख्याने पंजाब आणि हरियाणा प्रांतात पिकवली जाते आणि भारतातील पहिली आणि एकमेव हरित क्रांती याच दोन प्रांतांमध्ये झाली होती. वास्तविक, भारताने शेतीमालाच्या निर्यातीसाठी ‘आग्रेस्को’ नावाची संस्था निर्माण केली आहे. त्यामध्ये ५१ टक्के वाटा हा शेतकऱ्यांचा आणि ४९ टक्के सरकारी वाटा अशी पद्धत राबवली गेली आहे. या संस्थेअंतर्गत सरकारी शेतीतज्ज्ञ जगातल्या बाजारपेठेचा अभ्यास करून जास्तीत जास्त दर कोणत्या वेळी आणि कोणत्या मालाला मिळतो याची माहिती संस्थेला देतात. संस्था तेवढाच शेतमाल उत्पादित करून परदेशांना निर्यात करतात. इस्त्रायल हा वालुकामय प्रदेश आहे; परंतु या संस्थेमुळे तेथील मालाला जास्तीत जास्त दर मिळत असल्याने इस्त्राएलचा शेतकरी सधन झाला. आपल्याकडे तशी कोणतीही तरतूद नसताना भारताने अमेरिकेमध्ये बासमती तांदूळ डंपिंग करून अमेरिकन शेतकऱ्यांच्या नाकी नऊ आणले. त्यामुळे होणारा ट्रम्प यांचा थयथयाट पाहता भारताने ‘ऑपरेशन सिंदूर’द्वारे जसे पाकला नमवले होते, त्या पद्धतीने ‘ऑपरेशन बासमती’ करून अमेरिकेलाही नमवले आहे असे स्पष्ट होते. डंपिंगबाबत वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशनने म्हटले आहे की डंपिंग तंत्राचा वापर करून कोणत्याही देशाने दुसऱ्या देशातील शेतकऱ्यांचे नुकसान करू नये. ते व्यापार तंत्राच्या विरोधी होईल आणि निषिद्ध मानले जाईल. डंपिंगमध्ये एखादा देश दुसऱ्या देशात इतका शेतमाल निर्यात करतो की दुसऱ्या देशातील भाव एकदम कोसळून तेथील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होते. या पार्श्वभूमीवर भरपूर शुल्क लादले गेले असतानाही बासमती तांदूळ इतक्या मोठ्या प्रमाणात अमेरिकेच्या बाजारात कसा पोहोचला, याची सविस्तर माहिती उपलब्ध झाल्यास प्रत्येक भारतीयाला ‘ऑपरेशन सिंदूर’सारखाच याही घटनेचा अभिमान वाटल्याशिवाय राहणार नाही. अमेरिकन शेती आणि उत्पादन मोठे असले तरी तेथील फक्त दोन टक्केच नागरिक शेती करतात. त्यांचे क्षेत्र मोठे असते, शिवाय उत्पादन खर्च जास्त असतो. त्या तुलनेत भारतीय शेतकरी नगण्य असूनही आपल्या कौशल्याने आणि मेहनतीने जास्तीत जास्त उत्पादन काढून देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करतो. पूर्वीच्या काळासारखी या देशाला अमेरिकेकडे अन्नधान्यासाठी भीक मागावी लागत नाही.

**मुकुंद गायकवाड**

## गुजरातमध्ये अनेक बेकायदा पॅथॉलॉजी लॅब

सध्या अहमदाबाद मध्ये जीएपीएम २०२६ परिषद सुरु आहे. या परिषदेत तेथील अध्यक्षांनी गुजरातमध्ये हजारो बेकायदेशीर पॅथॉलॉजी प्रयोगशाळा भरभराटीला येत आहेत, असे खळबळजनक विधान केले आहे. त्यांच्या विधानानुसार एकट्या अहमदाबाद मध्ये सुमारे ३००० बेकायदेशीर पॅथॉलॉजी लॅब काम करीत आहेत. संपूर्ण गुजरात राज्यात जवळपास १२००० बेकायदेशीर लॅब आहेत. आवश्यक पदवी किंवा कोणतीही मान्यता नसताना या प्रयोग शाळा रुग्णांचे अहवाल तयार करीत आहेत. यामुळे रुग्णांच्या आयुष्यावर सुद्धा परिणाम होऊ शकतो. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर सुद्धा राज्याचा आरोग्य विभाग निष्क्रिय आहे. हे फारच गंभीर आहे. आतापर्यंत अशा बोगस पंथालॉगीं वर कोणतीही कारवाई केलेली दिसत नाही. असोसिएशनने कडक कारवाईची सरकारकडे मागणी केलेली आहे. विशेष म्हणजे अनेक पंथालॉजीच्या पाट्या सुद्धा विकल्या जात आहेत. गुजरातमध्ये आरोग्याबाबतच्या चाचणीवर व्हर्चुअल सह्या केलेल्या आढळून आल्या आहेत. अशा रिपोर्टवर व्हर्चुअल सह्याना मान्यता नाही. एकूणच गुजरात मधील बेकायदेशीर पंथालॉजिचे प्रकरण गंभीर आहे. तेथील सरकारने याची गंभीर दाखल घेऊन कारवाई करणे जरूर आहे . इतर राज्यात अशा बनावट पंथालॉजी आहेत का ? हे सुद्धा तेथील सरकारांनी पाहिजे महाराष्ट्रात सुद्धा हे तपासणे आवश्यक आहे.

**शांताराम वाघ**

## पाऊल टाकायची गरज

मुंबईमध्ये ‘बिहार भवन’ बांधण्याच्या प्रस्तावावरून सध्या राजकीय वातावरण तापले आहे. मनसेचे नवनिर्वाचित बृहन्मुंबई महानगरपालिका गट नेते यशवंत किल्लेदार यांनी ‘महाराष्ट्र नवनिर्माण सेना असेपर्यंत बिहार भवन बांधू देणार नाही’, अशी आक्रमक भूमिका घेतली आहे. मात्र, या भूमिकेचा व्यापक, व्यावहारिक आणि दूरगामी परिणाम विचारात घेऊन विश्लेषण करण्याची आज नितांत गरज आहे. जर मनसेला मुंबईत बिहार भवन होण्याचे एवढे वावडे असेल, तर त्यांनी दिल्ली सहित इतरत्र असलेल्या ‘महाराष्ट्र भवनां’वरही विचार करायला हवा. विशेष म्हणजे, आज महाराष्ट्र सरकार लंडन मध्येही ‘महाराष्ट्र भवन’ उभारत आहे. खर तर जेव्हा आपण राज्याबाहेर किंवा देशाबाहेर असतो, तेव्हा आपली पहिली ओळख प्रथम ‘भारतीय’ ही असते. मग दुसऱ्या देशात महाराष्ट्र भवनाची आवश्यकता कश्यासाठी पाहिजे. बिहार काही दुसरा देश नाही तेथील सर्व सामान्य गरीब जनतेच्या सुविधेसाठी तेथील सरकार मुंबईत भवन उभारत असल्यास विरोध करणे कितपत तर्कसंगत आहे ? अशा वास्तू प्रामुख्याने विद्यार्थी, रुग्ण आणि पर्यटकांच्या मदतीसाठी असतात, हे विसरून चालणार नाही. मनसेच्या असल्या अतिरेकी प्रादेशिक अस्मिता आणि भाषिक वादामुळे परराज्यात शिक्षण घेणाऱ्या किंवा नोकरी करणाऱ्या मराठी मुलांच्या अडचणी वाढत आहेत. मराठी मुले आज जिद्दीने शिक्षण घेत आहेत, त्यांना आयुष्यात खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. आज मराठी अस्मितेच्या नावाखाली केवळ लोकांची मने कलुषित करण्यापेक्षा, मराठी माणूस आर्थिकदृष्ट्या सक्षम कसा होईल आणि जागतिक स्पर्धेत कसा टिकेल, याकडे लोकप्रतिनिधींनी लक्ष देणे अपेक्षित आहे. नवनियुक्त नेत्यांकडून केवळ भावनिक राजकारण न होता, विधायक आणि शाश्वत कार्याची अपेक्षा महाराष्ट्राची जनता करत आहे.

**अविनाश देशपांड**

## ‘कर्तव्यपथा’ प्रजासत्ताक दिनाचे नेत्रसुखद संचालन

१५ ऑगस्टचा स्वातंत्र्य दिन आणि २६ जानेवारीचा प्रजसत्ताक दिन म्हणजे समस्त भारतीयांचे अत्यंत जिव्हाळ्याचे विषय! दरवर्षी २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनी भारताच्या राष्ट्रपतींच्या अध्यक्षतेखाली राजधानी दिल्लीच्या ‘कर्तव्यपथा’वर एक दिमाखदार संचलन पार पडते. या वेळी लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या अनेक तुकड्या यात भाग घेतात. देशाच्या लष्करी सामर्थ्याचे दर्शन होते. भारताची वैविध्यपूर्ण संस्कृती दर्शविणारे विविध राज्यांचे, तसेच विविध मंत्रालयांचे चित्ररथ हे या संचलनाचे प्रमुख आकर्षण असते. विविध विषयांनी नटलेले हे बहुरंगी आणि बहुढंगी चित्ररथ म्हणजे एक नेत्रसुखद पर्वणीच असते. यंदाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनाची संकल्पना ७ नोव्हेंबर १८७५ रोजी बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी रचलेल्या ’वंदे मातरम’ या राष्ट्रीय गीताच्या १५० व्या वर्धापनदिनानिमित्त ‘वंदे मातरम, स्वातंत्र्याचा मंत्र’ व ‘वंदे मातरम, समृद्धीचा मंत्र’ आणि ‘आत्मनिर्भर भारत’ अशी ठेवण्यात आली आहे. यंदाच्या संचलनात राज्याची प्रमुख सांस्कृतिक ओळख असलेल्या गणेशोत्सवावर आधारित महाराष्ट्राचा ‘गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक’ या चित्ररथाचा समावेश केला गेला आहे. तसेच यंदाच्या संचलनाचे खास वैशिष्ट्य म्हणजे ऑक्टोबर २०२५ मध्ये स्थापना करण्यात आलेली भारतीय सैन्याची अत्यंत वेगवान आणि आक्रमकपणे काम करणारी ‘भैरव लाईट कमांडो बटालियन’ संचलनात भाग घेणारआहे. यावेळी अडीच हजार भारतीय कलाकारांच्या विविध कलाविष्कारांनी ते मंत्रमुग्ध होतील त्यात शंका नाही.

**प्रदीप मोरे**

# राष्ट्रवादी ( शप ) ची अस्तित्वाची लढाई !



२०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत उत्तम कामगिरी केलेल्या शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसची त्यानंतर झालेली घसरगुंडी अतिशय चिंताजनक आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसने लढविलेल्या १० जागांपैकी ८ जागा जिंकून नेत्रदीपक कामगिरी केली होती. त्यांचा स्ट्राईक रेट इतर पक्षांच्या तुलनेत अतिशय चांगला होता. मात्र त्यानंतर झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी (शप) ची कामगिरी अतिशय निराशाजनक झाली. पक्षाने मोठ्या प्रमाणात जागा लढवूनही केवळ १० जागा पक्षाला जिंकता आल्या. त्यानंतर झालेल्या नगरपालिका निवडणुकीतही राष्ट्रवादी (शप) ची कामगिरी अतिशय सुमार झाली.

या पार्श्वभूमीवर जेव्हा २९ महापालिकांच्या निवडणुका घोषित झाल्या तेंव्हा राष्ट्रवादी (शप) ची कामगिरी कशी होईल याकडे सर्वांचे लक्ष होते. महापालिका निवडणुकीत शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीने काही ठिकाणी अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस बरोबर आघाडी केली होती. त्यामध्ये प्रामुख्याने पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा समावेश होता. या महापालिकांमध्ये भाजपा आणि राष्ट्रवादी यांच्यात युती होणार नाही, हे? निश्चित झाल्यानंतर, राष्ट्रवादीने, शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीशी आघाडी करण्याचा निर्णय घेतला होता. त्या निमित्ताने एकमेकांचे राजकीय विरोधक असलेले हे पक्ष, भाजपाला हरवण्यासाठी एकत्र आले होते. विशेषत: पुणे आणि पिंपरी चिंचवड हे अखंड राष्ट्रवादीचे पुर्वापार बालेकिल्ले मानले जात असल्याने, या दोन्ही पक्षांनी आपली ताकद पणाला लावली होती. अजित पवार यांच्या दृष्टीने तर पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची निवडणूक अतिशय प्रतिष्ठेची होती.

२०१७ मध्ये झालेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत, भाजपाने विजय मिळवला आणि राष्ट्रवादीची तेथील सत्ता संपुष्टात आणली. १२८ सदस्यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत गेल्या खेपेला भाजपाने ७७ जागा जिंकल्या होत्या. याखेपेस ८४ जागा जिंकून, भाजपाने आपल्या कामगिरीत सुधारणा केली आहे. अजित पवार यांनी पायाला भिंगरी लावून प्रचार केल्यानंतरही, त्यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीला फक्त ३७ जागांवर विजय मिळाला आहे. अशा प्रकारे पिंपरी चिंचवड महानगरपालिका जिंकण्याचा अजित पवार यांचा प्रयत्न अयशस्वी ठरला आहे. राष्ट्रवादी (शप) ला तर पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत एकही जागा जिंकता आलेली नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत अजित पवार आणि शरद पवार आघाडीचा पराभव का झाला, त्याला काही कारणे आहेत. महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये असलेले वरील दोन पक्ष पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत एकत्र आल्याने त्यांच्या मतदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यातच उमेदवार निवडीमध्येही दोन्ही पक्षांनी चुका केल्याने त्याचा फटका त्यांना निवडणुकीत बसला. शरद पवार हे प्रचारात सहभागी झालेच नाहीत. सुप्रिया सुळे या शेवटच्या टप्प्यात प्रचारात सहभागी झाल्या. त्यामुळे प्रचाराची सारी धुरा अजित पवार यांना सांभाळावी लागली. आपल्या प्रचार सभांमध्ये अजित पवार यांनी भाजपावर भ्रष्टाचाराचे आरोप केले. मात्र ज्यांच्यावर सत्तर हजार कोटी रुपयांचा सिंचन घोटाळ्याचा आरोप आहे, त्या अजित पवारांनी इतरांवर भ्रष्टाचाराचे आरोप करणे?, मतदारांना रूचले नसावे. निवडणूक प्रचारात भाजपावर भ्रष्टाचाराचे आरोप करणारे अजित पवार हे निवडणुक संपल्यानंतर पुन्हा भाजपा बरोबर सरकारमध्ये दिसणार आहेत, ही गोष्ट मतदारांना चांगलीच माहित असल्याने, त्यांनी अजित पवार यांच्या पक्षाला मतदान करताना हात आखडता घेतला असावा. पुणे महानगरपालिकेतही भाजपाला हरवण्यासाठी अजित पवार आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील पक्ष एकत्र आले होते. तेथेही अजित पवार यांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावली होती. मात्र भाजपाने पुणे महानगरपालिकेच्या एकूण १६५ जागांपैकी ११९ जागांवर दणदणीत विजय मिळवून राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांना चारीमुंड्या चीत केले. गेल्या खेपेस राष्ट्रवादीला ४३ जागा मिळाल्या होत्या. याखेपेस दोन्ही गट एकत्र येऊनही राष्ट्रवादीला फक्त २७ जागाच जिंकता आल्या. राष्ट्रवादी (शप) ला फक्त तीन जागांवर विजय मिळाला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे पुणे, पिंपरी चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, सांगली आणि इचलकरंजी या आपल्या बालेकिल्ल्यांतील महानगर पालिकांमधील ६१९ जागांपैकी फक्त ११९ जागा या खेपेस राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांना जिंकता आल्या आहेत. २९ महापालिकांमधील एकूण २८६९ जागांपैकी भाजपाला सर्वात जास्त म्हणजे १४२५ जागा मिळत असताना, अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीला केवळ १६७ जागांवर विजय मिळाला आहे, तर शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीला फक्त ३६ जागांवर विजय मिळाला असून पक्षाची पुरती धुळधाण उडाली आहे. राष्ट्रवादी (शप) ची ही निराशाजनक कामगिरी, पक्षाच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. पक्षाचे सर्वोच्च नेते, शरद पवार हे वयोमानामुळे पुर्वीसारखे सक्रिय राहिलेले नाहीत. तसेच अजित पवार यांनी वेगळी चूल मांडल्यानंतर, पक्षाचे बरेच अनुभवी नेते अजित पवार यांच्या गटात गेले आहेत. अशा परिस्थितीत नजिकच्या भविष्यात पक्षाचे बरेच नेते आणि कार्यकर्ते, इतर पक्षांत गेले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. आपले अस्तित्व टिकवायचे असेल तर शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील गटाने, अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गटात प्रवेश करणे, हा त्यावरील उत्तम तोडगा असू शकतो. ती प्रक्रिया कदाचित जिल्हापरिषद निवडणुकीनंतर सुरू होईल अशी शक्यता सध्या तरी दिसत आहे.

**अभय गोखले**

# पॅकेज दरवाढीचा मोठा निर्णय, आयुष्मान-फुले योजना थेट रुग्णांसाठी, गैरवापराला लगाम : डॉ. ओमप्रकाश शेटे

जनमाध्यम प्रतिनिधी




यवतमाळ - राज्यातील सार्वजनिक व खासगी रुग्णालयांमध्ये आयुष्मान भारत–प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत उपचार पॅकेजचे दर अनेक वर्षांपासून न बदलल्याने रुग्णांकडून अतिरिक्त शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. यामुळे सर्वसामान्य नागरिक आर्थिक संकटात सापडत होते. ही बाब गंभीरपणे लक्षात घेत महाराष्ट्र शासनाने उपचार पॅकेज दरवाढ, पारदर्शकता आणि रुग्णहित केंद्रस्थानी ठेवणारे महत्त्वपूर्ण व दूरगामी निर्णय घेतले आहेत, अशी माहिती आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी खंडागळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. ढोले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुखदेव राठोड, डॉ. विशाल ज. टावरी, जिल्हा समन्वयक इम्तियाज खान यांच्यासह आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

डॉ. शेटे यांनी सांगितले की, योजना २०१२ पासून लागू असली तरी उपचार पॅकेजेस २००७ मधील दरांवर आधारित होती. यामुळे प्रत्यक्ष खर्च आणि मंजूर दरांमध्ये मोठी तफावत निर्माण झाली होती. राज्यभर जिल्हानिहाय पाहणी, रुग्णालयांच्या तक्रारींचा अभ्यास आणि पॅकेज दरांची तपासणी करून शासनास सविस्तर अहवाल सादर करण्यात आला. त्यानुसार पॅकेजची संख्या १३५६ वरून वाढवून तब्बल २३९९ करण्यात आली आहे. हृदय, यकृत, बोन मॅरो प्रत्यारोपण तसेच TAVI व TAVR यांसारख्या अत्यंत खर्चिक उपचारांसाठी ९ पॅकेजेसचे दर १० लाखांपासून २२ लाख रुपयांपर्यंत वाढवण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. पॅकेज दरवाढ करताना सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग आणि खासगी रुग्णालयांच्या प्रतिनिधींची संयुक्त समिती स्थापन करण्यात आली आहे. केंद्र व राज्य सरकारच्या योजना एकत्रित केल्याने TMS 2.0 सॉफ्टवेअर लागू करण्यात आले असून, पुढील १५ दिवस ते एका महिन्यात सर्व रुग्णालये या प्रणालीवर कार्यरत होतील. यामुळे प्रत्येक उपचाराची ऑनलाईन नोंद, तात्काळ तपासणी आणि गैरवापरावर कठोर नियंत्रण ठेवता येणार आहे. दरम्यान, रुग्णालयांचे A, B, C ग्रेड वर्गीकरण रद्द करून सर्व रुग्णालयांना समान पॅकेज देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. खासगी रुग्णालयांना १५ टक्के अतिरिक्त दर, तर आदिवासी व दुर्गम भागातील रुग्णालयांना आणखी १० टक्के अतिरिक्त लाभ दिला जाणार आहे. यवतमाळ जिल्ह्यात २४ लाखांहून अधिक लाभार्थी असून त्यापैकी सुमारे ४९ टक्क्यांचे आयुष्मान कार्ड तयार झाले आहे.

“ही योजना केवळ कागदावर न राहता थेट रुग्णांपर्यंत पोहोचली पाहिजे. दर्जेदार व मोफत उपचार शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे हाच शासनाचा ठाम निर्धार आहे,” असे डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी स्पष्ट केले.

# शेतकरी कारखानदार झाला पाहिजे

## स्व. वसंतरावजी नाईक यांनी बघीतलेले स्वप्न साकरते आहे

जनमाध्यम प्रतिनिधी



महागाव - हरितक्रांती चे प्रणेते माहाराष्टाचे माजी मुख्यमंत्री स्व वसंतराव नाईक साहेब यांचे स्वप्न होते शेतकरी कारखानदार झाला पाहिजे आणि याच कल्पनेतून सत्तर च्या दशकात पुसद तालुक्यातील पोफाळी येथे विदर्भातील पहील्या सहकारी साखर कारखाण्याची मुहुर्तमेढ रोवण्यात आली तदनंतर कापुस एकाधीकार सहकारी जिनिगं प्रेसीगं,सुतगीरणी आशा आनेक सहकारातील शेतमालावर प्रक्रीया करुन कच्च्या मालाच्या रूपांतर पक्क्या मालात करणारे आनेक ऊधोग सहकाराच्या माध्यमातून ऊभारली गेली त्यातील त्यांच्या हक्काच्या कर्मभुमी आणि जन्मभुमीतील पहीला शेतकर्याच्या मालकीचा हा प्रकल्प त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत जलक्रांती चे प्रणेते स्व सुधाकर नाईक साहेब यांचे कल्पनेतुन साकारलेला सहकारातील पुष्पावंती साखर ऊधोग दुर्देवाने आज दोन्ही प्रकल्प खाजगीकरणात रूपांतरीत होऊन ,(नाव बदलुन) यशस्वीपणे सुरु आहेत.

नैचरल शुगर युनिट दोन तर आनेक विक्रम मोडुन यशस्वीते कडे वाटचाल करीत आहे त्यामुळे खर्या अर्थाने स्व वसंतराव नाईक साहेब यांचे स्वप्न एक प्रकारे साकार होत असल्याचे चीत्र आजमीतीस या परीसरात दिसुन येत आहे परंतु आज शेतकरी मुळ भागधारक मालक नाही हा भाग वेगळा परंतु हा ऊधोग व्यवस्थीत आणि पारदर्शकता ठेवुन चालविल्यास काय विकास साधता येतो हे आता दिसुन येत आहे त्यामुळे स्व नाईक साहेबांचा दुरदर्शीपणा किती मौल्यवान होता हे आपल्या विचारा पलीकडे आहे पुष्पांवती सुरु होण्यापूर्वी सवना शिवारात नवचंडीका देवी परीसरात माळपठारावर हजारो एक्कर सुपीक व सपाट काळीकसदार सुपीक जमीन आहे परंतु कोरडवाहू आहे या जमीनीचे मालक गरीब रोजमजुरी करणारे बहुतांश लोक आहेत या ठिकाणाला लागुन खालुन काही मीटर अंतरावर अधर पुस प्रकल्पाचे पाणि वाहते परंतु हे गरीब शेतकरी लिफ्ट ऐरिकेशन करू शकत नाहीत ही बाब १९८० मध्ये वंसत कारखान्याचे चेअरमन स्व बाळासाहेब देशमुख सवनेकर यांचे लक्षात आली आणि लीफ्टद्वारे माळपठारावर पाणि पोहचविण्यासाठी काम सुरू झाले नंतर काय अडचण आली माहीत नाही काम अर्धवट राहीले या घटणेचा मी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे यांनतर पुष्पांवती ची मुहूर्तमेढ रोवण्यात आली तो सुध्दा सहकारातुन खाजगीकरणात गेला सुरवातीला वारणा ग्रुप नंतर काही काळ बंद अवस्थेत राहुन नैचरल ग्रुपणे ताब्यात घेतला तेव्हापासुन आज सतत दहाव्या गळीत हंगामापर्यतं यशस्वी रित्या चालवीत आहेत त्यामुळे यापरीसतील आर्थिक आलेख वाढतांना दिसत आहे पण या माळपठारावर यशस्वी ऊस लागवड झाली आहे आजरोजी पहीला मानकरी आमचे मीत्र अरवीदं करोडकर ठरले आहेत यापुढे या भागात शेकडो एक्कर भविष्यात ऊस लागवड होईल असे वाटते असे झाल्यास कारखाण्याच बाहेरील तालुक्यातील ऊस लागवडीसाठी करावा लागणारा वाहतूक खर्च कमी होऊन कारखान्यात ताजा ऊस उपलब्ध होईल आणि एकाच तालुक्यातील ऊस क्षेत्रातवर कारखाणा पुर्ण क्षमतेने चालल्याने ऊत्पादंकाना चारपैसे जादा दर मीळण्यास सोईचे होईल हे निश्चित या करीता स्थानीक प्रशासन शेतकरी व कारखाना व्यवस्थापनाने सामुहीक प्रयत्न करण्याची गरज आहे.

तरच हे शक्य होईल आणि आजतरी एका अर्थाने स्व वसंतराव नाईक साहेब यांचे स्वप्न साकार होत आसल्याचे चीत्र या परीसरात दिसुन येत आहे हे नक्की गोविंदराव देशमुख सवनेकर ऊस उत्पादक शेतकरी सवना.

# वेचक

## तालुक्यातील पांदन रस्ते इतर यंत्रणेमार्फत करावे : सरपंच संघटनेची मागणी, जिल्हाधिका-यांना दिले निवेदन



बाभुळगाव - मातोश्री पांदन रस्ते व इतर योजनामधील पांदन रस्ते ग्राम पंचायतला एजंसी म्हणून केले जातात. मात्र ग्राम पंचायत स्तरावर मोठ्या प्रमाणावर मजुर मिळत नाहीत, त्याचप्रमाणे सुविधांचा अभाव असल्याने पांदन रस्त्यांची कामे प्रभावित होवून मंदावतात. याचा थेट परिणाम शेतक-यांवर होतो. त्यामुळे पांदन रस्त्यांची कामे इतर शासकीय यंत्रणेमार्फत करण्यात यावेत, अश्या मागणीचे निवेदन बाभुळगाव तालुका सरपंच, उपसरपंच संघटनेच्या वतीने दि. 20 रोजी जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. पांदन रस्ता हा शेतक-यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा व महत्त्वाचा विषय असून पांदन रस्त्याची कामे वेळेत पुर्ण झाल्यास शेती करणे शेतक-यांना सोयीचे जाईल. परंतु ग्राम पंचायत स्तरावर काम करीत असताना मजुर व इतर सामुग्री उपलब्ध होत नसल्यामुळे तालुक्यातील पांदन रस्त्यांची कामे रखडण्याची शक्यता निर्माण होत आहे. त्यातच पांदन रस्त्यांच्या कामांमध्ये अनेक तक्रारी झाल्याने सुद्धा कामे प्रभावित होतात. अश्यावेळी स्वतंत्र शासकीय यंत्रणेद्वारा ही कामे केल्यास ती जलद गतीने करता येतील. त्यामुळे तालुक्यातील पांदन रस्त्यांची कामे इतर शासकीय यंत्रणेमार्फत करण्याची मागणी तालुक्यातील सरपंच यांनी केली आहे. सरपंच संघटनेच्या वतीने अध्यक्ष सुधीर कडुकार, सदस्य संगीत काळे यांनी दिले.



## जगदंबा अभियांत्रिकीचे ५ विद्यार्थी अमरावती विद्यापीठात मेरीट

यवतमाळ - जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालयातील ५ विद्यार्थ्यांनी अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२५ च्या मेरी यादी मध्ये आले आहेत. गेल्या काही वर्षापासुन सुरु असलेली महाविद्यालयाच्या उज्वल यशाची परंपरा जगदंबा अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी याही वर्षी कायम राखली आहे. या निकालात प्रामुख्याने संगणक अभियांत्रिकी विभागातील ३ व स्थापत्या अभियांत्रिकी विभागातील २ असे ५ विद्यार्थी मेरीट आले आहेत. विद्यार्थ्यांच्या या दैदीप्यमान 'यशाने महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. अंतीम वर्षाच्या या गुणवंत विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. संगणक अभियांत्रिकीतील प्राची बोभाटे ९.२२ सिजीपीए गुण घेवून प्रथम मेरिट, पुर्वा पिनेवार ९.२१ सिजीपीए गुण घेवून व्दितीय मेरिन तर मंजीरी गावंडे ८.८६ सिजीपीए गुण घेवून तृतिय मेरिट आली आहे. स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील पुर्वा पिंपळकर ही ९.७९ सिजीपीए गुणाने प्रथम मेरिट व योगेश्वरी राठोड ९.७१ सिजीपीए गुणाने व्दितीय मेरीन आली आहे. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या होणाऱ्या दिक्षांत समारोहात प्रमाणपत्र देवुन सत्कार करण्यात येणार आहे. या सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय सचिव डॉ. शितल वातीले, संचालक पवन वातीले, प्राचार्य डॉ. प्रविण डाखोळे, उपप्राचार्य डॉ. विजय भांबेरे, सर्व विभाग प्रमुख व प्राध्यापक वर्ग यांना दिले. संस्थेतील अनुभवी प्राचार्य, प्राध्यापक वर्ग व प्रशासकीय मंडळाच्या मार्गदर्शनाने उन्हाळी २०२५ च्या परीक्षेत जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालयातील ५ विद्यार्थी विद्यापीठातुन मेरिट आले असुन त्यांनी महाविद्यालयाचे नाव उज्वल केली असल्याची प्रतीक्रीया संस्थेचे सचिव डॉ शितल वातीले यांनी व्यक्त केली.

## ग्रामपंचायत शिरपूर येथे दर्शविण्यात आलेली ग्रामसभा प्रत्यक्षात न झाल्याबाबत तक्रार

महागाव - आम्ही खाली सही करणारे ग्रामपंचायत शिरपूर, ता. महागाव, जि. यवतमाळ येथील ग्रामस्थ आहोत. मेरी पंचायत (e-GramSwaraj) पोर्टलवर दिनांक 06/01/2026 रोजी दुपारी 02:15 वाजता “Viksit Bharat VB-G RAM G” या विषयावर ग्रामसभा झाल्याची नोंद करण्यात आलेली आहे. परंतु प्रत्यक्षात सदर ग्रामसभा गावामध्ये झालीच नाही. बहुतांश ग्रामस्थांना ग्रामसभेची कोणतीही योग्य पूर्वसूचना देण्यात आली नाही. ग्रामसभा स्थळी कोणतीही बैठक, उपस्थिती, चर्चा किंवा ठराव प्रत्यक्षात झालेले नाहीत. तरीसुद्धा ऑनलाइन पोर्टलवर ग्रामसभा झाल्याचे चुकीचे दाखविण्यात आले आहे, हे अत्यंत गंभीर व नियमबाह्य आहे. ही बाब महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम व शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी आहे.

# घाटंजी येथे शिवसेनेचे प्रशिक्षण शिबीर उत्साहात

जनमाध्यम प्रतिनिधी



घाटंजी - आगामी काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना पक्षाने पक्ष बांधनिला सुरुवात केली आहे, प्रत्येक गावामध्ये जाऊन युवासेना जिल्हाप्रमुख आकाश राठोड, तालुकाप्रमुख निलेश चव्हाण, विधानसभा समन्वयक सतिश डफळे पाटील, यांनी प्रत्येक गावामध्ये जाऊन शाखा बांधणी केली, जनतेच्या अडीअडचणी समजून घेतल्या त्या सोडविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले.

सामाजिक सांस्कृतिक उपक्रम राबवून पक्षाची बांधणी केली. आरोग्य शिबीर, नेत्रशल्यचिकित्सा शिबीर, रक्तदान शिबीर घेऊन अनेकांना मदत केली, युवकांना प्राधान्य देऊन अनेक गावामध्ये कबड्डी, क्रिकेट चे सामने आयोजित केले आहे, या माध्यमातून शिवसेना वाढविण्याचे प्रयत्न चालू आहे. एकदिवसीय प्रशिक्षण शिबिराच्या माध्यमातून शिवसेनेने जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीचे रणशिंग फुंकले आहे, निवडनूकिची बांधणी कशी करावी,निवडनुका कशा पद्धतीने लढवायच्या, बुथ नियोजन कशा पद्धतीने करावे यासाठी शिवसेनेने त्यासाठी गावपातळीवर मोठी बांधणी केली आहे, प्रशिक्षण शिबीराला प्रमुख मार्गदर्शक म्हणून संपर्कप्रमुख हरिहरभाऊ लिंगनवार, जिल्हाप्रमुख राजुदास जाधव सर, जिल्हा संघटक साजीद शरीफ, माजी नगरसेवक सतिष मलकापूरे,पांढरकवडा उपनगराध्यक्ष आतिष चव्हाण, महिला जिल्हाप्रमुख जोतीताई वाघाडे, युवासेना जिल्हाप्रमुख आकाश राठोड,अभिजीत देशमुख मोवाडेकर, उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकाश नडपेलवार यांनी केले. प्रास्ताविक आकाश राठोड व निलेश चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी निलेश चव्हाण,गजानन ढवळे, सतिश डफळे पाटील, अंनतराव कटकोजवार सर, वासुदेव राठोड, वंदना ताई राठोड, गुरुदेव पेटकुले, अनील गोडे, भोपिदास राठोड, दिलीप राठोड, चंद्रकांत धुर्वे, संदेश तोवर, महेंद्र राठोड, अभय राठोड, तुषार राठोड, जगदीश खाडे, पवन अळसपुरे, रविंद्र मसराम, निकेश जाधव, गणेश राठोड, प्रविण मातारमारे, अविनाश राठोड, बंडु राठोड, मंगेश धुर्वे, गजानन रेड्डीवार, वैभव भोयर, नरहरी पोलकमवार, आकाश नडपेलवार, आतिष पारखी, शैलेश कनोजे, संदीप जाधव, रोहिदास राठोड, गजानन चव्हाण, मनोज राठोड, सरपंच बादल राठोड, सरपंच अलका देवतळे, सरपंच अर्चना डफळे, राजु बल्लुरलार, मनिषा दवने, निकेश जाधव, अर्जुन पवार, विनोद राठोड, दिनेश जाधव, महेश पवार, अमित शिवणकर, किशोर अक्कलवार, रिनाताई धनरे , राधिका गुंडावार , राजु गुल्हाने राजु वातीले, उपसरपंच जितेंद्र राठोड, विश्वास निकम, संदीप कोरवते ईत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

# यवतमाळ नगरपरिषदेचा ‘स्वच्छतेचा पंचनामा’ निवडणुका संपल्या, पण कचऱ्याचे ढीग तसेच !

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या. यवतमाळ नगरपरिषदेत सत्ता स्थापन झाली, प्रत्येक प्रभागाला आपला नगरसेवक मिळाला, प्रशासकीय राज संपले. नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांनी ‘विकास’, ‘स्वच्छता’, ‘नागरिकाभिमुख कारभार’ अशी आश्वासने दिली. मात्र निवडणुकीनंतर काही आठवडे उलटत नाहीत तोच शहरातील वास्तव मात्र वेगळेच चित्र दाखवत आहे.

महादेव मंदिर मुख्य रस्ता जो शहरातील अत्यंत वर्दळीचा व प्रतिष्ठानांनी भरलेला भाग आहे.आज कचऱ्याच्या ढिगाऱ्यांनी, उघड्या नाल्यांनी आणि अस्वच्छतेने बकाल झाला आहे. व्यापारी प्रतिष्ठानांतून दररोज निघणारा कचरा सर्रास रस्त्यावर फेकला जातो. त्याचे कोणतेही नियोजन, वर्गीकरण किंवा वेळेत उचल होत नसल्याने मुख्य रस्त्यावरच कचरा साचून राहतो. परिणामी दुर्गंधी, डास, माश्यांचा प्रादुर्भाव वाढत असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.विशेष म्हणजे हा प्रभाग नवखा नाही. अनेक वर्षांपासून नगरपरिषदेतील ‘अनुभवी’ नगरसेवक याच प्रभागातून निवडून येत आहेत. मग प्रश्न असा उपस्थित होतो की नगरसेवकांना हा कचरा दिसत नाही का? उघड्या नाल्यांची दुर्दशा त्यांच्या नजरेत भरत नाही का? की विजयाच्या जल्लोषात आणि सत्तेच्या स्वप्नात सामान्य नागरिकांचे प्रश्न दुय्यम झाले आहेत? प्रशासकीय राज असताना नगरपरिषदेच्या कारभारावर टीकेची झोड उठवली गेली. ‘प्रशासन निष्क्रिय आहे’ अधिकाऱ्यांना जनतेचे काही देणेघेणे नाही. असे आरोप झाले. आता मात्र लोकनियुक्त प्रतिनिधी सत्तेवर आहेत. मग जबाबदारी कुणाची? प्रशासकीय राज संपल्यानंतरही जर शहरातील मुख्य रस्त्यावर कचऱ्यांचे ढीग साचत असतील, नाल्या तुंबलेल्या असतील, तर हा अपयशाचा ठपका थेट नगराध्यक्ष व संबंधित प्रभागाच्या नगरसेवकांवरच बसतो. नवनिर्वाचित नगराध्यक्षांनी स्वच्छ, सुंदर यवतमाळचे स्वप्न दाखवले आहे. पण महादेव मंदिर मुख्य रस्त्यावरील ही अवस्था त्या स्वप्नाला काळी किनार लावणारी आहे. केवळ फोटोसेशन, उद्घाटनांचे फलक आणि भाषणांनी शहर स्वच्छ होत नाही. प्रत्यक्ष मैदानात उतरून व्यापाऱ्यांकडून कचरा व्यवस्थापनाची सक्ती, नियमित सफाई, नाल्यांची स्वच्छता आणि दोषींवर दंडात्मक कारवाई हे सर्व तातडीने करणे गरजेचे आहे.नागरिक नगरसेवकांना त्यांच्या कर्तव्याची आठवण करून देणार का? की पुढील निवडणुकीपर्यंत अशाच कचऱ्याच्या ढिगाऱ्यांतूनच ‘विकास’ शोधत राहणार? यवतमाळच्या रस्त्यांवर साचलेला कचरा केवळ अस्वच्छतेचा नाही, तर नगरपरिषदेच्या कारभाराचा उघड पंचनामा आहे.

# घरकुलच्या नावाखाली रेतीची लूट !

## हुस्नापूर–बऱ्हाणपूर घाटावर दबंगांची ‘राजकीय’ मक्तेदारी

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - कळंब तालुक्यातील हुस्नापूर–बऱ्हाणपूर रेती घाट सध्या घरकुल लाभार्थ्यांसाठीचा आधार न राहता राजकीय आश्रयाखाली चालणाऱ्या रेती तस्करीचा अड्डा बनला आहे. गरीब लाभार्थ्यांच्या हक्काची रेती पायदळी तुडवत, स्थानिक प्रशासनाच्या संगनमताने दररोज लाखोंची अवैध उलाढाल सुरू असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे.

गेल्या दोन महिन्यांपासून हा गोरखधंदा खुलेआम सुरू असून प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेत आहे.घरकुलसाठी राखीव घाटावर ‘राजकीय’ हस्तक्षेप हुस्नापूर–बऱ्हाणपूर हा रेती घाट खासकरून घरकुल लाभार्थ्यांसाठी राखीव ठेवण्यात आला होता. त्यासाठी निविदा प्रक्रिया राबवून प्रशांत डगवार या व्यक्तीला कागदोपत्री अधिकृत डेपो मंजूर करण्यात आला होता. मात्र, काही दिवसांतच या प्रक्रियेत राजकीय हस्तक्षेप झाल्याचे समोर आले असून, मूळ लाभार्थ्याला बाजूला सारून घाट थेट राजकीय हस्तकांच्या ताब्यात देण्यात आल्याचा आरोप आहे. घरकुल लाभार्थ्यांना वंचित ठेवून बिल्डरांचा फायदा केल्या जात आहे. नियमानुसार प्रत्येक घरकुल लाभार्थ्याला पाच ब्रास रेती देणे बंधनकारक असताना, प्रत्यक्षात ही रेती सामान्य बांधकामे व खासगी बिल्डरांच्या घशात घातली जात आहे. घरकुल धारकांच्या नावावर पंचायत समितीतून ‘पास’ होणाऱ्या पावत्या पुढील चौकशीचा विषय ठरणार असून, कागदोपत्री लाभार्थी आणि प्रत्यक्षात तस्कर अशी दुहेरी यंत्रणा कार्यरत असल्याचे स्पष्ट होत आहे. या संपूर्ण प्रकरणात महसूल विभाग आणि पंचायत समितीच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. स्थानिक तहसीलदार आणि पंचायत समितीतील बीडीओ यांची कार्यप्रणाली सध्या संशयाच्या भोवऱ्यात सापडली असून, राजकीय दबावापुढे नियमांना तिलांजली देत अवैध रेती उपशाला मूकसंमती दिली जात असल्याचे चित्र आहे.

**डेपो नव्हे, काळाबाजार!**

**घरकुलच्या नावाखाली सुरू असलेला हा रेती डेपो प्रत्यक्षात काळाबाजाराचा केंद्रबिंदू बनला आहे. गोरगरीबांच्या हक्कावर डल्ला मारणाऱ्या या चौकडीमागे नेमका कोणता ‘राजकीय नेता’ आहे, हा प्रश्न आता जनतेतून उपस्थित होत आहे. प्रशासन याकडे कधी लक्ष देणार, की चौकशी होईपर्यंत रेतीसह पुरावेही वाहून जाणार, असा संतप्त सवाल लाभार्थी करीत आहेत.**

# वाढीव मोबदला द्या, अन्यथा रेल्वे काम रोखू !

## रेल्वे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

जनमाध्यम प्रतिनिधी



उमरखेड - वर्धा–यवतमाळ–नांदेड रेल्वे प्रकल्पासाठी उमरखेड तालुक्यात झालेल्या अतिरिक्त भूसंपादनाला अत्यल्प मोबदला देण्यात आल्याचा आरोप करत शेतकऱ्यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. रेल्वे कायदा 1989 व RFCTLARR कायदा 2013 नुसार ग्रामीण भागात चारपट मोबदला देणे अपेक्षित असताना प्रशासनाने केवळ दोनपट दर लावल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते संजय बिजोरे यांच्या नेतृत्वाखाली अनेक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी दि. 19 जानेवारी रोजी जिल्हाधिकारी यवतमाळ यांना निवेदन दिले. यामध्ये बाजारभावानुसार चारपट वाढीव मोबदला देणे, पाईपलाईन, विहीर, बोअरवेल, फळझाडे आदींचा समावेश करून फेरमूल्यांकन करणे तसेच मोबदला उचलण्यासाठी बँकेच्या नाहरकत प्रमाणपत्राची अट तात्काळ रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. 2017 -18 मध्ये ज्यावेळी शेत जमिनीचे भूसंपादन करण्यात आले त्यावेळी शासनाच्या वतीने 16 लाख 50 हजार मोबदला देण्यात आला. परंतु 2024- 25 मध्ये भूसंपादन मध्ये फक्त 13 लाख रुपये देण्यात येत आहे .तसेच हा प्रकल्प उमरखेड शहरालगत गावठाण असल्या मुळे याचा मोबदला अधिक मिळायला पाहिजे ,सिंचन व्यवस्था 90% असताना कोरडवाहूच्या दराने मोबदला दिला जात आहे. 2024- 25 चे भूसंपादन रेल्वे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना प्रशासनाने विचारात न घेता अथवा कोणतीही चर्चा न करता उपजिल्हाधिकारी व भूसंपादन यवतमाळ यांनी शेतकऱ्यांना अंधारात ठेवले असल्याचा आरोपही यावेळी शेतकऱ्यांनी केला.

प्रशासनाने मागण्यांचा गांभीर्याने विचार न केल्यास उमरखेड तालुक्यात रेल्वे प्रकल्पाचे पुढील काम थांबवण्याचा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आह आहे. याप्रसंगी संजय बिजोरे पाटील, शिवाजी बिजोरे, निरंजन जाधव ,बाबाराम जाधव, बाबुराव जाधव, संभाजी जाधव ,नागोराव आखरे , विनोद कवाने, जिजाबाई तेलुरे ,परमेश्वर कदम, संजय हुंबे ,अतुल पाटील ,रामराव फाळके, सह परिसरातील अनेक रेल्वे प्रकल्प शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यवतमाळ शहर पोलिसांकडून ‘ऑपरेशन प्रस्थान’ अंतर्गत १२ हरविलेले मोबाईल नागरिकांना परत

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - पोलीस व जनता यांच्यातील नातेसंबंध अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक श्री. कुमार चिंता यांच्या संकल्पनेतून यवतमाळ जिल्हा पोलीस दलाकडून पोलीस समन्वय या उपक्रमांतर्गत ‘ऑपरेशन प्रस्थान’ राबविण्यात येत असून, त्याअंतर्गत यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात हरविलेले एकूण १२ मोबाईल नागरिकांना परत करण्यात आले.

पोलीस स्टेशन यवतमाळ शहर येथे विविध तक्रारदारांनी त्यांचे मोबाईल गहाळ झाल्याबाबत तक्रारी दाखल केल्या होत्या. त्या अनुषंगाने CEIR पोर्टलचा प्रभावी वापर करून पोलीस स्टेशन स्तरावर मोबाईलचा शोध घेण्यात आला. या कारवाईत अंदाजे १ लाख ३७ हजार रुपये किंमतीचे १२ मोबाईल शोधण्यात यश आले. आज रोजी विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र श्री. रामनाथ पोकळे यांची यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात सप्राईज व्हिजिट होती. यावेळी त्यांच्या हस्ते अंध नागरिक संतोष तुकाराम सोयाम यांच्यासह इतर तक्रारदारांना हरविलेले मोबाईल औपचारिकरित्या सुपूर्द करण्यात आले. ही संपूर्ण कार्यवाही पोलीस अधीक्षक कुमार चिंता,अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात व उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस स्टेशन यवतमाळ शहरचे ठाणेदार पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव तसेच पोलीस अंमलदार रविंद्र नेवारे व अंकुश फेंडर यांनी ही कामगिरी यशस्वीरीत्या पार पाडली. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये पोलिसांविषयी विश्वास अधिक दृढ झाला असून, यवतमाळ जिल्हा पोलिसांच्या कार्यक्षमतेचे कौतुक होत आहे.

# विनोबा अँपवरील उत्कृष्ट कामगिरीबद्दल शिक्षकाचा गौरव

## ब्लॉकस्तरीय ‘पोस्ट ऑफ द मंथ’ पुरस्कार प्रदान

जनमाध्यम प्रतिनिधी




पांढरकवडा - विनोबा अँपच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमशील व प्रेरणादायी शैक्षणिक उपक्रमांसाठी जि. प. उच्च प्राथमिक शाळा, वाढोणा बु., ता. केळापूर, जि. यवतमाळ येथील पदवीधर शिक्षक श्री. पवन बोमावार सर यांची ब्लॉकस्तरीय ‘पोस्ट ऑफ द मंथ – डिसेंबर २०२५’ साठी निवड करण्यात आली.

विद्यार्थीकेंद्रित अध्यापन पद्धती, सृजनशील कल्पना, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि प्रभावी शैक्षणिक पोस्ट्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शिक्षणप्रक्रियेला नवी दिशा देणाऱ्या त्यांच्या कार्याची दखल घेऊन हा सन्मान प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी यवतमाळ येथे, जिल्हा कर्मचारी क्रीडा स्पर्धेच्या औचित्याने आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. मा. गटशिक्षणाधिकारी, पांढरकवडा श्री. गोकुल गंधे साहेब मा. विस्तार अधिकारी, पंचायत समिती पांढरकवडा श्री. राजू मेश्राम साहेब तसेच माजी गटशिक्षणाधिकारी पांढरकवडा श्री. इंगोले व मुळे साहेब यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. या प्रसंगी विनोबा अँपचे जिल्हा प्रकल्प अधिकारी श्री. राम हटकर सर व श्री. छगन चिंचे सर यांची प्रमुख उपस्थिती होती. विनोबा अँपवरील प्रत्येक पोस्टमधून शिक्षक म्हणूनचे समर्पण, नवोन्मेषी दृष्टिकोन व विद्यार्थ्यांप्रती असलेली बांधिलकी स्पष्टपणे दिसून येते. त्यांच्या या यशाबद्दल शैक्षणिक क्षेत्रातून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# ३ दिवसापासून जुळया शहरात घनकचरा संकलन ठप्प

### शहरात जागोजागी घाणीचे साम्राज्य
### नागरिक त्रस्त
### कंत्राटदाराला देयक न दिल्याने कामबंद

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर नगर परिषद प्रशासक कार्यकाळापासून देयके थकित असल्यामुळे दर महिन्याला कामबंद आंदोलन पुकारत असलेल्या घनकचरा संकलनच्या कामगारांनी गेल्या १९ जानेवारीपासून पुन्हा कामबंद आंदोलन छेडले आहे. यामुळे तीन दिवसापासून जुळया शहरात जागोजागी कचऱ्याचे ढीग लागलेले आहे .यामुळे जुळ्या शहरातील जनता त्रस्त झाली आहे. विशेष म्हणजे अचलपूर नगर परिषद मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड यांनी कोणतीही पर्यायी व्यवस्था न केल्याने नागरिकात रोष व्यक्त होत आहे.

अचलपूर नगर परिषदेच्या मनमानी कारभारामुळे जुळया शहरातील नागरिक त्रस्त आहेत. मागील १० ते १२ दिवसांपासून जुळ्या शहरातील अनेक भागातील कचरा उचलण्यात आलेला नाही. संपूर्ण अचलपूर व परतवाडा शहरात अनेक ठिकाणी घरातील कचरा व नाल्या सफाईच्या कचऱ्याचे ढिगारे लागले आहे. अचलपूर नगर परिषद आरोग्य विभागाच्या भोंगळ कारभारमुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. जुळ्या शहरात ढीग साचले असून दुर्गंधी, डास, माश्या व रोगराई वाढण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. अचलपूर नगर परिषद आरोग्य विभागाकडून कचरा संकलनासाठी नेमलेल्या ठेकेदाराला २० लाखाचे बिल देऊनही त्याने कर्मचाऱ्यांना केवळ पाच-पाच हजार रुपये दिल्यामुळे कामगारांनी काम बंद



पाडले . घंटागाड्या, ट्रॅक्टर उभे आहेत. कचरा संकलन कर्मचाऱ्यांनी मागील आठ दिवसांपासून संप पुकारला आहे. मात्र, अचलपूर नगर परिषद प्रशासनाकडून अद्याप कोणतीही पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली. नाही, ही अत्यंत गंभीर बाब आहे. जुळ्या शहरात एकूण १६ ट्रॅक्टर व ४२ घनकचरा संकलन करणारी कचरा गाडी असून १०० चा वर कर्मचारी काम करतात.कचरा संकलन करणाऱ्या कर्मचाऱ्यांना शंभर दिवसांपासून पगार मिळालेला नाही असे सांगण्यात येत आहे.

शहरात २० प्रभागातून ४१ नगरसेवक प्रतिनिधित्व करीत आहे. या गंभीर समस्या बाबत सर्व नगरसेवक गंभीर रित्या हा मुद्दा अचलपूर नगर परिषद मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड यांच्या समक्ष मांडून ही समस्या मार्गी लागणार अशी आशा नागरिकात होती . पण असे काही ही न झाल्याने जुळ्या शहरातील जनतेच्या समस्या अश्याच या पुढे ही वाऱ्यावरच राहणार का ? हा गंभीर प्रश्न या प्रकारामुळे निर्माण झाला आहे.

*जुळ्या शहरात अनेक भागात मोकाट जनावरे मृत अवस्थेत असल्याने नागरिक याची तक्रार अचलपूर नगर परिषद आरोग्य विभागाकडे करीत आहे. या मृत जनावरांना अचलपूर नगर परिषद आरोग्य विभागाचे कर्मचारी उचलून नेतात. पण काम बंद आंदोलन असल्याने अनेक ठिकाणी मृत जनावरे आजही त्या ठिकाणीच असल्याने परिसर मध्ये दुर्गंधी पसरत आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर मोठा परिणाम होत आहे.*

अचलपूर नगर परिषद प्रशासन व ठेकेदार यांच्यात कोणताही ताळमेळ नसल्याने कर्मचाऱ्यांचे हाल होत आहे. त्याचा फटका थेट नागरिकांना बसत आहे. या संपूर्ण प्रकारात न. प.चे मुख्याधिकारी धीरज कुमार गोहाड व अधिकारी मनमानी करीत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. जुळ्या शहरात एवढी गंभीर परिस्थिती निर्माण होऊनही अधिकारी गप्प आहे.

# ‘अरुणोदय’ सिकलसेल जनजागृती अभियानाची सुरुवात

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागा मार्फत 'राष्ट्रीय सिकलसेल ॲनिमिया निर्मूलन' कार्यक्रम राबविण्यात येत असून हा उपक्रम १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राज्यभरात राबविला जाणार आहे. त्या अनुषंगाने दि. १५ जानेवारी २०२६ रोजी ग्राम टाकरखेडा संभू येथे आरोग्य विभागाच्या वतीने 'अरुणोदय सिकलसेल जनजागृती अभियान'ची सुरुवात करण्यात आली.

या अभियानाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर गावातून प्रभात फेरी काढून घोषवाक्यांच्या माध्यमातून सिकलसेल आजाराबाबत जनजागृती करण्यात आली.

० ते ४० वयोगटातील तपासणी न झालेल्या तसेच



तपासणी झालेल्या व्यक्तींचे सर्वेक्षणही यावेळी करण्यात आले.

या प्रसंगी माननीय सरपंच रश्मीताई देशमुख, उपसरपंच श्री प्रदीप शेंडे, आरोग्य सेविका सौ. सुरेखा उके, श्रीराम प्राथमिक शाळेचे शिक्षक श्री अतुल खांदे यांच्यासह प्रमोद विघे, प्रशांत देशमुख, प्रवीण पाटील, रेखा खटाळे, आशा सेविका श्रीमती पद्मा भालचक्र, सावित्री मेश्राम, माला मोहोड, बबीता कुचे, गटप्रवर्तक सुनिता मोहोड व आरोग्य सेवक श्री माहुरे उपस्थित होते. गावातील नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. सिकलसेल आजारग्रस्त विद्यार्थी व व्यक्तींना शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली.

त्यामध्ये संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत मिळणारे लाभ तसेच इयत्ता दहावी व बारावीच्या सिकलसेल बाधित विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान २० मिनिटांचा अतिरिक्त वेळ मिळण्याबाबत माहिती देण्यात आली. ही माहिती सरपंच रश्मी देशमुख, उपसरपंच प्रदीप शेंडे, आरोग्य सेविका सुरेखा उके व शिक्षक श्री अतुल खांदे यांनी व्हिडिओ क्लिपच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचवली.

*मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने*

# विद्यापीठात विविध कार्यक्रमाचे आयोजन

**अमरावती/का.प्र.**

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी शैक्षणिक, वैचारिक आणि साहित्यिक उपक्रमांना चालना देण्याच्या उद्देशाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथील पदव्युत्तर मराठी विभाग आणि विदर्भ साहित्य संघ, शाखा अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा - २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. हा पंधरवडा दि. १४ जानेवारी ते २८ जानेवारी, २०२६ या कालावधीत विविध साहित्यिक व शैक्षणिक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे.

या पंधरवड्यात चर्चासत्र, विद्यार्थ्यांचे कविसंमेलन आणि मुलाखत अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २४ जानेवारी रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत विद्यार्थ्यांचे कविसंमेलन आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. मोना चिमोटे असतील. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. हेमंत खडके उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमात विदर्भ साहित्य संघ, शाखा अमरावतीचे नितीन भट, माधव पांडे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांतील विद्यार्थी-कवी आपली कविता सादर करणार आहेत. दि. २७ जानेवारी रोजी दुपारी ४ ते ६ या वेळेत 'काया वाचा मने' या काव्यबंधावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे.

या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. माधव पुटवाड असतील. तर प्रमुख अतिथी म्हणून साहित्यिक सुनील यावलीकर उपस्थित राहणार असून, प्रा. डॉ. मोना चिमोटे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

चर्चेत डॉ . प्रणव कोलते, श्री. दा. गो. काळे, डॉ. भगवान फाळके सहभागी होणार आहेत . पंधरवड्याचा समारोप दि. २८ जानेवारी रोजी दुपारी ४ ते ६ या वेळेत संशोधक व लेखक डॉ. अशोक मेनकुदळे यांच्या मुलाखतीने होणार आहे.

या संवाद कार्यक्रमात प्रा. डॉ. मनोज तायडे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून, संवादक म्हणून प्रा. डॉ. माधव पुटवाड आणि डॉ. प्रणव कोलते सहभागी होणार आहेत.या संपूर्ण मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या आयोजनाबद्दल कुलसचिव डॉ. अविनाश असनारे आणि मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. मोना चिमोटे यांनी विद्यापीठातील विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक व साहित्यप्रेमींना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

मराठी भाषेच्या वैभवाची जाणीव करून देणारा हा पंधरवडा विदर्भाच्या साहित्यिक चळवळीला नवी ऊर्जा देणारा ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

# कृत्रिम वाळूच्या निर्मितीसाठी परवाना प्रक्रिया

### संस्था, व्यक्तींनी अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

नैसर्गिक वाळूला एम-सॅण्ड (कृत्रिम वाळू) पर्याय म्हणून कृत्रिम वाळू धोरणाच्या सवलतींचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यात कार्यरत असलेले मंजूर खाणपट्टाधारक, तात्पुरता परवानाधारक व कोणत्याही प्रकाराचा खाणपट्टा नसलेले, परंतु एम-सॅण्ड युनिट स्थापन करून कृत्रिम वाळूची निर्मिती करू इच्छित व्यक्ती, संस्था यांनी कागदपत्रांसह जिल्हाधिकारी कार्यालय येथे अर्ज करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

या अर्जासोबत गट नंबर, नकाशा, सातबारा उतारा, वैयक्तिक अर्ज, असल्यास आधार कार्ड, पॅन कार्ड, संस्थेचा अर्ज, असल्यास संस्थेबाबतची कागदपत्रे, अर्ज फी रक्कम ५०० रुपये, तसेच एम-सॅण्ड युनिट ज्या ठिकाणी स्थापन करावयाचे आहे, त्या ठिकाणचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडील कॉन्सेंट टू एस्टॅब्लिश व कॉन्सेंट टू ऑपरेटबाबतचे प्रमाणपत्र, १०० टक्के एम-सॅण्ड युनिट उत्पादित करण्याबाबतचे १०० रूपयाच्या स्टॅम्पपेपरवरील हमीपत्र, तसेच एम-सॅण्ड उत्पादित करण्यासाठी दगड कोणत्या खाणपट्ट्यातून किंवा इतर स्त्रोतांतून आणण्यात येणार आहे, त्या खाणपट्टयाच्या अथवा स्त्रोतांचा तपशील, एम-सॅण्ड युनिट बसविण्यात येणार आहे. अशा क्षेत्राबाबत संबंधित नियोजित प्राधिकरणाकडून त्याबाबतचा वापर अनुज्ञेय आहे किंवा कसे याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र, आवश्यक त्याठिकाणी अकृषिक परवानगी आदेश, तसेच उद्योग



आधार नोंदणी असणारे प्रमाणपत्र व व्यापारी परवाना घेणे बंधनकारक आहे.

ज्या व्यक्ती, संस्था यांना हेतुपत्र देण्यात आले आहे. अशांना महसूल व वनविभाच्या निर्णयामधील औद्योगिक प्रोत्साहन अनुदान, व्याज अनुदान, विद्युत शुल्कातून सूट व वीज दर अनुदान राहील. गुंतवणूक प्रोत्साहन अनुज्ञेय असेल. रॉयल्टी प्रतिब्रास ४०० रूपये सवलत २०० रुपये प्रतिब्रास दराची तरतूद आहे.शंभर टक्के एम-सॅण्ड कृत्रिम वाळू उत्पादित करून इच्छिणाऱ्या व्यक्ती, संस्था यांनी, तसेच यापूर्वी संबंधित एम-सॅण्ड उत्पादन करणाऱ्या युनिटधारकाने महाखनिज या संगणक प्रणालीवर अर्ज केला असल्यास त्यांनी पुन्हा नव्याने जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज करणे आवश्यक राहील. याबाबत काही अडचणी अथवा शंका असलेस गौणखजिन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## संक्षिप्त

### श्री. गब्दामाता मंदिर येथे हँडपंपचे उद्घाटन

**शिराळा -** येथील श्री गब्दा माता मंदिर परिसरात हँडपंपचे उद्घाटन नुकतेच करण्यात आले आहे. माजी पंचायत समिती सदस्य व भाजपा माजी तालुकाध्यक्ष राजुभाऊ गंधे यांच्या स्वखर्चातून गब्दा माता मंदिर येथे हँडपंप देण्यात आला व उदघाटन समारंभ पार पडल्या गेला. यावेळी आशिष खैरकर भाजप उपाध्यक्ष अमरावती ग्रामीण, मनोज ठाकरे, अक्षय जवंजाळ, निलेश म्हस्के, हरीश नवरे, शुभम माहुरे, आदेश जवंजाळ, आशिष बांबल, रोहित बांबल, अंकुश नावंदर, अंशुल ढोक, सागर ल्हाळे, बबलू ल्हाळे, किशोर मुंदाणे, गोलू काळमेघ, प्रवीण भागवत, राजेंद्र ल्हाळे, व गावातील असंख्य युवा मंडळी उपस्थित होते.



### गणित संबोध परिक्षेत रिया वऱ्हाडे जिल्ह्यात प्रथम

**चांदूर रेल्वे -** अमरावती जिल्हा गणित अध्यापक मंडळ, अमरावती यांच्या वतीने आयोजित गणित संबोध परीक्षा (शैक्षणिक सत्र २०२५-२६) मध्ये मन्नालाल गुप्ता विद्यालयाची विद्यार्थिनी रिया प्रमोद वऱ्हाडे (इयत्ता आठवी) हिने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावून विद्यालयाच्या यशात मानाचा तुरा रोवला आहे.हे उल्लेखनीय यश शरयू काळे यांच्या प्रभावी मार्गदर्शन, सातत्यपूर्ण अभ्यास व मेहनतीच्या पाठबळावर तिने संपादन केले आहे. या घवघवीत यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद यांनी रिया चे कौतुक करून तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.



### राजेंद्र म्हस्के यांचा सत्कार

**शिराळा -** येथे झालेल्या माजी विद्यार्थी मेळाव्यात महाराष्ट्र शिक्षण समिती शिराळा अध्यक्ष मनोजभाऊ देशमुख यांच्या हस्ते माजी कृषी अधिकारी अमरावती राजेंद्र म्हस्के यांचा शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कस्तुराबाई जैन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय माजी विद्यार्थी मेळाव्यात माजी कृषी अधिकारी अमरावती राजेंद्र म्हस्के यांच्या सोबत दहावी पर्यत शिकणारे विद्यार्थी जुने मित्र त्यामध्ये डॉ सुरेश नावंदर, गोपाळजी दरक, प्यारेखा पठाण, मिलिंद तायडे हे जुने मित्र मंडळ या मेळाव्यात भेटुन जुन्या आठवणी जाग्या झाल्या त्यांना गावाच्या विकासाची मनोमन इच्छा आहे गावच्या विकासात्मक दृष्टीने खुप आशावादी आहेत. शिराळा येथे शिक्षणाची त्याकाळात कोणतीही सोय नोव्हती त्याकाळात दादांनी शिराळा येथे कस्तुराबाई जैन विद्यालय नावाची ज्ञान गंगा आनुन आम्ही कोणी डॉक्टर, कृषी अधिकारी, बँक मॅनेजर, इंजिनिअर मोठ्या उद्यावर गेले, शिक्षणाची सोय झाली. असाच माजी विद्यार्थ्याचा मेळावा दर वर्षी सुरू राहावा अशी आशा सर्व विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.



### जीवनशैली पर्यावरणपूरक ठेवायचा प्रयत्न करा - चारुदत्त चौधरी

**अमरावती-** भारतीय संस्कृती ही पर्यावरण पूरक असून प्रत्येक सण व उत्सव यातील पर्यावरणाचा आशय समजून घेऊन आजसुद्धा आपण पर्यावरण पूरक जीवनशैलीचा अंगीकार करत राहणे हे आपल्या प्रत्येकाचे प्रथम कर्तव्य आहे असे प्रतिपादन अखिल भारतीय ग्राहक पंचायत विदर्भ प्रांताचे सचिव चारुदत्त चौधरी यांनी केले. यवतमाळ जिल्ह्यातील रावेरी येथे अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या एक दिवसीय जिल्हा अभ्यासवर्गात पर्यावरण रक्षण या विषयावर आपले विचार मांडत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रांत अध्यक्ष डॉ. नारायणजी मेहरे होते. व्यासपीठावर पश्चिम क्षेत्र प्रमुख नितीनजी काकडे, प्रांत संघटक अभयजी खेडकर, जिल्हा ग्राहक आयोग यवतमाळचे अध्यक्ष एडव्होकेट डॉ. रविंद्रजी मराठे, यवतमाळ ग्राहक पंचायतचे अध्यक्ष अनंतजी भिसे हे मान्यवर विराजित होते.चारुदत्त चौधरी पुढे म्हणाले की प्लॅस्टिक, पॉलिथीन यापासून मुक्ती हवी असेल तर नागरिकांनी सजग होत प्लॅस्टिक कचरा संकलन व विल्हेवाट यासाठी प्रशासनाकडे सतत आग्रह धरत राहायला हवा आणि कापडी किंवा ज्यूटच्या पिशव्या वापरत राहण्याबद्दल प्रचार प्रसार करत रहायला हवा.आपल्या मनोगतात अभयजी खेडकर यांनी संघटन कौशल्य यावर मार्गदर्शन केले तर अध्यक्ष डॉ. नारायणजी मेहरे यांनी अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे वैचारिक अधिष्ठान यावर अभ्यासपूर्ण भाष्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश काळे यांनी केले. या अभ्यासवर्गाला यवतमाळ जिल्ह्यातील सात तालुक्याचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. अश्विनीताई थोडगे, शोभा इंगोले, गोपालजी बुरले, हेमंतजी निंबूळकर, प्रा. सुरेंद्रजी ताठे, प्रा. गजाननजी घुंगरुड, राष्ट्रपालजी भोंगडे, भावनां खणगन, वैष्णवी मुक्के आदिनी विशेष परिश्रम घेतलेत.

## निधन वार्ता


### प्रमोद खेरडे

**कुऱ्हा -** तिवसा तालुक्यातील वऱ्हा येथील स्व. मुरलीधर महाराज खरडे यांचे चिरंजीव प्रमोद मुरलीधर खेरडे यांचे वयाच्या ५१ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या पश्चात आई, पत्नी मुलगा प्रतिक,सुना बराच मोठा आप्त परिवार आहे.स्व. प्रमोदराव खेरडे यांच्या अंत्य विधी करिता सर्वच स्तरांवरील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते. यावेळी सामूहिक श्रध्दांजली देण्यात आली.



### जानरावजी जामनेकर

**आसेगाव पूर्णा -** येथील जानरावजी मारोतराव जामनेकर यांचे वयाच्या ९० व्या वर्षी वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलं, एक मुलगी ,सुना व नातवंड असा आप्त परिवार आहे.जानरावजी मारोतराव जामनेकर हे विठोबा सावंगा अवधूत कृष्ण महाराज सेवेतील अवधूत सांप्रदायिक मालिकेत होते.यावेळी अवधूत भजन मंडळ साखरी, पोहरा पूर्णा, आसेगाव पूर्णा येथील अवधुती भजन मंडळ तसेच पंचक्रोशीतील बहुसंख्य थोर ,लहान मंडळी उपस्थित होती.



# शहीद भगतसिंग सार्वजनिक वाचनालयांच्या वतीने महोत्सवाचे आयोजन

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

चांदूर रेल्वेवरून १७ कि.मी. अंतरावर असलेल्या कुऱ्हा येथील शहीद भगतसिंग सार्वजनिक वाचनालय यांच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही कुऱ्हा महोत्सव २०२६ हा २३ ते २५ जानेवारी दरम्यान वाचनालय परिसरात आयोजित केला आहे. महोत्सवाचे स्वागताध्यक्ष उद्योजक मनोज दारोकार हे आहेत.

२३ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता भव्य ग्रंथ दिंडी गावातून निघणार असुन यात महिला बचत गट, गावातील भजन मंडळ व सर्व शाळा सहभागी असणार आहे. यानंतर लगेच डिश डेकोरेशन स्पर्धा होणार आहे. सकाळी ११ वाजता स्व. तिर्था राजेश टेकाडे स्मृतिप्रित्यर्थ मोफत आरोग्य शिबीराचेही आयोजन करण्यात आले आहे. दुपारी १२ वाजता रस्सीखेच स्पर्धा होईल. तर दुपारी ३ वाजता उद्घाटन समारंभ पार पडणार आहे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री चंद्रशेखर बावणकुळे राहणार असुन उद्घाटन भाजपाचे संघटनमंत्री उपेंद्र कोठेकर यांच्या हस्ते होणार आहे. विशेष व प्रमुख अतिथी म्हणून खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार राजेश वानखडे, आमदार सुमित वानखडे, पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, भा.ज.पा. प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी, एसडीओ दादासाहेब दराडे, तहसिलदार डॉ. मयुर कळसे, गटविकास अधिकारी अभिषेक कासोदे, सरपंच मिना नायर, सहाय्यक ग्रंथालय संचालक डॉ. राजेश पाटील, जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ. सुरज मडावी, निरीक्षक, जिल्हा ग्रंथालय दिपक गेडाम आदींची उपस्थिती होती. यावेळी वेगवेगळ्या क्षेत्रामधील यशस्वीतांचा सत्कार होणार आहे. २४ जानेवारीला सकाळी ६ वाजता एकता मॅरेथॉन स्पर्धा होणार आहे. सकाळी ११ वाजता कराओके स्पर्धा होणार असुन याला प्रमुख अतिथी म्हणून कराओके क्लब गजेंद्र पाखरे हजर राहणार आहे. यानंतर दुपारी २ वाजता राष्ट्रभक्त शहीद ए आजम भगतसिंग या विषयावर राष्ट्रीय व्याख्याते ॲड. दिलीप कोहळे यांचे व्याख्यान होणार आहे. तर सायंकाळी ५ वाजता सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला असुन याचे उद्घाटन डान्स आर्टीस्ट वैष्णवी डाहाके यांच्या हस्ते होईल व प्रमुख अतिथी म्हणून ठाणेदार डॉ. अनुप वाकडे राहणार आहे. शेवटच्या दिवशी रविवार, २५ जानेवारीला सकाळी ८ वाजता स्लो सायकल स्पर्धा, सकाळी ९ वाजता सब खेलो सब जीतो स्पर्धा, दुपारी १२ वाजता वादविवाद स्पर्धा, दुपारी १ वाजता मेहंदी स्पर्धा तर दुपारी २ वाजता महिला मेळाव्याचे आयोजन केले आहे. यात खेळ पैठणीचा हे विशेष आकर्षण राहणार आहे. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी आरती राजेश वानखडे ह्या राहणार असुन विशेष अतिथी म्हणून मार्जी सभापती कविता पचलेरे, सत्कारमुर्ती नगराध्यक्षा अर्चना रोठे (अडसड), नगराध्यक्षा रुपाली अभय माथने ह्यांची उपस्थिती राहणार आहे. तर सायंकाळी ५ वाजता बक्षिस वितरण होणार आहे. यानंतर कवि संमेलनाने महोत्सवाचा शेवट होणार आहे. यात सादरकर्ते शब्दनक्षत्र साहित्य संघ, आर्वी आहे. तरी या महोत्सवाचा परिसरातील व जिल्ह्यातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन कुऱ्हा महोत्सव पुरुष समितीचे अध्यक्ष राजेश माणिकराव टेकाडे, महिला उत्सव समितीच्या अध्यक्षा भाग्यश्री कुऱ्हाडे, शहीद भगतसिंग सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष विवेक बिंड व इतर कार्यकारीणी मंडळ, गावकऱ्यांनी केले आहे.

# श्री गुरु तेग बहादूर : मानवजातीचे खरे तारणहार

महान योद्धा, आध्यात्मिक व्यक्तिमत्त्व आणि मातृभूमीचे प्रेमी नववे शीख गुरू श्री गुरु तेग बहादूरजी यांनी केलेल्या सर्वोच्च बलिदानाची मानवता सदैव ऋणी राहील. त्यांनी विश्वबंधुता आणि धार्मिक स्वातंत्र्याचा संदेश दिला. धर्म, मातृभूमी आणि लोकांच्या हक्कांसाठी त्यांनी जाती-धर्माचा विचार न करता सर्वस्वाचा त्याग केला. म्हणूनच त्यांना 'हिंद दी चादर' या दुर्मिळ सन्मानाने गौरवण्यात आले. आपण श्री गुरु तेग बहादूरजींचा ३५० वा शहिदी समागम वर्ष साजरा करत असताना, धार्मिक स्वातंत्र्याचे महत्त्व आणि मानवजातीच्या व मातृभूमीच्या कल्याणाविषयी शिकवण देणाऱ्या त्यांच्या महान आदर्शांना पुन्हा समर्पित करणे आवश्यक आहे.अतुलनीय श्री गुरु तेग बहादूरजींनी आपल्याला निर्भयपणे मुक्त जीवन जगण्याची शिकवण दिली. मुघल सम्राट औरंगजेबाने त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबावर केलेल्या अत्यंत छळास ते शरण गेले नाहीत, तर दैवी शांततेने तो सहन केला. त्यागमल ते तेग बहादूर असे झालेले त्यांचे परिवर्तन मानवी इतिहासात फार कमी समांतर असलेली धार्मिक दृढता, औचित्य, नैतिकता आणि शौर्याची कथा आहे. त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, पण सत्याचा मार्ग सोडला नाही. त्यांच्या देवत्वाची अशी शक्ती होती की जेव्हा त्यांच्या शिष्यांना त्यांच्या समोर मारण्यात आले, तेव्हा ते खोल ध्यानात राहिले. जेव्हा त्यांनी स्वतः परम त्याग केला, तेव्हाही ते ध्यानात मग्न होते. श्री गुरु तेग बहादूरजी म्हणाले की धर्म हा केवळ पूजा-पाठ नसून कर्तव्य आहे आणि एक आदर्श जीवनपद्धती आहे.आजच्या तरुण पिढीने श्री गुरु तेग बहादूरजींच्या जीवनातून, चारित्र्यातून आणि त्यागातून प्रेरणा घेऊन मानवता आणि नैतिक मूल्ये अंगीकारण्याची गरज आहे, जेणेकरून भारत पुन्हा विश्वगुरू होईल. अत्याचार आणि अन्यायापुढे झुकण्यास त्यांनी ठाम नकार दिला. त्यांनी आदर्श आणि तत्त्वांच्या मार्गावर चालण्याची निवड केली. काश्मिरी पंडितांचे एक शिष्टमंडळ श्री गुरु तेग बहादूरजींना भेटण्यासाठी आजच्या श्री आनंदपूर साहिब येथे आले, ज्याला चक्क नानकी असेही म्हणतात. त्यांचे म्हणणे धीराने ऐकून घेतल्यानंतर, त्यांनी त्यांना औरंगजेबाला किंवा त्याच्या




माणसांना सांगण्यास सांगितले की जर त्यांचे गुरू धर्म सोडतील, तरच ते आपला धर्म सोडतील.

त्यानंतर औरंगजेबाने केलेले कारनामे इतके भयानक होते की आजही त्यांची आठवण झाल्यावर अंगावर काटा उभा राहतो. श्री गुरु तेग बहादूरजी आणि त्यांच्या तीन भक्तांना -भाई सती दास, भाई मती दास आणि भाई दयाला - बंदिवान करण्यात आले. त्यांनी इस्लाम स्वीकारण्यास नकार दिल्यावर त्या उदात्त त्रिकूटांना त्यांच्या गुरूंसमोर फाशी देण्यात आले. त्यांनी धर्मासाठी सर्वोच्च बलिदान दिले. इ.स. १६७५ मध्ये श्री गुरु तेग बहादूरजींनी अत्यंत शांतपणे हौतात्म्य पत्करले. जुन्या दिल्लीतील चांदणी चौकातील गुरुद्वारा शीशगंज साहिब हे 'त्याग' आणि 'बलिदान' यांच्या अंतिम गाथेचे प्रतीक आहे, ज्याला मानवी इतिहासात तोड नाही. भाई जैता सिंग यांनी श्री गुरु तेग बहादूरजींचे पवित्र शीश श्री आनंदपूर साहिब येथे नेले, जे जगभरातील शीखांसाठी सर्वात पवित्र स्थळांपैकी एक आहे.त्यांच्या बलिदानामुळे 'वसुधैव कुटुंबकम' या तत्त्वावर आधारित प्राचीन सभ्यता आणि संस्कृती केवळ नष्ट होण्यापासून वाचली नाही, तर एक दृढ आणि सर्वसमावेशक राष्ट्र म्हणून उदयास येण्याच्या आपल्या सामूहिक प्रयत्नांमध्ये तो एक ऐतिहासिक टप्पा ठरला. शीख धर्माचा पाया हा मानवी इतिहासातील सामान्य विकास नव्हता, तर तो सर्व प्रकारच्या अत्याचारांविरुद्ध मानवतेची ढाल बनला. ही एक महान परंपरा होती आणि आजही आहे. नववे शीख गुरू श्री गुरु तेग बहादूरजींनी केवळ लोकांचा धर्मरक्षणाचा संकल्प जपला आणि बळकट केला नाही, तर शीख धर्माला महानतेच्या पुढील स्तरावर नेले.श्री गुरु तेग बहादूरजींना माहीत होते की त्यांच्या भक्तांनी कोणताही पश्चात्ताप न करता धर्मासाठी किंमत मोजली. त्यांनी सर्व मोह नाकारले, सर्व वेदना आणि त्रास सहन केले, पण अश्रू ढाळले नाहीत.

धर्मकार्यावरील त्यांची बांधिलकी आणि श्रद्धा अतूट होती. श्री गुरु तेग बहादूर यांचे जीवन हे धर्म आणि मानवजातीच्या कल्याणासाठी केलेल्या अतुलनीय बलिदानांचे सर्वोच्च उदाहरण आहे. औरंगजेबाच्या क्रूरतेपुढे त्यांनी कधीही शरणागती पत्करली नाही. प्रत्येक प्रश्नाला त्यांचे उत्तर स्पष्ट होते - मी शीख आहे आणि शीखच राहणार!श्री गुरु तेग बहादूरजींच्या शिकवणीतून आणि त्यागातून आपल्याला अनेक आणि बहुआयामी धडे मिळतात. त्यांचा त्याग, सत्यावरील अढळ विश्वास, अहिंसा आणि सर्वांप्रती परोपकारी दृष्टीकोन आजही आपल्यासाठी प्रेरणादायी आहे. अंधश्रद्धा, जातीय भेदभाव आणि अस्पृश्यतेविरुद्ध त्यांनी संघर्ष केला, जेणेकरून प्रत्येक मानवाला आपल्या आवडीचे जीवन जगता येईल. धर्म हे सर्वांचे कर्तव्य आहे.

खरा धर्म आपल्याला सर्वांशी चांगले वर्तन करण्याची आणि समाजाची शक्य तितकी सेवा करण्याची शिकवण देतो. त्यांनी दुर्बल आणि वंचितांच्या बाजूने ठामपणे उभे राहिले. त्यांचे पुत्र श्री गुरु गोविंद सिंगजी यांनी केवळ वडिलांची तत्त्वे आणि मूल्ये जपली नाहीत, तर खालसा निर्माण करून त्यांना पुढे नेले, जो धार्मिकता आणि न्यायासाठी लढण्याचे प्रतीक आहे.

आपण श्री गुरु तेग बहादूरजींचे हे महान वचन सदैव लक्षात ठेवले पाहिजे - 'आपण आपले जीवन सुख-दुःखात तसेच मान-अपमानात समान भावनेने जगले पाहिजे.' त्यांच्या शिकवणीतून जीवनाचा उद्देश तसेच समता, समरसता आणि त्याग यांचे महत्त्व अधोरेखित होते. श्री गुरु तेग बहादूरजींचे महान शब्द हे मानवतेसाठी ऊर्जा आणि ज्ञानाचे चिरंतन स्रोत आहेत. गुरूंच्या शब्दांच्या मधुर पठणाचा भक्तांवर खोल परिणाम होत असे. त्यांनी अत्यंत शांततापूर्ण आणि मानवतावादी मार्गाने निरंकुश व धर्मांध शासकाशी संघर्ष केला. त्यांची शिकवण कालातीत आहे आणि येणाऱ्या पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहील.

श्री गुरु तेग बहादूर यांचे जीवन आपल्याला प्रत्येक परिस्थितीला शांततेने आणि खंबीरतेने सामोरे जाण्याची तसेच सौहार्द, न्याय, समता आणि समरसतेवर आधारित सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याची प्रेरणा देते.

**अनिल आलुरकर**

# थोर क्रांतिकारक नेते आझाद हिंद सेनेचे सरसेनापती नेताजी सुभाषचंद्र बोस

स्वातंत्र्य चळवळीतील थोर क्रांतिकारक नेते आझाद हिंद सेनेचे सरसेनापती सुभाषचंद्र बोस यांची उद्या म्हणजे २३ जानेवारी रोजी जयंती आहे. २३ जानेवारी १८८७रोजी कटक येथे नेताजींचा जन्म झाला. नेताजींना आठ भावंडे होती. नेताजी लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. वयाच्या १५ वर्षीच नेताजींनी हिमालयाच्या दिशेने प्रस्थान केले.कॉलेजमध्ये असताना एका इंग्रज शिक्षकाने भारतीयांना दूषणे दिली तेंव्हा नेताजींनी उभे राहून त्या शिक्षकाला जाब विचारीत निषेध नोंदवला.

इतकेच नाही तर त्या शिक्षकावर कारवाई व्हावी यासाठी कॉलेजमध्ये बंद पुकारला याचा राग मनात धरून कॉलेज प्रशासनाने त्यांना कॉलेजमधून काढून टाकले. १९२१ साली इंग्लंडला जाऊन नेताजींनी इंडियन सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा दिली त्यात ते चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. नेताजींनी काहीकाळ सिव्हिल सर्व्हीसमध्ये नोकरी देखील केली. पण भारत मातेला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासा सहा महिने त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंगात असताना त्यांनी इतिहास, धर्मशास्त्र आणि मानसशास्त्र या विषयांचे वाचन केले. तुरुंगातून मुक्त झाल्यावर त्यांनी भारतातील राजकीय परिस्थितीचा अभ्यास केला आणि ते राजकारणात सक्रिय झाले. ते बंगाल प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष बनले. पुढे त्यांनी इंडिया इंडिपेंडन्स युथ लीगची स्थापना करुन तरुणांना संघटित केले. १९३० च्या सविनय कायदे भंगाच्या आंदोलनात नेताजींना पुन्हा अटक झाली. गांधी आयर्विन करारानंतर त्यांची मुक्तता झाली. ते कोलकोत्याचे महापौर बनले. गांधी आयर्विन कराराला नेताजींनी विरोध केला त्यामुळे त्यांचे महात्मा गांधीशी मतभेद झाले. १९३२ साली सशस्त्र क्रांतिकारी संघटनेशी संबंध जोडून त्यांना अटक करण्यात आली. पण प्रकृतीच्या कारणावरून त्यांना तुरुंगात न ठेवता देशातून हद्दपार करण्यात आले. तीन वर्षे ते व्हिएन्ना येथे राहिले. तिथे त्यांनी युरोपातील राजकीय परिस्थितीचा अभ्यास केला. १९३७ साली गांधीजींच्या विरोधाला न जुमानता त्यांनी त्रिपुरा काँग्रेस अधिवेशनात अध्यक्षपदाची निवडणूक लढवली. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत त्यांनी पट्टाभीसीतारामय्या यांचा पराभव केला. या निवडणुकीमुळे महात्मा गांधी नाराज झाले. हा आपलाच पराभव आहे असे ते मानू लागले. बहुसंख्य कॉंग्रेसजनांनी गांधीजींचेच नेतृत्व मान्य केले. त्यामुळे नेताजींनी अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन फॉरवर्ड ब्लॉक या पक्षाची स्थापना केली. नागपूर अधिवेशनात अस्थायी राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याची मागणी करण्यात आली. पण संकल्पित सत्यागृहापूर्वीच त्यांना अटक करण्यात आली. अटक केल्यानंतर नेताजींनी अन्नत्याग करु अशी धमकी दिली. या धमकीला घाबरून इंग्रजांनी त्यांना तुरुंगात न ठेवता त्यांच्या घरीच नजरकैदेत ठेवले. नजरकैदेत असतानाच त्यांनी वेषांतर करुन पेशावर गाठले तेथून ते जर्मनीला गेले. जर्मनीत त्यांनी भारतीयांना इंग्रजांविरुद्ध लढण्यास प्रवृत्त केले. त्यांनी तेथील भारतीयांना संघटित केले. जर्मनीमध्ये ते एडॉल्फ हिटलरला भेटले. बर्लिनमध्ये त्यांनी आझाद हिंद रेडिओ व फ्री इंडिया सेंटरची स्थापना केली. १९४३ ला नेताजींना जपानवरून आमंत्रण आले. जर्मनीहून जपान व्हाया मादागास्कर असा सबमरीन प्रवास करीत ते जपानला पोहचले. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी त्यांनी सिंगापूर येथे आझाद हिंद सरकारची स्थापना केली. नेताजी स्वतः राष्ट्रप्रमुख, पंतप्रधान, संरक्षण मंत्री व सरसेनापती बनले. या राष्ट्राला जपान, जर्मनी, ब्रह्मदेश, इटली यासह ११ देशांनी मान्यता दिली. नेताजींनी तरुणांना आझाद हिंद सेनेत सहभागी होण्याचे आव्हान करीत तुम मुझे खून दो... मै तुम्हे आझादी दुंगा...अशी घोषणा केली. त्यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत हजारो तरुण आझाद हिंद सेनेत सामील झाले. रंगून आकाशवाणी वरुन नेताजींनी भाषण करुन इंग्रजांशी कोणत्याही प्रकारचा समजोता न करण्याचे, फाळणी न करण्याचे लढा चालूच ठेवण्याचे आव्हान केले. जपानने शरणागती पत्करली तेंव्हा नेताजींनी रशियाला जाण्याचा निर्णय घेतला. १८ ऑगस्ट १९४५ रोजी नेताजी विमानातून माणचुरीयाच्या दिशेने जात होते. प्रवासादरम्यान त्यांचे विमान बेपत्ता झाले. २३ ऑगस्ट १९४५ रोजी जपानच्या दोनयी वृत्तसंस्थेने जगाला कळवले की १८ ऑगस्ट रोजी नेताजींच्या



विमानाला अपघात झाला त्यात नेताजींचे निधन झाले. १९९२ साली भारत सरकारने नेताजींना मरणोत्तर भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार देण्याची घोषणा केली पण मृत्यूबाबत कोणताही पुरावा उपलब्ध नसल्याने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देणे अवैध आहे असे म्हणत त्यांच्या कुटुंबीयांनी हा पुरस्कार नाकारला. तुम मुझे खून दो... मै तुम्हे आझादी दुंगा... असा नारा देत भारतीयांमध्ये स्वातंत्र्य लढ्याची चेतना निर्माण करणाऱ्या नेताजींना जयंतीदिनी विनम्र अभिवादन.

**श्याम ठाणेदार**

# समताधिष्ठित राष्ट्रनिर्मितीचा तेजस्वी मार्ग

भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास हा केवळ राजकीय सत्तांतराचा दस्तऐवज नसून तो भारतीय समाजाच्या आत्मसन्मानाचा, सामाजिक परविर्तनाचा आणि मानवी प्रतिष्ठेच्या पुनर्स्थापनेचा प्रदीर्घ संघर्ष आहे. या संघर्षात अनेक थोर नेत्यांनी आपले विचार, कृती आणि बलिदान यांच्या माध्यमातून राष्ट्राला नवी दिशा दिली. मात्र या सर्वांमध्ये नेताजी सुभाषचंद्र भोस यांचे व्यक्तिमत्त्व विलक्षण तेजस्वी, धैर्यशील आणि दूरदृष्टीपूर्ण होते. नेताजी हे केवळ सशस्त्र क्रांतीचे नेतृत्व करणारे योद्धा नव्हते, तर ते भारतीय समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि नैतिक पुनर्रचनेचे स्वप्न पाहणारे महान समाजचिंतक होते. २३ जानेवारी १८९७ रोजी ओडिशातील कटक येथे जन्मलेले नेताजी संपूर्ण आयुष्य देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी झटले.

नेताजींच्या जीवनकार्याचा विचार करताना हे स्पष्टपणे जाणवते की, त्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्याचा अर्थ अत्यंत व्यापक होता. परकीय सत्तेपासून मुक्त होणे हे स्वातंत्र्याचे केवळ पहिले पाऊल आहे, असे ते मानत. त्यांच्या मते, खरे स्वातंत्र्य तेव्हाच प्राप्त होईल, जेव्हा भारतीय समाजातील प्रत्येक व्यक्तीला सामाजिक न्याय, आर्थिक संधी, मानवी सन्मान आणि सुरक्षित जीवनाचा अधिकार मिळेल. जात, धर्म, वर्ग, लिंग किंवा भाषेच्या आधारे होणारा भेदभाव संपुष्टात येऊन समतावादी समाजरचना निर्माण होणे, हाच त्यांच्या स्वातंत्र्यसंकल्पनेचा केंद्रबिंदू होता.नेताजींच्या सामाजिक जाणीवेची मुळे त्यांच्या बालपणातच रुजलेली दिसतात. ब्रिटिश सत्तेच्या अन्यायकारक धोरणांचा, भारतीयांवरील अपमानास्पद वागणुकीचा आणि देशातील दारिद्र्याचा त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला होता. शिक्षणाच्या काळात स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा त्यांच्या मनावर खोलवर प्रभाव पडला. आत्मगौरव, आत्मविश्वास, सेवा, त्याग आणि मानवतावाद या मूल्यांनी नेताजींच्या व्यक्तिमत्त्वाची घडण केली. आयसीएससारख्या सर्वोच्च सेवेत यश मिळवूनही त्या पदाचा त्याग करून त्यांनी स्वातंत्र्यलढ्याचा मार्ग स्वीकारला. हा निर्णय केवळ राजकीय नव्हता, तर तो सामाजिक बांधिलकीचा आणि नैतिक धैर्याचा ठोस आविष्कार होता.स्त्री-सक्षमीकरण हा नेताजींच्या सामाजिक कार्याचा अत्यंत महत्त्वाचा आणि क्रांतिकारी पैलू होता. त्या काळातील भारतीय समाजात स्त्रियांना प्रामुख्याने दुय्यम आणि मर्यादित भूमिका दिली जात होती. मात्र नेताजींनी स्त्रियांकडे राष्ट्रनिर्मितीतील समान भागीदार म्हणून पाहिले. आजाद हिंद सेनेतील 'राणी झाशी रेजिमेंट' ही भारतीय इतिहासातील स्त्री-मुक्तीची ऐतिहासिक घटना होती. स्त्रियांना शस्त्र हातात घेऊन राष्ट्रासाठी लढण्याची संधी देणे म्हणजे केवळ लष्करी धोरण नव्हते, तर ते सामाजिक क्रांतीचे प्रतीक होते. नेताजींच्या मते, जो समाज आपल्या अर्ध्या लोकसंख्येला दुर्लक्षित ठेवतो, तो समाज कधीही खऱ्या अर्थाने स्वतंत्र आणि प्रगत होऊ शकत नाही.

धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय एकात्मता हे नेताजींच्या सामाजिक कार्याचे अत्यंत महत्त्वाचे आधारस्तंभ होते. भारत हा विविध धर्म, भाषा आणि संस्कृतींचा देश आहे आणि ही विविधताच भारताची खरी ओळख आहे, असा त्यांचा विश्वास होता. ब्रिटिशांनी 'फोडा आणि राज्य करा' या धोरणातून धार्मिक आणि सामाजिक तेढ निर्माण केली होती. नेताजींनी या धोरणाचा तीव्र विरोध केला. आजाद हिंद सेनेत हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन सर्वजण एकत्र येऊन 'जय हिंद'चा नारा देत लढत होते. हा नारा केवळ युद्धघोष नव्हता, तर सामाजिक एकात्मतेचे आणि राष्ट्रीय ऐक्याचे प्रतीक होता.शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, असे नेताजी ठामपणे मानत. ब्रिटिश शिक्षणपद्धती ही भारतीयांना मानसिक गुलामगिरीत ठेवणारी आहे, अशी त्यांची टीका होती. शिक्षणातून केवळ नोकरदार तयार न होता स्वाभिमानी, राष्ट्रभक्त आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव असलेले नागरिक घडले पाहिजेत, असे त्यांचे मत होते. युवकांनी शिक्षणाचा उपयोग केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी न करता समाजाच्या उन्नतीसाठी करावा, असा त्यांचा आग्रह होता.युवाशक्तीवर नेताजींचा अपार विश्वास होता. युवक हे राष्ट्राचे खरे शिल्पकार असून सामाजिक परिवर्तनाची जबाबदारी त्यांच्यावरच आहे, असे ते मानत. भीती, न्यूनगंड आणि निष्क्रियता यांचा त्यांनी तीव्र निषेध केला. ध्येयासाठी सर्वस्व अर्पण करण्याची तयारी, त्यागाची वृत्ती आणि राष्ट्रासाठी बलिदान देण्याची क्षमता हीच युवकांची खरी ओळख असावी, असा त्यांचा संदेश होता.

नेताजी सुभाषचंद्र भोस यांचे सामाजिक कार्य आजच्या काळात अधिकच अर्थपूर्ण वाटते. वाढती आर्थिक विषमता, बेरोजगारी, स्त्री-असमानता, सामाजिक तणाव आणि सांप्रदायिकता यांसारख्या समस्या आजही आपल्या समाजासमोर उभ्या आहेत. अशा परिस्थितीत नेताजींचा समतावादी, शिस्तप्रिय आणि राष्ट्रकेंद्री दृष्टिकोन आपल्याला मार्गदर्शक ठरतो. त्यांच्या विचारांमध्ये केवळ संघर्षाची भाषा नाही, तर समाजबांधणीची स्पष्ट दिशा आहे.२३ जानेवारी रोजी नेताजी सुभाषचंद्र भोस यांची जयंती साजरी करताना त्यांच्या केवळ शौर्याचे नव्हे, तर त्यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या स्वप्नाचे स्मरण करणे अत्यंत आवश्यक आहे. सामाजिक न्याय, समता, बंधुता, स्त्री-समानता, आर्थिक समतोल आणि मानवी प्रतिष्ठेवर आधारित भारत निर्माण करणे हेच नेताजींना खरे अभिवादन ठरेल. नेताजी हे इतिहासातील एक महान योद्धा नसून ते आजही भारतीय समाजाच्या आत्म्याला प्रेरणा देणारे जिवंत विचार आहेत.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

# नेताजी सुभाषचंद्र बोस देशाचे तेजोमय क्रांतीकारी योध्दा

भारत स्वातंत्र्य करण्यासाठी देशात दोन नद्यांचा उगम झाला.एक मवाळवादी तर दुसरी जहालवालवादी यांच्या संगमानेच १५ ऑगस्ट१९४७ ला भारत स्वतंत्र झाला.२३ जानेवारी १८९७ला ओडिसा मधील कटक शहरात जन्माला आलेले नेताजी भारतासाठी चमकता तारा सिध्द झाले व स्वतंत्र भारतासाठी महान योध्दा म्हणून उदयास आले. नेताजींनी १५ वर्षाच्या वयातच स्वामी विवेकानंदांचे सर्व साहित्य वाचून काढले व देश निर्माण करण्याची ज्वाला प्रज्वलित झाली आणि देश स्वतंत्र करण्यासाठी संपूर्ण ताकदीनिशी संघर्षाला सुरुवात केली.

कोलकत्यातील जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक देशबंधू चित्तरंजन दास यांच्या कार्याने नेताजी प्रभावीत झाले व त्यांच्या सोबत काम करायला सुरुवात केली. २० जुलै १९२१ रोजी महात्मा गांधी व सुभाषचंद्र बोस सर्वप्रथम एकमेकांना भेटले.यावेळी गांधींजींनीसुध्दा नेताजींना दासबाबू सोबत काम करण्याचा सल्ला दिला.कारण चित्तरंजन दास हे बंगाली वकील व भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अग्रणी पुढारी होते.त्यामुळे त्यांना देशबंधू असे संबोधले जात असे. १९२५ साली इंग्रजांच्या लक्षात आले की नेताजी क्रांतीकारकांशी संबंध ठेवतात व क्रांतीकारकांचे स्फुर्तीस्थान असल्याचे त्यांच्या लक्षात आले.ह्या कारणास्तव इंग्रज सरकारने सुभाषबाबूंना अटक केली व कोणताही खटला न चालवीता त्यांना अनिश्चित काळासाठी म्यांमारच्या कारागृहात बंदिस्त केले.नेताजींचा संपूर्ण प्रवास अत्यंत संघर्षमय व खडतड रहाला. कारण त्यांच्या व सहकाऱ्यांच्या रक्ताता-रक्तात स्वातंत्र्याची ज्वाला धगधगत होती.त्यांचे एकच स्वप्न होते ते म्हणजे भारत स्वतंत्र करणे यासाठीच त्यांनी विदेशी वारी करून इंग्रजाच्या दुश्मन राष्ट्रांशी हातमिळवणी करून भारतीय संघर्षाचा मोठा लढा आझाद हिंद सेनेच्या नेतृत्वात उभा केला. तेव्हाच १५ ऑगस्ट १९४७ ला स्वतंत्र भारत उदयास आला. कारण इंग्रजांना देशातून पळवून लावण्यात आझाद हिंद सेनेचा मोठा वाटा आहे. आझाद हिंद सेनेची स्थापना पहिल्यांदा २९ आक्टोंबर १९१५ ला राजा महेंद्र प्रताप सिगं यांनी केली.त्यावेळी आझाद हिंद सरकारची सेना म्हणून ओळखली जायची.यांचा उद्देश भारताला इंग्रजांपासुन स्वतंत्र करने.जेव्हा दक्षिण-पूर्वी एशियामध्ये जापानच्या सहयोगाने नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी ४० हजार भारतीय स्त्री-पुरूषांना प्रशिक्षीत करून सेनेत सहभागी केले त्याला सुद्धा आझाद हिंद फौज असे नाव देण्यात आल्यानंतर सुभाषचंद्र बोस यांना आझाद हिंद सेनेचा सर्वोच्च कमाण्डर नियुक्त केल्यानंतर आझाद हिंद सेनेची संपूर्ण कमान नेताजी सुभाषचंद्र बोस यांना सोपविण्यात आली आणि सुभाषचंद्र बोस यांचा क्रांतीकारी लढा सुरू झाला. नेताजी १९३३ पासून १९३६ पर्यंत युरोपमध्ये रहाले.तो काळ जर्मनच्या हिटलरचा नाझीवाद आणि इटलीचे नेते मुसोलिनीचा फासीस्टवाद असा होता.यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सर्वतोपरी मदत करण्याचे वचन दिले.कारण या दोघांच्या निशाण्यावर इंग्लंड हाच देश होता. कारण इंग्लंडचे जगाच्या ७५ टक्के देशावर अधिपत्य होते. त्यामुळे इंग्लंडचा जगावर अतीरेक वाढत होता.कारण इंग्लंडने पहिल्या विश्व युध्दानंतर जर्मनीवर एकतर्फी करार लादण्यात आले होते.त्याचाच बदला जर्मनी इंग्लंड कडून घेणार होता. भारतावरसुध्दा इंग्रजांचे राज्य होते.त्यामुळे याच संधीचा फायदा घेण्याचे नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी



मनात ठानले व नेताजींनी हिटलर व मुसोलिनी यांच्याशी हातमिळवणी केली. १९४३ मध्ये त्यांनी जर्मनीला सोडून ते जापानला जाऊन पोहोचले.जापानचे प्रधानमंत्री जनरल हिदेकी तोजो यांनी त्यांना सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. जापानमधून सिंगापूरला गेले.वयोवृध्द क्रांतीकारी रासबिहारी बोस ह्यांनी सिंगापूर येथील 'फेरर पार्कमध्ये भारतीय स्वातंत्र्य परिषदेचे नेतृत्व सुभाषबाबूंकडे सोपवीले.त्याचप्रमाणे सिंगापूर इथे कॅप्टन मोहन सिंग व्दारा स्थापित 'आझाद हिंद सेनेची'कमान आपल्या हाती घेतली.भारताला स्वतंत्र करण्यासाठी आझाद हिंद सरकारची स्थापना केली.तसेच 'आझाद हिंद सेना' गठीत केली.या संघाचे प्रतीक चिन्ह असलेल्या झेंड्यावर डरकाळी मारणाऱ्या वाघाचे चित्र होते.कारण नेताजींची संपूर्ण कार्यशैली वाघासारखीच होती.आझाद हिंद सेनेने १८ मार्च १९४४ रोजी भारतभूमीत प्रवेश केला व माऊडॉक येथे त्यांनी भारताचा तिरंगा फडकावला. नेताजी ४ जुलै १९४४ ला बर्मा पोहचले. तेथुनच त्यांनी भारतीयांसाठी नारा दिला ' तुम मुझे खून दो मैं तुम्हे आझादी दुंगा'.१९३९ ला गांधी विचारधारेला हरवुन नेताजींची कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली.यावर महात्मा गांधी म्हणाले की सुभाषचंद्र बोस यांचा विजय व माझा पराजय आहे.गांधीजींच्या या वक्तव्याने व विचारांमुळे सुभाषचंद्र बोस यांचे मन दुःखावले व स्वत:हुन कॉंग्रेस सोडली. कारण महात्मा गांधी मवाळवादी तर सुभाषचंद्र बोस जहालवादी विचारांचे होते.परंतु दोघांचाही लढा भारत स्वातंत्र्यासाठीच होता.१९४४ मध्ये अमेरिकन पत्रकार लुई फिशर ह्यांच्याशी चर्चा करतांना महात्मा गांधींनी नेताजींना 'देशभक्तांचा देशभक्त' असा उल्लेख केला होता. तर ४ जुन १९४४ ला सिंगापूरवरून एक संदेश देतांना सुभाषचंद्र बोस यांनी महात्मा गांधी यांना राष्ट्रपिता महात्मा गांधी म्हणुन संबोधले तेव्हा पासून महात्मा गांधींना राष्ट्रपिता संबोधल्या जावु लागले.त्यामुळे महात्मा गांधींनी अहिंसेचा मार्ग अवलंबला तर नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी क्रांतीकारीचा मार्ग अवलंबला. दोघांचाही लढा भारत स्वातंत्र्यासाठीच होता. त्यामुळेच १५ ऑगस्ट१९४७ ला भारत स्वतंत्र झाला.१८ ऑगस्ट १९४५ ला भारतासाठी दु:खद समाचार आला नेताजी सुभाषचंद्र बोस टोकियोला जातांना तैवान येथील तैहोको जवळ हवाई दुर्घटने दरम्यान नेताजींचा मृत्यू झाला व त्यांचे स्वप्न अधुरे रहाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. परंतु त्यांचे मृत शरीर अजुनही मिळाले नाही.म्हणुनच नेताजींच्या मृत्युच्या कारणांवर आज देखील विवाद सुरू असल्याचे दिसून येते.आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी आपली वाममार्गाने कमवीलेली संपूर्ण धनसंपत्ती देशहितासाठी स्वखुशीने खर्च केली तर ही खरी देशभक्ती ठरेल व नेताजींना खरी आदरांजली समजल्या जाईल.आजच्या युवा पिढीमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे आचार-विचार जागृत होने गरजेचे आहे.कारण देश निर्माण, देशाची प्रगती, देशाचा विकास नेताजींच्या विचारांनीच जलदगतीने पुढे जावु शकतात.त्याच बरोबर मी देशवासियांना आग्रह करेल की नेताजींच्या१२९ व्या जयंतीचे औचित्य साधून प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावावेत व देशात १२९ कोटी वृक्ष एकाच दिवशी लावण्याचा संकल्प सरकारनी, संघटनांनी व जनतेनी घ्यावा.सुभाषचंद्र बोस यांच्या १२९ व्या जयंती निमित्त कोटी कोटी प्रणाम.

**रमेश लांजेवार**

## 'कर भरतो, पण सुविधा नाहीत; हा अन्याय थांबवणारच'

# प्रभाग १७(अ) मधील रखडलेला विकास मार्गी लावण्याचा निर्धार

## नवनिर्वाचित नगरसेविका जया विनोद गेडाम यांची स्पष्ट भूमिका



**■ प्रतिनिधी | अकोला ■**

*प्रभाग क्रमांक १७(अ) मधील नागरिकांनी पुन्हा एकदा विश्वास टाकलेली जबाबदारी स्वीकारताना नवनिर्वाचित नगरसेविका जया विनोद गेडाम यांनी विकासाच्या मुद्द्यावर आक्रमक आणि ठाम भूमिका मांडली आहे. 'नागरिक नियमितपणे कर भरत असतील, तर त्यांना मूलभूत सुविधा मिळायलाच हव्यात. केवळ कर वसुली आणि विकासाचा अभाव हा अन्याय आहे,' असे स्पष्ट शब्दांत सांगत त्यांनी प्रभागातील प्रलंबित प्रश्नांना प्राधान्य देणार असल्याचे 'जनमाध्यम'शी बोलताना नमूद केले.*

प्रभागात गेल्या काही वर्षांत ठोस आणि सर्वसमावेशक अशी विकासकामे झाली नसल्याचा आरोप करत गेडाम म्हणाल्या की, केवळ कागदी नियोजन झाले; प्रत्यक्षात नागरिकांच्या समस्या मात्र वाढत गेल्या. प्रचारादरम्यान नागरिकांशी संवाद साधताना रस्ते, नाल्या, पिण्याचे पाणी, बंद पथदिवे आणि घनकचऱ्याचा प्रश्न या तक्रारी मोठ्या प्रमाणात समोर आल्या. विशेषतः गाडगेनगर, शाळा क्रमांक १९ मागील परिसर, आनंदनगर, खिडकीपुरा, भांडपुरा चौक, बाळापूर नाका परिसर आणि दलीत वस्तीतील अनेक भागांत विकासकामांचा मोठा अनुशेष असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

घनकचरा व्यवस्थापन हा प्रभागातील सर्वात गंभीर प्रश्न बनला असल्याचे सांगताना गेडाम यांनी स्वच्छतेच्या नावाखाली सुरू असलेल्या गोंधळावर नाराजी व्यक्त केली. कचरा वेळेवर उचलला जात नसल्याने आरोग्याचे प्रश्न निर्माण होत असून नागरिक त्रस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर प्रभागात अतिरिक्त सफाई कर्मचारी वर्गाची मागणी करून कचरा घंटागाडी नियमितपणे यावी यासाठी प्रशासनावर सातत्याने दबाव टाकणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. 'स्वच्छता ही दिखावा नसून जबाबदारी आहे,' असे त्या म्हणाल्या.

दलीत वस्त्यांमधील विकासाकडे झालेल्या दुर्लक्षावर बोट ठेवत त्यांनी सामाजिक समतेच्या विकासाचा मुद्दा ठळकपणे मांडला. रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा आणि पथदिवे यांसारख्या मूलभूत सुविधांमध्ये दलीत वस्त्यांमध्ये मोठी तूट असल्याचे त्यांनी नमूद केले. 'विकास निवडक भागांसाठी नसून सर्व समाजघटकांसाठी असला पाहिजे,' असे त्या ठामपणे म्हणाल्या.

घरकुलाचा प्रश्न प्रभागासह संपूर्ण शहरात ऐरणीवर असून अनेक पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव महापालिकेत वर्षानुवर्षे प्रलंबित असल्याबाबत गेडाम यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. स्वतः भाड्याच्या घरात राहत असल्याने घर नसण्याची वेदना काय असते, हे आपल्याला चांगलेच ठाऊक असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे रखडलेल्या घरकुल फायली मार्गी लावून पात्र लाभार्थ्यांना न्याय देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. 'घरकुल ही सवलत नसून गरज आहे,' असे त्या म्हणाल्या. आपल्या राजकीय वाटचालीचा आढावा घेताना गेडाम यांनी २०१२ मधील कार्यकाळाची आठवण करून दिली. त्या काळात शिवसेना वसाहत परिसरातून नगरसेविका म्हणून काम करताना रस्ते, नाल्या, सर्व्हिस लाईन यांची कामे करण्यात आली होती. बजरंग चौक येथे सभागृहाचे बांधकामही करण्यात आले होते. सर्व समाज घटकांना सोबत घेऊन विकास साधण्याचा तोच दृष्टिकोन आजही कायम असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. २०१७ मध्ये प्रभाग पद्धती बदलल्यामुळे पराभव स्वीकारावा लागला असला, तरी २०२६ मध्ये नागरिकांनी पुन्हा विश्वास दाखविल्याने अधिक जबाबदारीने काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले. 'प्रभागातील नागरिकांनी दिलेला विश्वास हा केवळ मतांपुरता मर्यादित नाही, तर विकासाची अपेक्षा आहे. त्या अपेक्षांना तडा जाऊ देणार नाही,' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### ● महापौर पदाबाबत भूमिका

आज महापौर पदाचे आरक्षण जाहीर होणार असून एसटी महिला प्रवर्गासाठी आरक्षण खुले झाल्यास जया विनोद गेडाम यांना महापौर पदाची संधी मिळू शकते. या संदर्भात बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, महापौर पद मिळाल्यास पक्षीय राजकारण बाजूला ठेवून संपूर्ण शहराच्या विकासावर भर दिला जाईल.

महापौर झाल्यास पहिल्याच सभेत अवाजवी करवाढ कमी करण्यासाठी ठराव मांडण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. शहरात सिटी बस सेवा पूर्ववत सुरू करणे, प्रशस्त रस्ते आणि नाल्यांची निर्मिती, भूमिगत गटार योजनेमुळे खराब झालेले रस्ते तातडीने दुरुस्त करणे, पथदिव्यांचा प्रश्न कायमचा निकाली काढणे आणि शहरवासियांना दररोज पिण्याचे पाणी मिळावे यासाठी ठोस प्रयत्न केले जातील, असे त्यांनी सांगितले.

शहर सौंदर्यीकरणासोबतच मोर्णा नदीकाठचा विकास करून तेथे चौपाटी उभारण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. अतिक्रमणाचा प्रश्न संवेदनशील असून फेरीवाला धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करून पथविक्रेत्यांसाठी स्वतंत्र व्यवस्था उभारली जाईल. तर भाड्याच्या घरात राहण्याची वेदना आपल्याला माहिती आहे, कारण आपण मी भाड्याच्या घरात राहते त्यामुळे 'एकाही नागरिकाला बेघर राहू देणार नाही,' असा ठाम निर्धार व्यक्त करत त्यांनी शहराच्या सर्वांगीण विकासाची दिशा स्पष्ट केली.

# मावशी केळकर यांचे नाट्यमय जीवनचरित्र सादर

## आद्य ब्रह्मवादिनी फाउंडेशनचे आयोजन



**■ प्रतिनिधी | अकोला ■**

आद्य ब्रह्मवादिनी फाउंडेशन, अकोला यांच्या वतीने वंदनीय लक्ष्मीबाई उपाख्य मावशी केळकर (संस्थापिका, राष्ट्र सेविका समिती) यांच्या जीवनकार्यावर आधारित नाट्यमय जीवन चरित्र परिचय ही लघु नाटिका दि. २० जानेवारी रोजी प्रमिलाताई ओक सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या नाटिकेच्या उद्घाटन प्रसंगी मंचावर ब्रम्हवादिनी संस्थेच्या संस्थापिका डॉक्टर वृषालीताई शिलेदार, प्रकल्प प्रमुख तथा पालक संचालक सौ जयश्रीताई धर्माधिकारी, राष्ट्रसेविका समितीच्या विदर्भ प्रांत सहकार्यवाहीका डॉ. राधाताई पुरी नगर कार्यवाहीका वैशालीताई देशपांडे, अंजलीताई देशपांडे, डॉ. छाया नाईक डॉ. पारथासारथी शुक्ल उपस्थित होते.

या नाटिकेतून मावशी केळकर यांचे राष्ट्रसेवा, संघटन, स्त्रीशक्ती उभारणी व सामाजिक कार्यातील योगदान प्रभावी नाट्यरूपात सादर करण्यात आले. प्रेक्षकांनी नाटिकेला उत्स्फूर्त प्रतिसाद देत कलाकारांच्या अभिनयाचे भरभरून कौतुक केले.

या कार्यक्रमाची संकल्पना व संस्थापना डॉ. वृशालिताई शिलेदार यांनी केली. नाटिकेचे लेखन डॉ. छाया नाईक यांनी केले.व शब्द रचना श्रद्धा ताई पाठखेडकर, प्रकल्प प्रमुख व पालक म्हणून सौ. जयश्री धर्माधिकारी यांनी मार्गदर्शन केले. दिग्दर्शनाची जबाबदारी सौ. सोनिया तऱ्हाळकर यांनी समर्थपणे पार पाडली.

आयोजनात सौ. सोनाली हसराळे, दिपा देशपांडे, सौं गायत्री देशपांडे, सौं अनिता व्यवहारे तसेच संपूर्ण कार्यकारिणी मंडळाचे मोलाचे योगदान लाभले.

नाटिकेत प्रमुख कलाकार म्हणून मावशी केळकरांच्या भूमिकेत डॉ. पद्मजा पांडे, सेविका मनीषा मूळे, सारिका देशपांडे डॉ हेडगेवारांच्या भूमिकेत समीर थोडगे, स्वातंत्रवीर सावरकरच्या भूमिकेत निखिल पाटे यांच्यासह रेवती देशपांडे ,कु. शांभवी सोनगावळकर, वरद देशपांडे, प्रेरणा सोनगावळकर, नैतिक देशपांडे, वरद देशपांडे, विवान देशपांडे, मृदुला माळी, श्रेया ढोके, रूपाली शिकनकर, शकुनताई परांजपे यांनी विविध भूमिका साकारल्या. नाटिकेचे उत्तम संचलन सोनिया तऱ्हाळकर यांनी केले.

महिलांच्या राष्ट्रकार्याची प्रेरणा देणारी ही नाटिका अकोल्यातील सांस्कृतिक जीवनात विशेष ठरली. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजकांतर्फे उपस्थित मान्यवर, कलाकार व प्रेक्षकांचे आभार मानण्यात आले.

# शिवर येथे श्री गजानन महाराजांच्या पालखीचे उत्साहात स्वागत

**अकोला:** अकोला पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या कोळंबी येथून निघालेल्या श्री गजानन महाराजांच्या पालखीचे शिवर येथील अतिशय प्राचीन व जागृत श्री हनुमान मंदिरात २० जानेवारी २०२६ रोजी मोठ्या भक्तिभावात व उत्साहात स्वागत करण्यात आले.

पालखी शिवर नगरीत दाखल होताच टाळ–मृदंगाच्या गजराने व 'जय जय गजानन महाराज' या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. यावेळी श्री गजानन महाराजांच्या मूर्तीचे विधीवत व विविध पूजन करण्यात आले. भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने दर्शनासाठी गर्दी केली होती. याप्रसंगी सामूहिक आरती संपन्न झाली. पायदळ वारीत सहभागी झालेल्या भाविकांसाठी अमीत ठाकरे व त्यांच्या परिवाराच्या वतीने अल्पोपहाराचे वितरण करण्यात आले. तसेच श्री गजानन महाराज पायदळ वारी समितीच्या वतीने ठाकरे परिवाराचा सत्कार करण्यात आला. यानंतर श्री गजानन महाराजांची पालखी पुढील प्रवासासाठी शेगावकडे रवाना झाली. या पायदळ वारीमध्ये शिवर व परिसरातील नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवून भक्तीभावाचे दर्शन घडवले.

# श्री रालतो विज्ञान महाविद्यालयात एकदिवसीय संवादात्मक कार्यशाळा संपन्न



**■ प्रतिनिधी | अकोला ■**

श्री रालतो विज्ञान महाविद्यालयातील आयक्युएसी, इनोवेशन अ‍ॅन्ड इंक्युबेशन सेल आर अ‍ॅन्ड डी प्लेसमेंट सेल, डिपार्टमेंट ऑफ मॅथेमॅटिक्स अ‍ॅड फिजिक्स आणि भाभा ऑटोमिक रिसर्च सेंटर (बार्क), मुंबई यांच्या आऊटरीच प्रोग्रॉम अंतर्गत महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन विषयक एक दिवसीय संवादात्मक कार्यशाळा यशस्वीरीत्या पार पडली. यावेळी मंचावर बार्कचे अनुभवी वैज्ञानिक अधिकारी डॉ.कल्पेश मोदी, डॉ.वंदना चतुर्वेदी मिश्रा, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.प्रदीप देवहाते, डॉ.पूनम अग्रवाल, डॉ.राजेंद्र रहाटगांवकर, डॉ.सुजाता ताडम, प्रा.प्रशांत गेडाम, डॉ.सुशिल नगराळे आदी उपस्थित होते. या कार्यशाळेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये आधुनिक विज्ञान, संशोधन व नवतंत्रज्ञानाविषयी जागरूकता निर्माण करणे हा होता.

# देशभक्त सैनिकांचे गाव.. हिवरखेड त्याचे नाव...

## एकाच वेळी तब्बल ८ जणांची भारतीय सैन्य दलात निवड



**■ प्रतिनिधी | हिवरखेड ■**

हिवरखेड हे गाव सैनिकांचे गाव म्हणून ओळखले जाते त्याला कारणही तसेच आहे. इंग्रजांच्या काळापासून स्वातंत्र्य संग्राम सैनिकांनी सुरू केलेली संघर्षाची, अन्यायाविरुद्ध लढण्याची जिद्द, व चिकाटीची, परंपरा आजच्या तरुण युवक युवतींनीही कायम ठेवली आहे. आणि एकाच वेळी तब्बल ८ जण भारतीय सैन्य दलात भरती झाले आहेत.

स्टाफ सिलेक्शन कमिशन द्वारे घेण्यात आलेल्या कॉन्स्टेबल पदाच्या भरतीमध्ये हिवरखेड शहरातील आठ विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे. यामध्ये रोहित येनकर, वैभव भालतिलक, ऋषिकेश कौसकार, अनिकेत निंबोकार, मयूर व्यवहारे, या मुलांचा तसेच चतुर्थी हागे, शिवानी वाकोडे, निकिता गावंडे या मुलींची निवड झाली. अभिमानाची गोष्ट म्हणजे चतुर्थी हागे या मुलीचे दोघेही भाऊ इंडियन आर्मी मध्ये अग्निवीर या पदावर कार्यरत आहेत . आता कुटुंबातील तिघेही भावंडे देशसेवा करणार आहेत. अतिशय प्रतिकूल परिस्थिती मध्ये संघर्ष करून या मुलांनी यश संपादन केले आहे. या मुलांच्या निवडीने सर्वत्र आनंद व्यक्त होत आहे. या मुलांच्या यशाने गावात भव्य मिरवणूक काढून गावात सर्वत्र यांचा नागरिकांनी भव्य सत्कार केला. हिवरखेड शहरातील आणि ग्रामिण भागातील मुलांना स्पर्धा परीक्षाची प्रेरणा मिळावी म्हणून मा. महेंद्र कराळे सर यांनी प्रत्येक मुलांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला आणि पुढील आयुष्यात सुद्धा मोठया पदावर कार्यरत होऊन गावाचे नाव उंच करावे असे मार्गदर्शन केले. यावेळी द टारगेट अकॅडेमी हिवरखेड चे संचालक प्रा. गौतम इंगळे सर यांनी सुद्धा मुलांच्या यशाचे कौतुक केले. आगामी पोलीस भरती मध्ये गावातील आणि आजू बाजूच्या परिसरातील मुलांनी सुद्धा जिद्दीने निश्चित ध्येय ठेवून मेहनत करावी आणि सरकारी नोकरी घेऊन आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करावे अशा मुलांना शुभेच्छा दिल्या.

आज पर्यंत हिवरखेड मधील शेकडो युवकांनी भारतीय सैन्य दलात व अर्ध सैनिक बलात भरती होऊन देशसेवेच्या व्रत घेतले आहे त्यात आठ युवक युवतींची आणखी भर पडल्यामुळे हिवरखेड वासियांची मान अभिमानाने ताठ झाली आहे.

# शुक्रवारी जिल्हा नियोजन समितीची सभा

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेत नियोजनभवनात दि. २३ जानेवारी रोजी दु. १२ वा. जिल्हा नियोजन समितीची सभा आयोजित करण्यात आली आहे.

सभेत आधीच्या बैठकीच्या इतिवृत्ताचे अनुपालन, सर्वसाधारण योजना, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना प्रारूप आराखड्यास मान्यता देणे, खर्चाचा आढावा, पुनर्विनियोजन आढावा आदी विविध विषयांवर चर्चा होणार आहे.

**प्रजासत्ताक दिनाचा मुख्य सोहळा शास्त्री क्रीडांगणावर**

भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ दि. २६ जानेवारी रोजी सकाळी ९.१५ वा. लालबहादूर शास्त्री क्रीडांगण येथे होणार आहे.राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. यावेळी ध्वजवंदन, राष्ट्रगीत, महाराष्ट्रगीत, पथकांचे अवलोकन, पथसंचलन, कवायती, चित्ररथ, सांस्कृतिक कार्यक्रम, गुणवंतांचा गौरव आदी कार्यक्रम होतील.

**जाहीर नोटीस**

**विद्यमान दिवाणी न्यायालय (क. स्तर), तेल्हारा यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २६/२०२६ — प्रोसेस नं.४९/२०२६
चौ.ता. २४/०२/२०२६ — दिनांक : २०/०१/२०२६

**अर्जदार :** १. शकुंतला उत्तम गिऱ्हे वय ५७ वर्षे, धंदा-घरकाम २. पंचफुला मधुकर राखोंडे वय ५४ वर्षे, धंदा - घरकाम ३. शशिकला अंबादास भोपळे वय ५२ वर्षे, धंदा घरकाम ४. मिना गजानन मानकर वय ५१ वर्षे, धंदा - घरकाम ५. शंकर गजानन मानकर वय ३३ वर्षे, धंदा-शेती ६. कृष्ण गजानन मानकर वय २९ वर्षे, धंदा-शिक्षण ७. छाया निलेश राहाटे वय ३१ वर्षे, धंदा घरकाम अर्जदार क. १, ४, ५, व ६ रा. सिरसोली, ता. तेल्हारा, जि. अकोला अर्जदार क. २ रा. अडगांव बु., ता. तेल्हारा, जि. अकोला अर्जदार क. ३ रा. शिवाजी नगर, अडगांव बु. ता. तेल्हारा, जि. अकोला अर्जदार क्र. ७ रा. मुंडगाव, ता. अकोट, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही.

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते ७ नुसार मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर तेल्हारा यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदार क. १ ते ३ यांचे आई वडील अर्जदार क. ४ ते ७ पती व मुल मयत नामे गणपत मारोती मानकर हे दि. २३/०९/१९८७ रोजी मयत झाले आहेत व मयत नामे यशोदाबाई गणपत मानकर हे दि. ०९/११/१९८५ रोजी दोन्ही मौजे सिरसोली, ता. तेल्हारा, जि. अकोला येथे मरण पावले त्यामुळे अर्जदार हेच कायदेशीर वारस असून इतर कोणतेही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक २४/०२/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक २०/०१/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का

आदेशानुसार
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क स्तर, तेल्हारा

**जाहीर नोटीस**

**वि. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), पातुर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ०७/२०२६ — प्रोसेस नं.४०/२०२६
चौ.ता. १७/०३/२०२६ — दिनांक : १२/०१/२०२६

**अर्जदार :** १. आशा मुकुंदराव अमरावतीकर वय ७३ वर्ष धंदा- घरकाम २. वर्षा अमित अमरावतीकर वय ४५ वर्ष धंदा-घरकाम ३. नेहा अमित अमरावतीकर वय २५ वर्ष धंदा घरकाम रा. दादुलगांव ता.जि. अकोला ४. प्रथमेश अमित अमरावतीकर वय २० वर्ष धंदा- शिक्षण क.१.२ व ४ रा. देउळगांव ता. पातुर जि.अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक
**मयताचा पत्ता :-** मयत : अमित मुकुंदराव अमरावतीकर
**पत्ता :-** रा. देउळगांव ता. पातुर जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयानी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अमित मुकुंदराव अमरावतीकर यांचा मृत्यु दि.२८/०९/२०२५ रोजी देउळगांव ता. पातुर जि. अकोला येथे झाला. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत उपरोक्त न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक:- १२/०१/२०२६
पातुर

शिक्का

आदेशानुसार
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क.स्तर), पातुर

**जाहीर नोटीस**

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६९/२०२६ — प्रोसेस नं. ८०४/२०२६
चौ.ता. ०२/०३/२०२६ — दिनांक : १७/०१/२०२६

**अर्जदार :** १. यशोदा राजू चौरसिया रा. सिद्धार्थ नगर, बोरगांव मंजू, ता. जि. अकोला. २. सुरज राजू चौरसिया रा. सिद्धार्थ नगर, बोरगांव मंजू, ता. जि. अकोला. ३. नंदीनी राजू चौरसिया रा. सिद्धार्थ नगर, बोरगांव मंजू, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : राजू रामलाल चौरसिया
**पत्ता :-** रा. सिद्धार्थ नगर, बोरगांव मंजू, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राजू रामलाल चौरसिया यांचे दि.१२/०८/२०२५ रोजी बोरगांव मंजू, ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०२/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) बार्शिटाकळी, जि. अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११/२०२६ — प्रोसेस नं.४९/२०२६
चौ.ता. २५/०२/२०२६ — दिनांक : १४/०१/२०२६

**अर्जदार :** १ उषा प्रभाकर जाधव, वय ५९ वर्ष, धंदा- शेतकरी रा. घोटा, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रभाकर शामराव जाधव,
**पत्ता :-** रा. घोटा, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रभाकर शामराव जाधव यांचे दिनांक १८/११/२०२५ रोजी घोटा, ता. बार्शिटाकळी जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २५/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क-स्तर),बार्शिटाकळी जि. अकोला

**जाहीर नोटीस**

**विदयमान दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) बाळापूर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. क्र. ३२५/२०२५ — प्रोसेस नं.३२१६/२०२५
चौ.ता. १६/०२/२०२६

**अर्जदार :** १. रश्मी गणेश आगरकर वय ४१ वर्ष, धंदा घरकाम २. हर्षल गणेश आगरकर वय २१ वर्ष, धंदा शिक्षण ३. यश गणेश आगरकर वय १७ वर्ष धंदा शिक्षण अल्पवयीन असल्यामुळे अर्जदार के १ हे पालक आहे वरील सर्व नमूद अर्जदार रा. मेहेरे, बैलजोडी जवळ, पोळा चौक, ता.जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. मयत श्री. गणेश वासुदेव आगरकर हे दिनांक ०७.०७.२०२५ रोजी रा. खंडाळा ता. बाळापूर, जि. अकोला येथे मरण पावले. वरील नमुद अर्जदार हे मयत श्री. गणेश वासुदेव आगरकर यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय व ईतर लाभाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वत: अथवा वकीलामार्फत दिनांक १६.०२.२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक २६.१२.२०२५ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का

आदेशानुसार
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय, क स्तर बाळापुर

**जाहीर नोटीस**

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५६/२०२६ — प्रोसेस नं.७९९/२०२६
चौ.ता. २३/०२/२०२६ — दिनांक : १७/०१/२०२६

**अर्जदार :** १. विश्वनाथ अच्युतराव परसोडकर रा. मयुरेश्वर अपार्टमेंट, जठारपेठ, अकोला. ता. जि. अकोला. २. संजय अच्युतराव परसोडकर रा. श्री सप्तश्रृंगी देवी मंदिर, हरिहर पेठ, वाशिम रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. ३. प्रनोती विजय मैत्रा उर्फ सौ. प्रनोती हर्षद तत्त्वादी रा. अपोलो हॉस्पिटल, सीइएसएल पोस्ट ऑफिस, राज किशोर नगर, मोपका, साउथ इस्टर्न कोअल लिमिटेड बिलासपूर, छत्तीसगढ. ४. योगेश विजय मैत्रा रा. सिपत रोड, राजीव विहार, लिंगीयादिह, बिलासपूर, छत्तीसगढ.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. अच्युतराव व्यंकटेश परसोडकर २. श्रीमती कमल अच्युतकर परसोडकर
**पत्ता :-** रा. मयुरेश्वर अपार्टमेंट, जठारपेठ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अच्युतराव व्यंकटेश परसोडकर यांचे दि. १९/०२/२००० रोजी व तसेच मयत श्रीमती कमल अच्युतकर परसोडकर यांचे दि. २५/०५/२०१९ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अ‍ॅंड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ५६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# घुईखेड ही आळंदीइतकीच पुण्यभूमी
## -हभप वैभवश्रीजी पांडे यांचे प्रतिपादन

### घुईखेड येथील श्री संत बेंडोजी महाराजांच्या संजीवन समाधी सोहळा

**चांदूर रेल्वे /प्रतिनिधीः-** विदर्भातील एकमेव संजीवन समाधी असलेल्या चांदूर रेल्वे तालुक्यातील घुईखेड येथील श्री संत बेंडोजी महाराजांच्या संजीवन समाधी सोहळ्यात बुधवारी तिसऱ्या दिवशी संगीतमय शिवमहापुराण कथेच्या प्रवचनात विदर्भ कन्या ह.भ.प. वैभवश्रीजी पांडे (वृंदावन) यांनी भाविकांना अध्यात्मिक साधनेचा मूलमंत्र दिला.

पहिल्या सत्रात प्रवचन करतांना वैभवश्रीजी म्हणाल्या की, 'ही श्री संत बेंडोजी महाराजांची संजीवन समाधी असून, घुईखेडचे महात्म्य आळंदीइतकेच मोठे आहे. या पुण्यभूमीहून प्रत्येकाने शक्ती, भक्ती आणि सकारात्मक ऊर्जा घेऊन जावी, तर जीवनातील कार्य सिद्धीस जाते.'



श्री संत बेंडोजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या घुईखेड नगरीत दररोज दोन सत्रांत शिवमहापुराण कथा सुरू असून, या कथेमध्ये अध्यात्मिक उन्नतीसह जीवनातील यशाचा मार्गही उलगडून सांगण्यात येत आहे. शिवपुराण हे केवळ कथा नसून ते साधना पर्व असल्याचे सांगत वैभवश्रीजी पांडे म्हणाल्या, 'जसे डॉक्टर व्हायचे असेल तर कठोर परिश्रम करावे लागतात, तसेच जीवनात यश, मनःशांती आणि समाधान मिळवण्यासाठी साधना, सेवा व सत्संग आवश्यक आहे.' या प्रवचनामुळे भाविकांमध्ये भक्तिभावाबरोबरच आत्मचिंतनाची भावना निर्माण झाली असून, घुईखेड येथील संजीवन समाधी सोहळा हा केवळ धार्मिक नव्हे तर जीवनाला दिशा देणारा अध्यात्मिक महाउत्सव ठरत आहे. सप्ताहाच्या मागील ३ दिवसांत भाऊसाहेब घुईखेडकर, वसंतराव घुईखेडकर, हिम्मतराव नाचणे, निकेश येवले, नितेश पवार, संतोष बनकर, किशोर पवार, गिरीष भारसाकडे, डॉ. राजेंद्र ठाकुर, भिमराव वानखडे, विजय देशमुख यांच्यावतीने अन्नदान करण्यात आले.

# माऊली ढाब्यावर कर्मचाऱ्याची आत्महत्या
## जुना बायपास मार्गावरील घटना

**अमरावती/ प्रतिनिधीः-** बडनेरा पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या जुन्या बायपास मार्गावरील माऊली ढाब्यामध्ये कार्यरत कर्मचाऱ्याने हॉटेलमध्ये गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना मंगळवारी समोर आली आहे. यामुळे परिसरात खळबळ उडाली. राजेश गोपाळराव गुडधे (वय ४८, देवरा, चांदुर बाजार ) असे आत्महत्या करणाऱ्या कर्मचा-याचे नाव आहे. माहितीनुसार राजेश गुडधे आणि जयंत शंकरराव पर्वतकर (म्हसला) हे गेल्या तीन वर्षापासून माऊली ढाब्यावर काम करत होते. हॉटेल संचालक यांच्या वडिलांचे निधन झाल्यामुळे त्यांच्या घरी काम करण्यासाठी त्यांनी राजेश गुडधेला बोलविले होते. यासाठी त्यांनी मंगळवारी जयंत पर्वतकर याला फोन केला आणि राजेशला पाठवण्यासाठी म्हटले. राजेश गुडधेला हे सांगण्यासाठी जयंत पर्वतकर माऊली हॉटेलवर गेला. त्याने राजेशला आवाज दिला पण त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. यामुळे जयंतने दारामधील फटीतून आत पाहिले तर त्यांना राजेश गुडधे फासावर लटकताना दिसला. यामुळे ते घाबरले. त्यांनी याची माहिती मालकाला दिली. त्यांनी पोलिसांना सुचित केले. पोलिसांनी घटनास्थळावर जाऊन पंचनामा केला आणि मृतदेह पोस्टमार्टम साठी पाठविला. राजेशला दारूचे व्यसन होते. त्याने आत्महत्या का केली हे अजून पर्यंत स्पष्ट झालेले नाही. पुढील तपास पोलीस करत आहे.

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.२१/२०२६ ने.ता.२१.०२.२०२६

अर्जदार ः
१. **योगेश गंगाधर हुशंगाबादकर,** वय ४० धंदा - नोकरी रा.साईनगर, अमरावती, ता.जि.अमरावती
२. **कांताबाई रामभाऊ दीवे,** वय ६५ वर्षे, धंदा - घरकाम रा.येवती, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. **संजय प्रभाकर हुशंगाबादकर,** वय ४५, धंदा - मजूरी
४. **ललिता प्रमोदराव पुरुषे,** वय ५५, धंदा - घरकाम रा.मोझरी, ता.तिवसा, जि.अमरावती
५. **राजेंद्र प्रभाकर हुशंगाबादकर,** वय ५३, धंदा - मजूरी अर्जदार क्र.३ व ५ रा.चांदूर बाजार,ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
६. **बेबी वसंतराव हुशंगाबादकर,** वय ६० वर्षे, धंदा - घरकाम
७. **रविंद्र वसंतराव हुशंगाबादकर,** वय ४५ वर्षे, धंदा - मजुरी
८. **हरिश वसंतराव हुशंगाबादकर,** वय ४२ वर्षे, धंदा - मजुरी अर्जदार क्र.६ ते ८ रा.राष्ट्रसंत चौक, मारवाडी पुरा, चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक नारायण भगवंतराव हुशंगाबादकर** यांचा **मृत्यू दिनांक १९.०५.२०२२** रोजी व **मृतक प्रभाकर नारायण हुशंगाबादकर** यांचा **मृत्यू दिनांक २०.११.२०१५ रोजी** तसेच **मृतक वच्छलाबाई नारायण हुशंगाबादकर** हिचा **मृत्यू दिनांक ०१.०३.१९५८** रोजी तसेच **मृतक शोभा प्रभाकर हुशंगाबादकर** हिचा **मृत्यू दि.०४.१०.२०१९ रोजी रा.चांदूर बाजार,ता.चांदूर बाजार,जि.अमरावती येथे** झाला. त्याचबरोबर **मृतक गंगाधर नारायण हुशंगाबादकर यांचा मृत्यू दि.११.०८.२०२० रोजी कांतानगर, अमरावती, ता.जि.अमरावती आणि मृतक वसंतराव नारायण हुशंगाबादकर यांचा मृत्यू दि.१७.०६.२००९** रोजी चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.अर्जदारांना मय्यतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.२१/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.२०.०१.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

## जाहीर सुचना

माझे पक्षकार **१) सतिश राजेन्द्र वस्ताणी,२) भावना राजेंन्द्र वस्ताणी दोघेही रा. ५०२, गुलमोहर बिल्डींग, रिंग रोड, नवसारी, अमरावती** यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन सर्वाना या जाहीर नोटीसव्दारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी मनपा अमरावतीचे हददीतील मौजे-तारखेडा, प्रगणे-बडनेरा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्वे नं.३२, मधील जमिनीतील ज्याचा रा.मा.क्र.एन.ए.ए.४८/तारखेडा-५५२/१९८१-८२ अन्वये लेआउट कन्व्हर्शन मंजुर झालेल्या जागेतील प्लॉट नं.२१५ याची साईज पु.प.रुंदी व लांबी ३० फुट, पु.बाजू ४० व प.बाजू ४२ फुट असून याचे एकुण क्षेत्रफळ १२३० चौ.फुट (११४.३१ चौ.मी.) आहे. याची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्वेस ः- प्लॉट नं. २१४
पश्चिमेस ः- प्लॉट नं. २१६
उत्तरेस ः- २० फुट रुंदीचा रस्ता
दक्षिणेस ः- नाली

येणेप्रमाणे वरील वर्णन केलेल्या चतुःसिमेच्या आतील बांधलेला २०० चौ.फुटचा लोखंडी टिनाचा शेड व उरलेला १०३० चौ.फुटचा खुला प्लॉट आहेत. वरील नमुद दुकान मालमत्तेचा खरेदीचा सौदा माझे पक्षकार यांनी गणेश नारायणराव मेशकर, रा.संत गुलाब बाबानगर, न्यु कॉटन मार्केट जवळ, अमरावती, ता.जि.अमरावती यांचे सोबत केला आहे.

तरी या जाहीर नोटिसव्दारे सर्वाना सुचित करण्यात येते की, वरील दुकान मालमत्तेवरील कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, वारसाहक्क, गहाण, बोजा, सरकारी व निमसरकारी संस्थेचे कर्ज, कुठल्याही प्रकारचे हितसंबंध असल्यास सदरची जाहीर नोटिस प्रसिध्द झाल्या पासून ७ दिवसाचे आत माझे पक्षकारासोबत सर्व दस्तऐवजासह संपर्क करावा. अन्यथा माझे पक्षकार कराराप्रमाणे सदर मालमत्तेची खरेदी करुन घेईल व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**अमरावती**
**दि. २१/०१/२०२६**

**१) सतिश राजेन्द्र वस्ताणी**
**२) भावना राजेंन्द्र वस्ताणी**
**यांचे तर्फे अधिवक्ता (एच.एम.पटेल) अमरावती**
**मो.- ७३०४५५७५३७**
**पक्षकार मो.- ७०२००१९८७७**

## DR. RAJENDRA GODE INSTITUTE OF NURSING, AMRAVATI

Dr. Rajendra Gode Education Campus, Ghatkheda, Mardi Road, Amravati.
Email:- drrgionamravati@gmail.com, Website: drgion.ac.in
Mob. No.: 9511733784, 9209537529

### WALK IN INTERVIEW

Applications are invited in the prescribed format, from eligible candidate for the following posts.

| Sr.No. | Designation | Subject | Total Posts | Reservation |
|---|---|---|---|---|
| 01 | Professor Cum Vice Principal | Any Specialty | 1 | Open |
| 02 | Professor | Medical Surgical Nursing | 1 | Open |
| | | Pediatric Nursing | 1 | Open |
| | | Obsteric Nursing | 1 | Open |
| 03 | Associate Professor | Pediatric Nursing | 1 | Open |
| | | Medical Surgical Nursing | 1 | Open |
| | | Psychiatric Nursing | 1 | Open |
| 04 | Assistant Professor / Lecturer | Medical Surgical Nursing | 3 | Sc-1, OBC-1, Open-1 |
| | | Community Health Nursing | 3 | Sc-1, OBC-1, Open-1 |
| | | Pediatric Nursing | 2 | Sc-1, Open-1 |
| | | Obstetric Nursing | 3 | Sc-1, OBC-1, Open-1 |
| | | Psychiatric Nursing | 1 | Sc-1 |
| 05 | Tutor/Clinical Instructor | Nursing | 21 | SC-4, ST-2, VJNT-3, OBC-3, SEBC-3 EWS-2, OPEN-4 |

Requisite qualification, Experience, other details and prescribed applicable format are available on university website www.muhs.ac.in
**Last date of application is : 29/01/2026**

Principal
DRGION, Amravati

Mr. Yogendra R. Gode
Chairman, IBSS

# प्रजासत्ताकदिनी देशभक्तीपर गीतांवर आधारित सामुहिक कवायत

**अमरावती :** प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी २०२६ रोजी देशभक्तीपर गीतांवर विद्यार्थ्यांचे सामुहिक कवायत संचलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हास्तरावर एकुण चार शाळा एकत्रित कवायत परेड मैदान, अमरावती येथे होणार असून या कवायतीसाठी १ हजार ५०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत. जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये प्रत्येक शाळेमधून व सामुहिकरित्या प्रत्येक तालुक्यातील तीन शाळा एकत्र येवून शाळेच्या मैदानावर देशभक्तीपर गीतांवर आधारित सामुहिक कवायत संचलन कार्यक्रम घेण्यात येणार आहे. त्यासाठी दीड महिन्यांपासून शाळास्तरावर कवायत सराव सुरु आहे. या दिवशी विद्यार्थ्यांना शाळेकडून बिस्कीट, केळी आणि पाणी वाटप होणार आहे. याबाबत गट शिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक यांना सुचित करण्यात आले असल्याचे माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी कळविले आहे.

## जाहीर सुचना

याव्दारे सर्वत्र जनतेला जाहीर सुचना/आवाहन करण्यात येते की, **श्री सै.ईस्माईल सै.बाबा रा.पॅराडाईज कॉलनी, वलगांव रोड, अमरावती जि.अमरावती** यांच्या मालकीची सॉ मिल नामे **नेहा वुड इंडस्ट्रीज** स.नं.१३, गट नं.७२९ वलगांव, ता.जि.अमरावती या ठिकाणी स्थापित असलेली तिचा परवाना क्र. जुना W-88 नविन A-98 आय.डी. क्रमांक MH0951AMAM बेड सॉ.उभा ३९ इंची,नग-०१, बेड सा.नं.MH0951/V/39/1047 अशा वर्णनाची सॉ मिल परवान्यासह श्री अब्दुल रशिद अब्दुल मजिद रा.मरकज मजिद रोड, नबाबपुरा, वार्ड नं.०४ नांदूरा ता.नांदूरा, जि.बुलढाणा पिन कोड-४४३४०४, भ्र. क्र.- ९८२२६३०४८६ यांनी विकत घेण्याचा पक्का सौदा केला असून त्यांनी त्यांची पक्की इसार पावती दोन साक्षीदारांसमक्ष करुन घेतली आहे व ते लवकरच रजिष्टर खरेदीखत नोंदवून घेणार आहेत.

करिता याबाबत वरील सॉ मिलवर व परवान्यावर या मालमत्तेवर वारसा,गहाणखत, विक्री, लिज, कायदेशिर हक्क, भेट, बक्षिसपत्र, किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हितसंबंध किंवा या खरेदी व्यवहारा संबंधात कोणताही आक्षेप असणा-या व्यक्तीचे वा दावा करण्याच्या व्यक्तीने किंवा कोणत्याही वारसदार व्यक्तीने ही सुचना प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाचे आंत तत्संबंधीची माहिती खालील पत्यावर लेखा स्वरुपात कळवावी. सदर मुदतीत कुठलाही दावा/आदेश प्राप्त न झाल्यास या संबंधात मी वरील सॉ मिल खरेदीदार, रजिष्टर नोंदणी खरेदी खत करुन घेऊन सॉ मिल स्थानांतरण व परवाना हस्तांतरणाबाबत प्रस्ताव वनविभागास सादर करण्यात येईल व तद्नंतर कुठलाही दावा/आक्षेप स्विकारहार्य राहणार नाही यांची नोंद घ्यावी.

दि.
ठिकाण ः

**सही/-**
**(अब्दुल रशीद अब्दुल मजिद)**
**रा.पो.ता.नांदुरा,जि.बुलढाणा**
**मो.- ९८२२६३०४८६**

## जाहिरनामा / सायटेशन
### दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
### वि. श्री. एस.एस. भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्रमांक ३०६८/२०२५ पुढील तारीख २३.०२.२०२६

**श्री प्रकाश अधिक तीन विरुध्द निरंक**

अर्जदार- **1. Prakash Bhaurao Vyavahare** Age 65 yrs, Occu. Retired, R/o. Wadali Tq. Dist. Amravati.
**2. Alaka Prakash Khodake** Age 52 yrs, Occu. Household, R/o. Indrashesh Baba Mandir, Wadali Tq. Dist. Amravati.
**3. Malti Subhash Babhulkar** Age-61 yrs, Occu. Household, R/o Near Hanuman Mandir, Vallabh Nagar, Amravati Tq. Dis. Amravati.-444605
**4. Meena Dattatray Agashe** Age 53 yrs, Occu. Household R/o. Wadaali Camp Teli Pura Amravati. Tq. Dist. Amravati.

**विरुध्द**
**गैरअर्जदार**
**निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत हरबा गंगाराम व्यवहारे** हे दि. **९.४.१९८१** रोजी रोजी अमरावती ता.जि. अमरावती येथे मयत झाले. अर्जदार प्रकाश अधिक तीन विरुध्द निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयतत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्री प्रकाश अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सबहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सबहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्दू ममत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

शिक्का

**आदेशानुसार**
**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर ,अमरावती**

## जाहीर नोटीस
### कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार अमरावती, यांचे न्यायालय

रा.मा.क्र./एम.आर.सी.-८१/वलगांव/६७/२०२५-२०२६

**अर्जदार :-** श्री. नाहीद अंजुम जमील खा
रा. वलगांव ता. जि. अमरावती

**-विरुध्द-**

**गैरअर्जदार :-** निबंधक जन्म/मृत्यु ग्रामपंचायत वलगांव ता. जि. अमरावती

सदर नोटीस द्वारे आपणास सुचित करण्यात येतेकी, **अर्जदार श्री. नाहीद अंजुम जमील खा रा. वलगांव ता.जि. अमरावती** आपला विलंबित जन्माची नोंद घेण्याबाबतचा प्रस्ताव निबंधक जन्म मृत्यू ग्रामपंचायत वलगांव जि. अमरावती यांच्या मार्फत **दिनांक १८/११/२०२५** रोजी या कार्यालयात प्राप्त झाला आहे करीता सदर प्रकरणात आपले म्हणने माडंण्याकरीता व प्रस्तावासोबत सादर केलेल्या दस्त्याच्या पडताळणी करीता दस्त्याच्या मुळ प्रतीसह तहसिल कार्यालय, अमरावती शासकीय आय टी आय कॉलेज जवळ, सांस्कृतीक भवनच्या समोर, मोर्शी रोड अमरावती येथे दिनांक २१/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता न चुकता हजर राहावे.आपण हजर न झाल्यास सदर प्रकरणात आपणास स्वारस्य नसल्याचे समजुन प्रकरणात नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

शिक्का

**तहसिलदार तथा, करीता**
**तालुका दंडाधिकारी अमरावती**

## जाहीर नोटीस
### कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार अमरावती, यांचे न्यायालय

रा.मा.क्र./एम.आर.सी-८१/वलगांव/६६/२०२५-२०२६

**अर्जदार :-** श्री.जमील खा इमाम खा
रा. वलगांव ता. जि. अमरावती

**-विरुध्द-**

**गैरअर्जदार :-** निबंधक जन्म/मृत्यु ग्रामपंचायत वलगांव ता. जि. अमरावती

सदर नोटीस द्वारे आपणास सुचित करण्यात येतेकी, **अर्जदार श्री.जमील खा इमाम** खा **रा. वलगांव ता.जि. अमरावती** आपला विलंबित जन्माची नोंद घेण्याबाबतचा प्रस्ताव निबंधक जन्म मृत्यू ग्रामपंचायत वलगांव जि. अमरावती यांच्या मार्फत **दिनांक १८/११/२०२५** रोजी या कार्यालयात प्राप्त झाला आहे करीता सदर प्रकरणात आपले म्हणने माडंण्याकरीता व प्रस्तावासोबत सादर केलेल्या दस्त्याच्या पडताळणी करीता दस्त्याच्या मुळ प्रतीसह तहसिल कार्यालय, अमरावती शासकीय आय टी आय कॉलेज जवळ, सांस्कृतीक भवनच्या समोर, मोर्शी रोड अमरावती येथे दिनांक २१/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता न चुकता हजर राहावे.आपण हजर न झाल्यास सदर प्रकरणात आपणास स्वारस्य नसल्याचे समजुन प्रकरणात नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

शिक्का

**तहसिलदार तथा, करीता**
**तालुका दंडाधिकारी अमरावती**

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,अमरावती
### वि.श्रीमती एन.सी.सोरटे ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३०४२/२०२५
**श्री.विलास अधिक तीन विरुध्द निरंक**
पुढील ता.१०.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः
1. **Vilas Vitthrao Sahare,** Age 56 Yrs. Occu.: Labour, R/o. Behind AMC School No.14, Wadali, Amravati Tq. & Dist. Amravati- 444602
2. **Kailas Vitthrao Sahare,** Age 52 Yrs. Occu.: Labour, R/o. Galli No. 2, Cotton Market, Near Vasanta Auto Center Gujarwadi, Post-Mahatma Fule Bazar, Nagpur Tq. & Dist. Nagpur- 440018.
3. **Umesh Vitthrao Sahare,** Age 49 Yrs. Occu.: Labour, R/o. Pariwarpura, Wadali, Amravati Tq. & Dist. Amravati-444602
4. **Sau.Chanda Vijay Darwal,** Age 47 Yrs. Occu.: Household, R/o. Ward No.14, Post-Nachangaon, Tq. Deoli, Dist. Wardha- 442306

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **चित्रा विठठल सहारे** हया दिनांक **०३.०२.२०२४** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **विलास अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्री. विलास अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०९.०१.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि.१५.०१.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, **ग्रामपंचायत घाटलाडकी**, यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. **जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त** अर्ज नांव **पंकज सुधाकरराव खाडे** अर्जात नमूद जन्म/मृत्यू दिनांक **०१.०९.१९८२** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **नोंदणीबाबत माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).
४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहिती वरुन व स्थानिक चौकशी करुन देत आहे.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ऊ.मदने | सही /- |
| २) अब्दुल हफीज शेख रसुल | सही /- |
| ३) गजानन देशमुख | सही /- |
| ४) सागर रविंद्र देशमुख | सही /- |
| ५) सौ.अनुश्री रोशन जयसिंगपुरे | सही /- |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

## जाहिरनामा / सायटेशन
### दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
### वि. श्री.एन.सी.सोरटे ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्रमांक ३०४६/२०२५ पुढील तारीख १०.०२.२०२६

**श्रीमती. उषा अधिक तीन विरूदध निरंक**

अर्जदार **1. Usha Sureshrao Brahmankar** Age-50 yrs, Occu. Household,
**2. Dhiraj Sureshrao Brahmankar** Age-28 yrs, Occu. Pvt Job,
**3. Shailesh Sureshrao Brahmankar** Age-26 yrs, Occu. Pvt Job,
**4. Leela Ramdas Bhrahmankar** Age-70 yrs, Occu. Household All R/o Jewad Nagar, Rukhmini Nagar, Amravati Tq .and Dist. Amravati.

**विरुध्द**
**गैरअर्जदार**
**निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत सुरेश रामदास ब्राम्हणकर हे ३१.०८.२०१७ रोजी अमरावती ता. जि अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार उषा अधिक तीन विरूध्दध निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सवहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा श्रीमती उषा अधिक तीन विरूध्द निरंक वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल

आज दि. १४.०१.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर ,अमरावती**

## सायटेशन / जाहिरनामा
### विद्यमान व्यवहार न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत

आर.एम.जे.सी.क. ७७/२०२६ ने.ता. ५/०२/२०२६

**अर्जदार. श्री. दिनेश केशवराव भुताड,** वय-६१ वर्ष,व्यवसाय - शेती
रा. नेरपिंगळाई, ता. मोर्शी, जि. अमरावती.

**//विरूध्द//**
**कोणीही नाही**

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल** केलेले आहे. अर्जदारांप्रमाणे अर्जदारांचे अर्जदारांचे वडील **नामे केशवराव हरिभाऊ भुताड हे दिनांक १२/०४/१९९९ रोजी Nerpinglai, Tq.Morshi, Dist-Amravati** येथे मय्यत झालेले आहे. **तसेच अर्जदाराची आई नामे अरूणाबाई केशवराव भुताड ही दिनांक ११/०४/२०१४ रोजी Nerpinglai, Tq.Morshi, Dist-Amravati** येथे मयत झाले आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे. तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

शिक्का

**आदेशान्वये**
**सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय, मोर्शी**

## सायटेशन/ जाहिरनामा
### विद्यमान व्यवहार न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.३१/२०२६ ने..ता.२४/२/२०२६

**अर्जदार - १) श्रीमती विमल रामचंद्र चिखले,** वय-७९ वर्ष, व्यवसाय-घरकाम
**२) श्री. ओमप्रकाश रामचंद्र चिखले,** वय-४९ वर्ष, व्यवसाय- शेती
**३) लता रामचंद्र चिखले,** वय-५७ वर्ष, व्यवसाय-घरकाम सर्व रा. खानापूर, ता. मोर्शी, जि. अमरावती.
**४) ज्योती गोवर्धन चोंधे,** वय-५८ वर्ष, व्यवसाय-घरकाम रा. फलॅट नं.२०४, ओजस अपार्टमेंट ए-७ बेसा पिंपला रोड अष्टविनायक इम्पायर बेसा नागपूर, ता. जि. नागपूर.
**५) ललीता अनिल कुकडे,** वय-५५ वर्ष, व्यवसाय-घरकाम रा. डोंगरयावली, ता. मोर्शी, जि. अमरावती. **६) श्यामली विरेंद्र जुमडे,** वय-५३ वर्ष, व्यवसाय-घरकाम रा. फलॅट नं.७०१, टावर सी गोदरेज आनंदम सिटी, उमरेड रोड, मॉडेल मिल, महात्मा फुले बाजार नागपूर, ता.जि. नागपूर.
**७) वंदना सुदेश कोंडे,** वय-५२ वर्ष, व्यवसाय-घरकाम रा. ललीतनगर कांडली, अमरावती, ता.जि. अमरावती

विरूध्द -कोणीही नाही

वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान व्यवहार न्यायाधिश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत, सेक्शन २ बॉम्बे रेगुलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केले आहे. अर्जदाराचे म्हणणे प्रमाणे प्रकरण दाखल केले आहे. अर्जदाराचे म्हणणेप्रमाणे- अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं२ ते ७ चे वडील नामे **रामचंद्र गुलाबराव चिखले हे दिनांक ०८/०१/२०२३**रोजी Khanapur, Tq. Morshi, Dist-Amravati येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे मृत्यूपत्र प्रकरणात जोडले आहे. त्यांचे मृत्यूनंतर वारस हे केवळ वरीलप्रमाणे नमुद अर्जदार त्याचे वारस आहेत. मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाही. तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याच्या आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही, असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक २०/१/२०२६

शिक्का

आदेशान्वये
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय, मोर्शी**

## जाहीर नोटीस
### मा. दिवाणी न्यायाधीश क.स्तर नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

किरकोळ अर्ज क्र. ३४६/ २०२५ ने. ता. :-दि. ०७-०२-२०२६

**अर्जदार-१. प्रविण श्रीधरराव भाकरे** रा. जळु ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती
**२. शालिनी पुंडलिक लाहे** रा. अंतरखेड ता. कारंजा लाड जि. वाशिम
**३. हर्षलता सदानंद डांगे** रा. कुमरे लेआऊट, सिंदी मेघे. ता. जि. वर्धा

//वि//
निरंक

ज्याअर्थी, **मयत श्रीधर गंगाराम भाकरे** यांचा **मृत्यु दि. २१.१२.२०११** रोजी **अमरावती, ता. जि. अमरावती** येथे झाला. आणि **मयत रत्नाबाई उर्फ रत्नप्रभा श्रीधर भाकरे** यांचा मृत्यु दि. १२.०३.१९९६ रोजी **जळु, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती** येथे झाला. मयताचे **अर्जदार क्र. १ हा मुलगा आहे. अर्जदार क्र. २ व ३ ह्या मुली** आहेत. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल. आज दिनांक : ०६ जानेवारी २०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर**

## जाहीर नोटीस
### वि.२ रे सह दिवाणी न्यायालय (क.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.अर्ज क. ३०/२०२६ ने.ता. २१/०२/२०२६

**अर्जदारः- १) उस्मानाबाद चॉन्दखान,** वय -६० वर्ष, व्यवसाय-शेती,रा. बुटी चौक दर्यापूर ता. दर्यापूर जि. अमरावती

**विरूद्ध**
**गैरअर्जदार**
**निरंक**

या जाहीर नोटीसव्दारे सर्वांना कळविण्यात येते की, **चॉन्दखान रहेमानखान** हे **दिनांक २.१२.१९८७** रोजी मरण पावले आहे.अर्जदार यांनी मृतकांचे वारस असल्याबाबत **कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत** न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्य झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन :** **चॉन्दखान रहेमानखान** नावे मौजा दर्यापूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती येथील नगर भूमापन क्र. २४१०, शिट नं. १२, प्लॉट नं. २४१०, ४७.९० चौ.मि. व नगर भूमापन क्र. २४११, शिट नं. १२, प्लॉट नं. २४११, ३४.३० चौ.मि. येणे प्रमाणे मिळकत आहे. सदर मिळकतींची बाजारभाव किंमत २०,००० रु. आहे. आज दि. २१/०१/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहा, अधिक्षक (प्रशासन) दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापूर**

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १३७**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025


**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त

### पांढऱ्या सोन्याच्या दरात चढउतार

**वर्धा** - शेतकऱ्यांच्या पांढऱ्या सोन्याला बाजारात मिळणारा दर उत्पादन खर्चापेक्षा कमी असल्याची ओरड सुरू झाल्यानंतर सीसीआय अंतर्गत कापूस खरेदी सुरू करण्यात आली होती. मोठ्या प्रमाणात सीसीआयने कापसाची खरेदी केली असताना खूखुल्या बाजारात कापसाचा दर आठ हजार रुपये प्रतिक्विंटलवर पोहोचला. त्यात रोज शंभर रुपयाची चढउतार होत असल्याने कापूस उत्पादक शेतकरी सावध भूमिका घेत आहेत. बाजारपेठेत शेतमालाची आवक वाढती असताना दरातही चढउतार होत आहे. १६ जानेवारी रोजी कापूस ७७०० ते ८३०० रुपये प्रति क्विंटलने खरेदी झाला होता. १७ जानेवारी रोजी ७७०० ते ८३५५ रुपयांचा दर हिंगणघाट बाजार समितीत मिळाला. कापसाच्या दरात वाढ होत असल्याचे पाहून ज्यांच्याकडे कापूस आहे, त्यांनी सावध भूमिका घेतली. सोमवार, १९ जानेवारीला कापसाची खरेदी सुरू झाल्यानंतर दुपारी ७७०० ते ८२९५ या दरातच कापसाची खरेदी झाल्याचे बाजार समितीकडून सांगण्यात आले. यावर्षी कपाशीचे उत्पन्न अपेक्षित नाही. कोरडवाहू शेतातील कपाशीची झाडे वाळलेली आहे. मजूर मिळत नसल्याने वाळलेल्या झाडांवर कापूस आजही कायम आहे. ज्यांनी कपाशीच्या झाडांना पाणी सोडले, त्यांच्या शेतातील झाडांवर पुन्हा बोंडे आली. त्या बोंडामध्ये मोठ्या प्रमाणात अळी दिसत असल्याने त्यावर परिश्रम घेणे निरर्थक असल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.

### 'चोरीचा' आरोपी न्यायालयीन कोठडीत




**हिंगणघाट** - येथील दोन चोरीच्या प्रकरणात पोलिसांनी पकडलेल्या आरोपींची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.हिंगणघाट येथील मारोती वॉर्ड भागात राहणारे डॉ. संदीप मुढे व प्रज्ञानगरमधील प्रचलित मून यांच्या घरी चोरीप्रकरणी शेख तन्वीर शेख अल्लाउद्दीन याला अटक करण्यात आली होती. पोलीस कोठडी संपल्याने त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. इतर आरोपींचा शोध सुरू आहे.

### 'शनिदेव मूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापनदिन सोहळा

**आर्वी** - स्थानिक पद्मावती चौक येथील श्री शनिदेव मंदिराच्या जिर्णोद्धारच्या पाचव्या वर्धापन 'श्री शनिदेव दिनानिमित्त वार्षिक उत्सव' २३ जानेवारी रोजी आयोजित आहे. सकाळी ९ वाजता सोहळ्याला प्रारंभहोईल. उत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे भाविकांना शनिदेवाच्या दर्शनासोबतच तेला अभिषेकाचा लाभ घेता येणार आहे. त्यानंतर सायंकाळी ६:३० वाजता अत्यंत भव्य दिव्य स्वरूपात 'श्री शनिदेव श्रृंगार महाआरती' संपन्न होईल. मनमोहक फुलांच्या सजावटीने आणि मंत्रोच्चाराने मंदिराचा परिसर भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघणार आहे. रात्री ७:३० वाजता 'छप्पन भोग' अर्पण करण्यात येणार असून, त्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. थाट-वाट से आवो शनिदेव को छप्पन भोग लगाओ या संकल्पनेतून आयोजित या कार्यक्रमात सहभागी होऊन सहपरिवार प्रसादाचा लाभ घ्यावा, असे पंडित मुन्नालाल महाराज यांनी कळवले आहे.

### श्री लक्ष्मीनारायण मंदिरात बसंत पंचमी महोत्सव

**वर्धा** - येथील प्राचीन व श्रद्धास्थान असलेल्या श्री लक्ष्मीनारायण मंदिरात ११८ व्या प्राणप्रतिष्ठा महोत्सवाचे औचित्य साधून तसेच बसंत पंचमीच्या पावन पर्वानिमित्त शुक्रवार, २३ जानेवारी रोजी भव्य बसंत पंचमी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या निमित्ताने शोभायात्रा व दहीहांडी (गोपाल कला) चे आयोजन करण्यात आले आहे.सकाळी ९.३० वाजता मंदिर परिसरातून भव्य शोभायात्रेस प्रारंभ होणार असून पारंपरिक वेशभूषा, टाळ-मृदंगांचा गजर आणि भक्तिरसात न्हालेल्या वातावरणात ही यात्रा शहरातून मार्गस्थ होणार आहे. त्यानंतर श्रीकृष्णाच्या बाललीलांचे प्रतीक असलेली दहीहांडी (गोपाल कला) मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.११८ वर्षांची उज्ज्वल परंपरा लाभलेल्या या प्राणप्रतिष्ठा महोत्सवामुळे मंदिर परिसर भक्ती, श्रद्धा व उत्सवमय वातावरणाने भारावून जाणार आहे. या पवित्र व मंगलोत्सवात शहरासह परिसरातील भाविकांनी कुटुंबासह उपस्थित राहून सहभाग नोंदवावा, असे आवाहन श्री लक्ष्मीनारायण मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### निराधार योजनेचे अनुदान रखडले; लाभार्थ्यांची आर्थिक कोंडी

**वर्धा :** शासनाच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व निराधार योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना दरमहा १,५०० रुपये अनुदान दिले जाते. मात्र, मागील दोन महिन्यांपासून हे अनुदान जमा न झाल्याने निराधार नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. औषधोपचार, किराणा तसेच दैनंदिन गरजा भागविताना आर्थिक कोंडी निर्माण झाली आहे. अनुदानावरच उदरनिर्वाह अवलंबून असलेल्या ज्येष्ठ नागरिक, विधवा व अपंग लाभार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असून, प्रलंबित अनुदान तातडीने जमा करण्याची मागणी होत आहे.

# आजनादेवी वन तलावातून पाणीचोरी

## वन्य प्राणी व शेतकरी संकटात, कंत्राटदाराचे गैरवर्तन उघड

**आष्टी/जनमाध्यम**

आष्टी ते कारंजा तालुका जोडणाऱ्या सिमेंट रस्त्याच्या बांधकामासाठी मध्यरात्री कंत्राटदारांनी आजनादेवी वन तलावातून डिझेल इंजिन लावून पाणी उपसा सुरु केले, अशी गंभीर घटना उघड झाली आहे. या तलावातील पाणी शेतीसाठी महत्त्वाचे असून, वन्य प्राणी पिण्यासाठी येतात, तरीही कंत्राटदाराने कोणतीही परवानगी न घेता चोरी केली, अशी तक्रार गावकऱ्यांनी केली आहे.

सविस्तर वृत्त असे की, यापूर्वी हा कंत्राटदार आष्टी तालुक्यातील बोरखेडी वन तलावातून कोट्याधीश रुपयांचा मुरूम आणि जांब नदीचे पाणी चोरी करून नेल्याचे आरोप आहेत. गावकऱ्यांनी तक्रार केली होती, तरीही कोणतीही कारवाई झाली नाही. जानेवारी महिन्यात पार्डी पासून कारंजा पर्यंत सिमेंट रस्त्याचे काम मध्यरात्री सुरु असून, वन तलावातील पाणी टँकरने उपसा केला जात आहे.गावकांचा आरोप आहे की, वनविभागाचा बिटगार्ड दिसत नाही, त्यामुळे तलावातील पाणी चोरी होत आहे. पाणी शेतीसाठी अत्यंत महत्त्वाचे असून, या प्रकारामुळे शेतकरी व वन्य प्राणी दोघेही संकटात आले आहेत. सामाजिक कार्यकर्ते सुचिता धंडाळे यांनी स्पष्ट केले, आजनादेवी तलावातून शेतीसाठी पाणी दिले जाते. वन्य प्राणी देखील पिण्यासाठी याच तलावावर येतात. परवानगी न घेता पाणी उपसा करणे कायद्याने



गुन्हा आहे. वनविभागाने यावर त्वरित कारवाई करणे आवश्यक आहे.जनमाध्यम'च्या प्रतिनिधीने या घटनेची प्रत्यक्ष छायाचित्रे आणि व्हिडिओ कॅमेऱ्यात टिपले असून, या घटनेची माहिती तळेगाव वनविभागाला देण्यात आली आहे. गावकऱ्यांनी तातडीने चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या उपसाचे प्रभाव पाहता, रस्त्याचे बांधकाम करताना वनविभाग आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नैसर्गिक साधनांचे नुकसान होत असल्याचे दिसते.

### पाणी नाही, संयम सुटला

# शहर तहानलेले, सत्ताधारी गाफील

## तातडीची पालिका बैठक बोलावा, विरोधकांचा एल्गार

**सिंदी रेल्वे /जनमाध्यम**

गेल्या १० ते १५ वर्षांपासून रखडलेली शहराची पाणी समस्या आता स्फोटक टप्प्यावर पोहोचली असून नागरिक अक्षरशः पाण्यासाठी वणवण फिरत आहेत. चार ते पाच दिवसांनी मिळणारा अपुरा, तर काही भागांत गढूळ व अशुद्ध पाणीपुरवठा हा प्रकार सत्ताधाऱ्यांच्या अपयशाचे जिवंत उदाहरण ठरत आहे. या ज्वलंत प्रश्नावर तात्काळ तोडगा काढण्यासाठी पालिकेची विशेष बैठक बोलावावी, अशी ठाम व आक्रमक मागणी विरोधी गटाने निवेदनातून केली आहे.

शहरातील रेल्वे स्टेशन परिसर, नदीपलीकडील भाग, नगरसेवक बोरकर यांचा वार्ड तसेच कथलकर यांचा प्रभाग क्रमांक १० येथे पाणीपुरवठा अत्यंत कमी प्रमाणात होत आहे.



अनेक भागांत पाणी येते तेही गढूळ व पिण्यायोग्य नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. परिणामी नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असून प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे.या पार्श्वभूमीवर पालिकेतील विरोधी पक्षांच्या सिंदी शहर विकास आघाडीने थेट सत्ताधाऱ्यांना लक्ष्य करत आक्रमक भूमिका घेतली आहे. महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ८१ (१) (अ) व (२) अन्वये तातडीची विशेष बैठक बोलावून पाणीपुरवठ्यावर चर्चा करावी व ठोस निर्णय घ्यावेत, अशी स्पष्ट मागणी गटनेते नगरसेवक अजय कलोडे यांनी सर्व विरोधी नगरसेवकांच्या स्वाक्षरीसह नगराध्यक्षा राणी कलोडे यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. विषय समित्यांची गठण होताच विरोधी गटाने लागलीच शहरातील सर्वांत गंभीर प्रश्नाला हात घालत सत्ताधारी गटाला कोंडीत पकडण्याचा निर्धार जाहीर केला. केवळ आश्वासनांवर नागरिकांचा संयम आता संपला असून, निर्णय नाही झाले तर रस्त्यावर उतरण्याची वेळ येईल, असा अप्रत्यक्ष इशाराही विरोधकांनी दिला आहे.या निवेदनाच्या प्रती खासदार अमर काळे, आमदार समीर कुणावार, जिल्हाधिकारी व मुख्याधिकारी यांना देण्यात आल्या असून, शहरातील पाणीप्रश्नी आता केवळ पालिका नव्हे तर जिल्हा प्रशासनालाही जबाबदारी घ्यावी लागणार आहे.निवेदन देताना गटनेते नगरसेवक अजय कलोडे यांच्यासह आशिष देवतळे, तुषार हिंगणेकर, सुरज कोपरकर, जगदीश बोरकर, वर्षा बोंबले, ज्योत्स्ना तडस, दुर्गा बेलखोडे, जयश्री मडावी तसेच स्वीकृत नगरसेवक गंगाधर कलोडे आदी उपस्थित होते.

### अन्यायाला नो एंट्री :

# प्रयोगशाळा तंत्रज्ञांचे बेमुदत उपोषण सुरू; प्रशासन निद्रिस्त

**सेवाग्राम (वर्धा)/जनमाध्यम**



महात्मा गांधी आयुर्विज्ञान संस्थान व कस्तुरबा हेल्थ सोसायटीतील प्रयोगशाळा तंत्रज्ञ लॅबोरेटरी टेक्निशियन कर्मचाऱ्यांनी २१ जानेवारी २०२६ पासून बेमुदत उपोषण सुरू केले आहे. मुख्य मागणी नियमितीकरण, योग्य वेतनमान आणि पदानुसार लाभ.कर्मचारी सांगतात की, जाहिरातीमध्ये त्यांना प्रयोगशाळा तंत्रज्ञ (कनिष्ठ) म्हणून नियुक्त केले गेले, पण योग्य पदनाम व वेतनमान दिलेले नाही. तीन वर्षांपासून त्यांनी मेहनत घेतली असून, त्यांना योग्य न्याय मिळणे आवश्यक आहे. कर्मचारी ठाम आहेत: अन्याय थांबवा, कर्मचाऱ्यांना न्याय द्या वेतन, सुरक्षा आणि हक्क हे आमचे हक्क आहेत, उपोषणामुळे प्रयोगशाळेच्या सेवा प्रभावित होण्याची शक्यता आहे, तरीही प्रशासन गंभीरतेने निष्क्रीय आहे. यापूर्वीही कर्मचारी आंदोलने व उपोषणे केले आहेत, पण तातडीने निर्णय न घेता प्रश्न टाळला. डॉ. अजयकुमार शुक्ला, अधिष्ठाता, महात्मा गांधी आयुर्विज्ञान संस्थान व डॉ. बी एस गर्ग, सचिव, कस्तुरबा हेल्थ सोसायटी यांनी तातडीने मागण्या मान्य कराव्यात, अशी कर्मचारी अपेक्षा व्यक्त करत आहेत. कर्मचारी स्पष्ट करतात की, मागण्या पूर्ण होईपर्यंत उपोषण चालू राहणार आहे, आणि आंदोलन तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# हेलोडीतील एनएसएस शिबिरात लघु बंधारा उभारणी

## स्वयंसेवकांचा उल्लेखनीय श्रमदान



**सिंदी रेल्वे /जनमाध्यम**

विद्यार्थ्यांनी कोणतीही माहिती स्वीकारताना तर्कशुद्ध विचार करणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवणे गरजेचे आहे. अंधश्रद्धा, गैरसमज व अफवांपासून दूर राहिल्यास योग्य निर्णयक्षमता विकसित होते, असे पत्रकार मोहन सुरकार यांनी म्हटले.स्व. रमाबाई वझुरकर नगर कनिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) वतीने हेलोडी येथे आयोजित श्रमसंस्कार शिबिरात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पत्रकार आनंद छाजेड यांनी केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता सर्वांगीण विकासावर भर देण्याचे आवाहन केले.

**श्रमदानातून पाणीसाठा वाढीस हातभार** - शिबिरात स्वयंसेवकांनी दगडांच्या सहाय्याने लघु बंधारा उभारून समाजोपयोगी कार्य केले. या उपक्रमामुळे पाण्याची साठवण वाढून भूजलपातळी सुधारेल आणि शेतकरी व ग्रामस्थांना थेट फायदा होईल.

**सामाजिक जनजागृतीसाठी पथनाट्य** - स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, श्रमदान यासह अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, स्त्री-पुरुष समानता, पर्यावरण संरक्षण व मतदान जनजागृती या विषयांवर प्रभावी पथनाट्य सादर करण्यात आले.

**मान्यवरांची उपस्थिती** - शिबिराचे उद्घाटन नगर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अतुल टालाटुले व सहसचिव नीता टालाटुले यांच्या हस्ते करण्यात आले. प्राचार्य विलास येखंडे, पोलीस पाटील प्रवीण पाटील, माजी सरपंच सागर भगत, रासेयो सहाय्यक विभागीय समन्वयक रवींद्र गुजरकर उपस्थित होते.समारोप प्रसंगी नगरसेवक शरद तळवेकर अध्यक्षस्थानी होते. राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव, सामाजिक जाणीव व नेतृत्वगुण वाढतात, असे त्यांनी सांगितले.

**स्पर्धांमधून कलागुणांना चालना** - हेलोडीतील बालकांसाठी चित्रकला व रंगभरण स्पर्धा, तसेच महिलांसाठी भव्य रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी साखरकर व समीक्षा कोराम यांनी केले, तर जानवी निकोडे हिने आभार प्रदर्शन केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी सर्व स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.

### मंगलाष्टकांऐवजी अश्रूंचे सूर

# लग्नाआधीच भावी नवरदेव सचिन जवंजाळ काळाच्या पडद्याआड

**आजनसरा/जनमाध्यम**

मंगलाष्टकांचे सूर कानावर पडण्याआधीच नियतीने घाला घातला. अवघ्या पंधरा दिवसांपूर्वी साखरपुडा झालेल्या येथील भावी नवरदेव सचिन अशोकराव जवंजाळ (वय ३०) यांचा १८ जानेवारीच्या मध्यरात्री झोपेतच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे आनंदाने उजळलेले घर एका क्षणात शोकसागरात बुडाले.



सचिन यांचा ८ जानेवारी रोजी देवळी तालुक्यातील युवतीशी साखरपुडा मोठ्या उत्साहात पार पडला होता. एप्रिल महिन्यातील मुहूर्तावर विवाह निश्चित झाला होता. लग्नाची तयारी, मंगल कार्यालय, वाजंत्री आणि आप्तेष्टांची धावपळ सुरू होती. सनई-चौघड्यांचे मंजुळ सूर घुमण्याआधीच काळाने डाव साधला.दुर्दैवाची वेदनादायी बाब म्हणजे, लग्नासाठी निश्चित केलेले बँडपथकच अखेर सचिन यांच्या अंत्ययात्रेसाठी बोलवावे लागले. ज्या घरात अक्षदा उधळल्या जाणार होत्या, त्याच घरातून अंत्ययात्रा निघाल्याचे दृश्य उपस्थितांचे काळीज पिळवटून टाकणारे होते. वडील मुलाच्या खांद्यावरून जातात ही म्हण येथे उलटी ठरली. ज्या वडिलांच्या खांद्यावर खेळत सचिनचे बालपण गेले, त्याच वडिलांच्या खांद्यावरून त्यांची अंतिम यात्रा निघाली.सचिन हा अत्यंत साधा, निर्व्यसनी, प्रेमळ व मनमिळावू स्वभावाचा तरुण होता. गावातील प्रत्येकाच्या सुख-दुःखात धावून जाणारा, सामाजिक व धार्मिक उपक्रमांत नेहमी पुढे असणारा असा त्याचा स्वभाव सर्वांना परिचित होता. त्यांचे वडील अशोकराव जवंजाळ हे गुरुदेव सेवा मंडळाचे प्रचारक असल्याने सचिनवरही सेवाभाव व संस्कारांची गडद छाप होती.१९ जानेवारी रोजी सचिन यांच्या शेतात हजारो नातेवाईक व ग्रामस्थांच्या उपस्थितीत त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. अश्रूंनी ओथंबलेल्या वातावरणात सर्वांनी त्यांना अंतिम निरोप दिला.

## निधन वार्ता

### कृष्णराव तुपे



**वर्धा-** स्थानिक बडे चौक येथील कृष्णराव शंकरराव तुपे यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. ते ९० वर्षाचे होते. त्यांच्यावर स्थानिक हिंदू स्माशानभुमित अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, पाच मुली असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. ते सार्वजनिक बांधकाम विभाग येथे वरिष्ठ लिपिक म्हणून सेवानिवृत्त झाले होते.

### बाबाराव मानकर



**विरुळ (काकाजी)** -येथील फुले-शाहू-आंबेडकर विचारधारेचे सामाजिक कार्यकर्ते व माजी सरपंच बाबारावजी दिगंबर मानकर यांचे दुःखद निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुले असा परिवार आहे. त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### विठोबा वांदिले यांचे निधन



**वर्धा :** स्थानिक आर्वी नाका परिसरातील रहिवासी विठोबा लक्ष्मणराव वांदिले वय ८६ वर्षे यांचे सकाळी निधन झाले. त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात, पत्नी, मुलगा ,स्नुषा, मुली ,जावई नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

# जात-धर्माच्या भिंतींवर प्रेमाचा विजय

## अंनिसच्या पुढाकाराने आंतरधर्मीय प्रेमविरांचा कायदेशीर विवाह

**वर्धा/जनमाध्यम**

समाजात आजही जात-धर्माच्या नावावर प्रेमनात्यांना विरोध होत असताना, अशाच अडचणीत सापडलेल्या प्रेमविरांना न्याय, संरक्षण आणि सन्मान देण्याचे काम महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) सातत्याने करत आहे. अंनिसच्या वर्धा जिल्हा व शहर शाखेच्या पुढाकाराने सावंगी मेघे येथील आदित्य इंगळे आणि बोरगाव मेघे येथील वर्षा नामक युवतीने या आंतरधर्मीय प्रेमविरांचा विवाह सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून लावून देण्यात आला.



आदित्य आणि वर्षाची ओळख मैत्रीतून झाली. परस्पर भेटीगाठी व संवादातून हे नातं प्रेमात रूपांतरित झालें. मात्र आदित्य बौद्ध आणि वर्षा हिंदू असल्याने वर्षाच्या कुटुंबीयांनी या नात्याला तीव्र विरोध केला. वर्षावर मानसिक दबाव, धमक्या आणि मारहाणीपर्यंत प्रकार झाले. आदित्यपासून दूर राहा यासाठी सर्व मार्ग अवलंबण्यात आले; मात्र वर्षाने सर्व त्रास सहन करत आदित्यशीच विवाह करण्याचा ठाम निर्णय घेतला.असह्य छळाला कंटाळून वर्षाने घर सोडण्याचा निर्णय घेतला. अशा परिस्थितीत अनेकदा तरुणी चुकीच्या मार्गाला लागण्याची किंवा टोकाचा निर्णय घेण्याची भीती असते. मात्र वर्षाने योग्य पाऊल उचलत महिला व बालकल्याण विभागाच्या सखी वन-स्टॉप सेंटरमध्ये धाव घेतली. तेथे तिला संरक्षण देत सर्व कायदेशीर प्रक्रिया राबवण्यात आल्या. दोन्ही कुटुंबीयांना बोलावून समजावण्याचा प्रयत्न झाला; मात्र वर्षाच्या कुटुंबीयांनी जात-धर्माच्या कारणावरून विरोध कायम ठेवत माघार घेतली. आदित्यचे कुटुंब मात्र वर्षाला स्वीकारण्यासाठी पुढे आले. या संपूर्ण प्रकरणाची माहिती अंनिसचे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांना देण्यात आली. त्यांनी तत्काळ हस्तक्षेप करत सर्व कायदेशीर बाबी पूर्ण केल्या. अखेर वर्धा येथील वर्धन हाट झुनका-भाकर केंद्राच्या सभागृहात आदित्यचे कुटुंबीय, मित्रमंडळी व शहरातील गणमान्य नागरिकांच्या उपस्थितीत या प्रेमविरांचा विवाह पार पडला.यावेळी जिल्हाध्यक्ष बाबाराव किटे, शहर जिल्हाध्यक्ष अरुण चवडे, आदित्यचे वडील विनोद इंगळे, आई वर्षा विनोद इंगळे, पत्रकार राजू गोरडे, ज्येष्ठ समाजसेविका शारदाताई झामरे, आंबेडकरी विचारवंत डॉ. सुहास खंडारे, राष्ट्र सेवा दलाचे मोहन खैरकार आदी उपस्थित होते. मान्यवरांनी जात-धर्मभेदमुक्त समाजनिर्मितीचा संदेश देत प्रेमविवाहाला पाठिंबा व्यक्त केला.हा विवाह केवळ दोन जणांचा सोहळा नसून, समाजातील अंधश्रद्धा, जातीयतेविरुद्ध उभा राहिलेला ठाम संदेश आहे. प्रेम, समता आणि संविधानिक मूल्यांवर विश्वास ठेवणाऱ्यांसाठी हा विवाह प्रेरणादायी ठरत आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ५८
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## आमझरी येथे 'मधाचे गाव' योजनेअंतर्गत आदिवासी महिलांना मधमाशा पालनाचे प्रशिक्षण



**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या 'मधाचे गाव' योजनेअंतर्गत जिल्ह्यातील आमझरी येथील स्थानिक आदिवासी महिलांना सातेरी मधमाशा पालनाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

साधनसंपत्ती आणि मुबलक फुलोरा असलेल्या या भागात मधमाशा संवर्धनातून निसर्गाचे रक्षण करणे, मध व त्यापासून तयार होणाऱ्या उत्पादनांची विक्री व्यवस्था करणे आणि मधुपर्यटनाच्या माध्यमातून गावाला स्वयंपूर्ण बनविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. राज्यात पहिल्या टप्प्यात निवडण्यात आलेल्या १० गावांमध्ये आमझरीचा समावेश असून,सध्या जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली येथे विविध उपक्रम राबविले जात आहेत.सद्यस्थितीत गावातील २१ महिलांना प्रशिक्षण दिले जात असून, भविष्यात गावातील प्रत्येक घरातील किमान एका सदस्याला प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या प्रशिक्षणामध्ये मधमाशांच्या जाती, निसर्गातील आग्या मधमाशांच्या वसाहतींपासून शास्त्रोक्त पद्धतीने मध संकलन, मध उद्योगातील उप-उत्पादने आणि मधुमक्षिका पालनाचे तांत्रिक ज्ञान दिले जात आहे. यासोबतच गावात प्रशिक्षणासह मधपेट्यांचे वाटप, मधुबनाची स्थापना, सामुहिक सुविधा केंद्र आणि माहिती दालनाची निर्मिती करण्यात येत आहे, ज्यामुळे हे गाव मध उत्पादनाचे एक प्रमुख केंद्र म्हणून नावारूपास येणार आहे, अशी माहिती जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांनी दिली.

# थ्रेशरवर काम करणाऱ्या युवकाची निर्घृण हत्या

## अष्टमा सिद्धी जंगल परिसरात खळबळ

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर तालुक्यातील अष्टमा सिद्धी जंगल परिसरात थ्रेसरवर काम करणाऱ्या एका युवकाची हत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून, या घटनेमुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे. काजलडोह येथील रहिवासी बीरू शिवकली मरसकोल्हे (वय ४० वर्ष) यांची आपापसातील वादातून निर्घृण हत्या करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, शेतातील पिकांची काढणी करण्यासाठी काही मजूर थ्रेसरवर काम करण्याच्या उद्देशाने जंगल परिसरात आले होते. कामाच्या दरम्यान दारूचे सेवन झाल्यानंतर मजुरांमध्ये वाद निर्माण झाला. हा वाद काही



वेळातच टोकाला गेला. याच वादातून आरोपींनी बीरू मरस्कोलहे यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. हल्ला इतका गंभीर होता की बीरू यांचा जागीच मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच परतवाडा पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह पुढील तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविला आहे. बातमी लिहेपर्यंत या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. मात्र, संशयित आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत.या घटनेनंतर अष्टमा सिद्धी जंगल परिसरासह आसपासच्या गावांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मजुरांमधील अंतर्गत वाद, दारूचे सेवन आणि कामाच्या ठिकाणी होणारे संघर्ष यामुळे गंभीर गुन्ह्यांची शक्यता वाढत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये होत आहे.दरम्यान, पोस्टमार्टम अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असून, त्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. पोलिस अधिक तपास करत असून, या खूनप्रकरणाचा लवकरच उलगडा होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## अमरावती महानगरपालिका क्षेत्रात प्लास्टिक जप्ती व दंडात्मक मोहीम



**अमरावती/का.प्र.**

अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव व सहाय्यक आयुक्त झोन क्र. ३ यांच्या निर्देशानुसार आज दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी झोन क्र. ३ अंतर्गत दस्तूरनगर ते यशोदानगर रोड या परिसरात प्लास्टिक जप्ती व दंडात्मक मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान एकूण २२ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान बहुतांश आस्थापनांमध्ये कापडी व कागदी पिशव्या तसेच ५१ मायक्रॉनपेक्षा जास्त जाडीचे प्लास्टिक वापरण्यात येत असल्याचे आढळून आले.तथापि, पियुष कृपा इंटरप्रायझेस या एका आस्थापनामध्ये प्रतिबंधित प्लास्टिक आढळून आल्याने सदर आस्थापनावर ५,०००/- इतका दंड आकारण्यात आला. तसेच बिकानेर मिठाई या आस्थापनामध्ये डस्टबिन नसल्यामुळे ५००/- इतका दंड आकारण्यात आला. या मोहिमेत एकूण ५,५००/- रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.सदर मोहिमेमध्ये प्लास्टिक निर्मूलन नोडल अधिकारी विनोद टांक, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक कुंदन हडाले, स्वास्थ निरीक्षक योगेश कंडारे, मोहित जाधव, मनिष नकवाल, प्रसाद कुलकर्णी व संजय माहूरकर उपस्थित होते. महानगरपालिकेच्या वतीने नागरिक व व्यापाऱ्यांना प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर टाळण्याचे तसेच स्वच्छतेच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### जी एच रायसोनी विश्वविद्यालयात

## पॉलिमर तंत्रज्ञानावर ज्ञानवर्धक अतिथी व्याख्यान

**अमरावती/क्रा.प्र.**

जी. एच. रायसोनी विश्वविद्यालय, अमरावती येथील बी.टेक प्रथम वर्ष अभियांत्रिकी व फॉरेन्सिक सायन्स विभागाने 'पॉलिमर तंत्रज्ञान' या विषयावर एक अत्यंत उपयुक्त अतिथी व्याख्यान आयोजित केले. हे व्याख्यान मौलाना आझाद नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (MANIT), भोपाळ येथील प्रख्यात प्राध्यापिका डॉ. सविता दीक्षित यांनी दिले. डॉ. दीक्षित या प्राकृतिक उत्पादने, पॉलिमर कम्पोजिट सामग्री, बायोफ्यूएल्स आणि पर्यावरण रसायनशास्त्र या क्षेत्रातील तज्ज्ञ म्हणून



ओळखल्या जातात.

डॉ. दीक्षित यांनी विद्यार्थ्यांना पॉलिमरची मूलभूत माहिती देत व्याख्यानाची सुरुवात केली. त्यांनी स्पष्ट केले की, पॉलिमर हे मोठे रेणू असतात जे दोहरावपूर्ण संरचनात्मक घटकांपासून सहसंयोजक बंधनांद्वारे तयार होतात. नैसर्गिक पॉलिमर (उदा. प्रोटीन, सेल्युलोज) आणि कृत्रिम पॉलिमर (उदा. प्लास्टिक, फायबर) यांच्यातील फरक स्पष्ट करून त्यांनी विषयाची खोलवर चर्चा केली.वास्तविक जीवनातील प्रभाव अधोरेखित करताना डॉ. दीक्षित यांनी पॅकेजिंग (अन्न, औषधे), ऑटोमोटिव्ह पार्ट्स, एरोस्पेस कम्पोजिट्स, वैद्यकीय इम्प्लांट्स, प्रोस्थेटिक्स आणि टेक्सटाइल्स यांसारख्या क्षेत्रांतील पॉलिमरचे अनुप्रयोग सांगितले. केस स्टडीजद्वारे विषय अधिक रोचक केला गेला, जसे की रॅपिड प्रोटोटाइपिंगसाठी ३डी प्रिंटिंग, टिकावासाठी बायोडिग्रेडेबल प्लास्टिक आणि उच्च मजबुतीसाठी फायबर-रिनफोर्स्ड कम्पोजिट शेवटी डॉ. दीक्षित यांनी सामग्री निवड, प्रक्रिया ऑप्टिमायझेशन, गुणवत्ता नियंत्रण, रिसायकलिंग आणि पर्यावरणीय जबाबदारी यांसारख्या सर्वोत्तम पद्धतींवर भर दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना या गतिशील क्षेत्रात जबाबदारीने नवकल्पना करण्यासाठी प्रोत्साहित केले.या इंटरॅक्टिव्ह सत्रात सुमारे ६० उत्साही बी.टेक प्रथम वर्ष विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमात प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. मुकेश कुमार, पीएचडी सेलचे प्रभारी डॉ. श्रीकांत चवाटे, डॉ. वृषाली वानखेड़े, डॉ. तपन कुमार शंकर, डॉ. मनीष फुकाटे, प्रा. अभया भोपले आणि प्रा. रुतिका भोयर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुचारू आयोजन डॉ. वृषाली वानखेड़े यांनी केले.

## उत्तमसरा येथे सिकलसेल बाबत जनजागृती

**अमरावती/का.प्र.**

पंचायत समिती भातकुली मधिल आयुष्यमान आरोग्य मंदिर उत्तमसरा अंतर्गत जिल्हा परिषद शाळा उत्तम सरा येथे अरुणोदय सिकलसेल अभियान राबविण्यात आले, यामध्ये डॉक्टर सोनाली देशमुख यांनी सिकलसेल विषयी विस्तृत माहिती सांगण्यात आली.

ज्या ॲनिमिया मध्ये रक्तपेशींचा आकार विळाप्रमाणे अर्ध चंद्राकृती होतो त्याला सिकलसेल असे म्हणतात.सिकल सेलचे दोन प्रकार असतात एक हे सिकलसेल ग्रस्त आणि सिकलसेल वाहक सिकलसेल हा आनुवंशिक आजार आहे सिकलसेल मध्ये रक्त पेशींचा चा आकार वी ळाप्रमाणे झाल्यामुळे रक्तप्रवाह मध्ये अडथळा निर्माण होतो. सिकलसेल लोकांना फॉलिक ॲसिडच्या गोळ्या दिल्या जातात कारण त्यामुळे नवीन रक्तपेशींची




निर्मिती होते सिकलसेल लोकांनी पाणी भरपूर प्यावे, हिरव्या पालेभाज्यांचे सेवन करावे खूप जास्त एक्झरशन करू नये. उपकेंद्रस्तरावर सिकलसेल साठी सोलबलिटी टेस्ट केल्या जाते यामध्ये सकारात्मक परिणाम आल्यास त्या लाभार्थ्यांना hb इलेक्ट्रोफोरेसिस साठी जिल्हा रुग्णालयात संदर्भित केल्या जाते तिथे वाहक AS आणि ग्रस्त SS असे दोन प्रकार केले जातात. वाहक लोकांना पिवळे गाठ दिले जाते आणि ग्रस्त लोकांना लाल कार्ड दिल्या जातात तसेच औषधोपचार मोफत केला जातो. शासनामार्फत सिकलसेल ग्रस्त रुग्णांना संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत धर्म हा अडीच हजार रुपये मिळतात, तसेच जे सिकलसेल ग्रस्त विद्यार्थी बोर्डाचे परीक्षेत आहेत त्यांना एक तासांच्या मागे वीस मिनिटं जास्तीचे मिळतात, त्यांना दिव्यांग सर्टिफिकेट मिळते, रेल्वे प्रवासात ५०% सूट मिळते. सिकलसेल ग्रस्त रुग्णाचा मोफत औषधोपचार व समुपदेशन करण्यात येते. अरुणोदय सिकलसेल अभियान १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी पर्यंत राहणार आहे, हे अभियान यशस्वी करण्याचो आवाहन,सरपंच धर्मेंद्र मेहरे,पोलिस पाटिल सचिन सवाई,रत्नादिप सवाई, तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर श्वेता सालफळे, तसेच वैद्यकीय अधिकारी डॉक्टर प्रवीण खराटे, उपकेंद्र उत्तम सरांच्या डॉक्टर सोनाली देशमुख,आरोग्य सहाय्यवआकाश हिंगलासपुरे, आरोग्य साविका मंगला वानखेडे,आरोग्य सेवक चेतन राठोड, सिकलसेल समुपदेशक मेघा चर्जन यांनी केले आहे.यावेळी जिल्हा परिषद शाळेचे सर्व शिक्षक,शाळेच्या मुख्याध्यापिका मिनांक्षी इंगळे,मुख्याध्यापक लोमेश खैरकर,संतोष कुऱ्हेकर,शितल भोपळे मॅडम,राजेश सावरकर,गजानन योलोने,प्रमोद कांबळे आणि इतर शिक्षक वृंद तसेच विद्यार्थी या सर्वांनी अभियान यशस्वी करण्यासाठी आवाहन केले.

## संक्षिप्त

### विद्यापीठातील 'व्हिजनरी : डॉ. योगेश ब्राम्हणकर यांच्याशी संवाद'

**अमरावती -** विद्यार्थ्यांना स्टार्टअप्सबाबत योग्य दिशा मिळावी, त्यांना शासकीय योजनांची माहिती व्हावी आणि भविष्यातील रोजगाराच्या संधींचा शोध घेता यावा, या उद्देशाने येत्या २३ जानेवारी रोजी दुपारी ३.०० वाजता विद्यापीठातील जैवतंत्रज्ञान विभागाच्या सभागृहामध्ये 'व्हिजनरी : डॉ. योगेश ब्राम्हणकर यांच्याशी संवाद' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयातील इनोव्हेशन सेलचे संचालक डॉ. योगेश ब्राम्हणकर हे विद्यार्थ्यांना महत्वपूर्ण मार्गदर्शन करणार आहेत.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जैवतंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ. प्रसाद वाडेगावकर भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाच्या इनोव्हेशन, इन्क्युबेशन ॲन्ड लिंकेजेसचे संचालक डॉ. अजय लाड, इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख प्रा. स्वाती शेरेकर उपस्थित राहणार आहेत.

### पोलीस मुख्यालय मैदानावर प्रजासत्ताक दिनाचा सोहळा

**अमरावती-**भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा यावर्षी पोलीस मुख्यालय, अमरावती शहर परेड मैदान येथे आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९.१५ वाजता पार पडणार आहे.दरवर्षी प्रजासत्ताक दिनाचा मुख्य सोहळा अमरावती येथील जवाहरलाल नेहरू स्टेडियम येथे साजरा केला जातो. मात्र, या स्टेडियमवर ४०० मीटर रनिंग ट्रॅकचे काम सुरू आहे. या कामामुळे यावर्षी कार्यक्रम घेणे शक्य नसल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे २६ जानेवारी २०२६ चा सोहळा पोलीस मुख्यालय परेड मैदानावर घेण्यात येणार आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी कळविले आहे.

### जि.प.शाळा शेंदुरजना बाजार येथे वार्षिक स्नेहसंमेलन

**तिवसा -** विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा शेंदूरजना बाजार येथे वार्षिक स्नेहसंमेलन व मिशन IAS - सामान्य ज्ञान स्पर्धा-२०२६ करीता बक्षीस वितरण समारंभाचे मोठया उत्साहाने आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून आकाश आसोडे अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती शेंदुरजना बाजार तथा उद्घाटक म्हणून आशाताई किशोर चौधरी सरपंच ग्राम शेंदूरजना बाजार, शिल्पाताई खांडेकर उपसरपंच,वामनराव भोजने तंटामुक्ती अध्यक्ष शितलताई भोजने पोलीस पाटील, सुभाषराव कांडलकर माजी उच्च श्रेणी मुख्याध्यापक, रवींद्र तायडे शिक्षण विस्तार अधिकारी, दिनेश पाटील केंद्रप्रमुख केंद्र वऱ्हा, अरुण डहाके प्राचार्य आर.जी.देशमुख कृषी महाविद्यालय तिवसा, पत्रकार हेमंत निखाडे,जगदिशराव काळे, नरेंद्र आसोडे,प्रफुल उमप, किशोर निमकर,वर्षा वाघमारे, पदमाताई भुयार, शितल धुर्वे, राजकुमार आसोडे ,आशिष गोडबोले इत्यादी मान्यवर तसेच विद्यार्थ्यांचे पालक व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दीर्घ प्रतीक्षेनंतर तुळजापूर गढी–बेलज मार्गे बस सेवा सुरू

### सुरेखा ठाकरे यांच्या उपस्थितीत बस फेरीचे स्वागत

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

कित्येक वर्षापासून अत्यंत शुल्लक कारणांमुळे प्रलंबित असलेली चांदूरबाजार–सर्फाबाद–हिरुळ पूर्णा–तुळजापूर गढी–बोरगाव मोहना–बेलज मार्गे परतवाडा ही बस फेरी अखेर सुरू करण्यात आली आहे. या निर्णयामुळे परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या मार्गावर बस सेवा उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणासाठी तालुक्याच्या ठिकाणी जाण्यास मोठ्या अडचणी येत होत्या. तसेच ग्रामीण भागातील गोरगरीब



नागरिकांना दैनंदिन प्रवासासाठी मोठा त्रास सहन करावा लागत होता. त्यामुळे या मार्गावर बस सेवा सुरू करण्याची मागणी गावकऱ्यांकडून सातत्याने करण्यात येत होती.या संदर्भात यापूर्वी माजी आ. बच्चु कडू व विद्यमान आ. प्रवीण तायडे यांच्यासह प्रशासनाकडे निवेदने देण्यात आली होती. त्यांनी वेळोवेळी प्रशासनाला आवश्यक निर्देश दिले होते. दरम्यान, तुळजापूर गढी येथे आयोजित नेत्र तपासणी शिबिराच्या वेळी गावकऱ्यांनी ही मागणी सुरेखा ठाकरे यांच्याकडे मांडली. त्यांनी तातडीने प्रशासनाला निर्देश देत येणाऱ्या अडचणींचा सविस्तर आढावा घेतला.या मार्गावर रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात काटेरी झुडपे वाढलेली होती. तसेच विद्युत तारा खाली लोंबकळत होत्या व काही विद्युत खांब वाकलेले होते. या संदर्भात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांच्यात संयुक्त बैठका घेण्यात आल्या.या बस सेवेचा सर्फाबाद, हिरुळ पूर्णा, तुळजापूर गढी, बोरगाव मोहना व बेलज परिसरातील नागरिकांना मोठा लाभ होणार आहे. पहिल्या बस फेरीचे स्वागत परिसरातील नागरिकांनी सुरेखा ठाकरे यांच्या उपस्थितीत उत्साहात केले.

## आरोपीस दोन दिवसांची पोलिस कोठडी

**चांदूरबाजार/वार्ताहर**

चांदूरबाजार येथे १९ जानेवारी रोजी वाहनाने धडक देऊन व्यावसायिक, निलेश बदूकले यांची हत्या करण्यात आल्याची घटना उघडकीस आली.या प्रकरणी आरोपी अजय लंगोटे याला पोलिसांनी अटक केली होती.सदर घटनेचा पोलिस सर्व बाजूंनी, तपास करीत आहे. पोलिस अपघात की हत्या.या दोन्ही बाजू तपासत आहे. घटनेनंतर चांदूरबाजार पोलिसांसह अमरावती स्थानिक गुन्हे शाखेचे, पथकही तपासात सहभागी झाले आहे. तांत्रिक माहितीच्या आधारे सखोल चौकशी सुरू आहे.

प्रकरणातील आरोपी अजय लंगोटे याला आज, २० जानेवारी रोजी चांदूरबाजार न्यायालयात हजर करण्यात आले. प्रकरणातील उर्वरित बाबींचा उलगडा करण्यासाठी पोलिसांनी, पाच दिवसांची पोलिस कोठडी मागणी केली होती. मात्र न्यायालयाने आरोपीला दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.दरम्यान या घटनेमागील नेमकी कारणे कोणती?आरोपीचा हेतू काय?तसेच घटनेशी संबंधित इतर बाबींचा तपास पोलिस सर्वच मुद्द्यांची चौकशी करत आहेत. या प्रकरणात आणखी दोघांना अटक. पहिल्या आरोपीस पोलिस कोठडी मिळाल्या नंतर कोठडीतील चौकशीत,आरोपी कडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी या प्रकरणात आणखी दोघांना अटक केली आहे.पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतलेल्यांची नावे, गोलू लंगोटे व पवन झटाले अशी आहेत.

# लाडकी बहीण योजनेतील प्रलंबित हप्ते त्वरित देण्याची मागणी

### एकात्मिक बाल विकास सेवा योजना, अमरावती (ग्रामीण) कार्यालयात निवेदन

**शिराळा/वार्ताहर**

राज्य शासनाच्या लाडकी बहीण योजनेअंतर्गत अमरावती ग्रामीण भागातील अनेक लाडक्या बहिणींना मागील दोन महिने व त्यापेक्षा अधिक कालावधीपासून अनुदानाची रक्कम मिळालेली नाही. या गंभीर बाबीकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आज एकात्मिक बाल विकास सेवा योजना, अमरावती (ग्रामीण) कार्यालय येथे लाडक्या बहिणींसह



उपस्थित राहून संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली.

माजी तालुकाध्यक्ष राजूभाऊ गंधे यांच्या उपस्थित सीडीपीओ अधिकारी मा.वानखडे साहेब यांच्याशी सविस्तर चर्चा करून लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र असलेल्या सर्व लाभार्थींना प्रलंबित असलेले हप्ते तातडीने अदा करण्यात यावेत, अशी ठाम मागणी करण्यात आली.लाडक्या बहिणींच्या आर्थिक अडचणी लक्षात घेता या योजनेतील निधी वेळेत मिळणे अत्यंत आवश्यक असून, विलंबामुळे लाभार्थी महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने त्वरित कार्यवाही करून पात्र लाभार्थींना लवकरात लवकर रक्कम वितरित करावी, अशी मागणी करण्यात आली.यासंदर्भात लाडक्या बहिणींच्या वतीने अधिकृत निवेदन सादर करण्यात आले असून, लवकरच सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन यावेळी देण्यात आले.यावेळी माझ्यासोबत भाजपचे अमरावती तालुका उपाध्यक्ष आशिष खैरकर. कोश्याध्यक्ष अतुल केतकर. भाजपचे संतोष घुले नवनीत उमेकर आकाश भस्मे सचिन पाटील अनिल सोलव यांच्या सह शिराळा सर्कल मधील असंख्य लाडक्या बहिणी उपस्थित होते.

# दारूच्या नशेत मित्रानेच केली मित्राची हत्या

## -अष्टमासिद्धी शेतशिवारातील घटना





**परतवाडा/प्र्रतिनिधीः-** दारूच्या नशेमध्ये मित्रानेच स्वयंपाक बनवण्यावरून झालेल्या वादात मित्राची राफ्टरने हल्ला करून हत्या केल्याची घटना परतवाडा पोलीस ठाण्यातंर्गत अष्टमासिद्धी शेतशिवारात मंगळवारी उशिरा रात्री घडली. या प्रकरणात पोलिसांनी आरोपी भोंदू ब्रिजलाल कवडे (वय ३०, काजळडोह, चिखलदरा) याला ताब्यात घेतले आहे, तर वीरू शिवकली मरसकोल्हे (वय ३०, काजलडोह चिखलदरा) असे मृतकाचे नाव आहे.

माहितीनुसार अचलपूर येथील बुंदेलपुरातील रहिवासी पंकज प्रभाकर वानखडे (वय ३०) यांचे थ्रेशर चे काम आहे. अष्टमासिद्धी मध्ये इकबाल यांच्या शेतात पिकांची कापणी सुरू आहे. यामुळे त्यांनी थ्रेशर वर काम करण्यासाठी काजलडोह वरून मृतक वीरू मरसकोल्हे व आरोपी भोंदू कवडे यांना बोलविले होते. मंगळवारी सायंकाळ पर्यंत त्यांनी इकबाल यांच्या शेतात काम केले आणि रात्रीच्या सुमारास पांदन मार्गावरील गोपाल लुल्ला यांच्या शेतात दोघे स्वयंपाक करत होते. यावेळी त्यांनी दारू पार्टी पण केली. स्वयंपाक करत असताना मृतक वीरू ने आरोपी भोंदूला म्हटले की तू चांगले जेवण नाही बनवत. यावरून दोघांच्या मधात वाद झाला.वीरू ने त्याला शिवीगाळ केली. यामुळे संतापलेल्या भोदू ने चुलीजवळ ठेवलेला राफ्टर उचलून वीरूच्या डोक्यावर मारला. यामध्ये तो जखमी झाला. त्याच्या डोक्यातून रक्त निघत होते.हे पाहून भोंदू ने त्याच्या डोक्यावर हळद लावून दिली. यानंतर दोघे झोपून गेले. बुधवारी सकाळी जेव्हा भोंदू उठला तेव्हा त्याने ☞(पान २ वर)

# उमेश कोल्हे हत्याकांडाच्या आरोपीची जमानत याचिका फेटाळली

## भीती निर्माण करण्यासाठी हत्या केल्याचे उच्च न्यायालयाचे मत



**अमरावती/प्रतिनिधीः-** औषधविक्रेते उमेश कोल्हे यांची २१ जून २०२२ मध्ये झालेली हत्या, ही जनतेच्या मनात भीती निर्माण करण्याच्या उद्देशाने करण्यात आली होती, असे सकृतदर्शनी मत उच्च न्यायालयाने मंगळवारी व्यक्त केले. तसेच या प्रकरणातील आरोपी डॉ. युसुफ खान यांना जामीन देण्यास नकार दिला. माजी भाजप सदस्या नुपूर शर्मा यांनी पैगंबर मोहम्मद यांच्याबद्दल केलेल्या कथित आक्षेपार्ह टिप्पणीला पाठिंबा देणारी समाजमाध्यम पोस्ट इतरांना पाठवल्याबद्दल कोल्हे यांची २१ जून २०२२ मध्ये हत्या करण्यात आली होती. अशा गुन्ह्यांमुळे समाजाच्या मूळ गाभ्यावर आणि सदसद्विवेक बुद्धीवर परिणाम होतो. समाज असुरक्षित होतो आणि सतत भीतीच्या छायेत जगण्यास प्रवृत्त होतो, असे मतही न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या खंडपीठाने व्यक्त केले. या प्रकरणी आरोपी असलेला पशुवैद्यकीय डॉ. युसूफ खान याने जामिनाच्या मागणीसाठी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. तथापि, त्याच्याविरुद्ध कथित गुन्हा केल्याचा सकृतदर्शनी पुरावा आहे, असे नमूद करून न्यायालयाने युसुफची याचिका फेटाळली. युसुफ याच्यावरील आरोप सकृतदर्शनी खरे मानण्यास वाजवी कारणे आहेत, असे आमचे मत आहे. कोल्हे यांनी आपल्या धर्माचा कथित ☞(पान २ वर)

### किशनराव हुंडीवाले हत्याकांडाचा निकाल

# १० आरोपींना जन्मठेप, ५ निर्दोष

## विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांचा यशस्वी युक्तिवाद



**अकोला/प्रतिनिधीः-** अकोला शहराला हादरवून टाकणाऱ्या आणि संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र प्रतिक्रिया उमटविणाऱ्या गवळी समाजाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष किशनराव हुंडीवाले यांच्या बहुचर्चित हत्याकांडाचा निकाल अखेर सहा वर्षानंतर बुधवारी न्यायालयाने दिला. या प्रकरणात न्यायालयाने १० आरोपींना दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली असून ५ आरोपींना सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्त केले आहे.

६ मे २०१९ रोजी एका प्रकरणाच्या सुनावणीसाठी किशनराव हुंडीवाले हे अकोल्यातील धर्मदाय आयुक्त कार्यालयात आले होते. दुपारी सुमारे १२ वाजताच्या सुमारास अज्ञात आरोपींनी त्यांच्यावर प्राणघातक हल्ला करत अत्यंत निर्घृणपणे हत्या केली. या घटनेनंतर अकोल्यासह राज्यभर संतापाची लाट उसळली होती. या प्रकरणी सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात १५ आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या खून प्रकरणाचा तपास सुरुवातीला तत्कालीन पोलीस निरीक्षक विनोद ठाकरे यांनी केला. पुढे बाळापूर येथील सोहेल शेख, शहर उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश माने पाटील तसेच पोलीस निरीक्षक रायटर उमेश पाटील यांनी तपासाची सूत्रे हाती घेतली. तपासादरम्यान साक्षी, तांत्रिक पुरावे आणि विविध कागदपत्रांच्या आधारे एक हजारांहून ☞(पान २ वर)

# रिद्धी ज्वेलर्स घोटाळा : महिलांचा नांदगाव पोलीस ठाण्यावर मोर्चा

**-२० कोटींहून अधिक रोख रक्कम व कोट्यवधींचे सोने हडप केल्याचा आरोप**



**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-** येथील रिद्धी ज्वेलर्स या सराफा व्यावसायिकाकडे गहाण ठेवलेले सोने, दागिने तसेच रोख रक्कम परत न मिळाल्याने संतप्त झालेल्या शेकडो महिलांनी व पीडित नागरिकांनी आज थेट नांदगाव पोलीस ठाण्यावर धडक देत आरोपी सतीशचंद्र बहाड याच्यावर गुन्हा दाखल करण्याची जोरदार मागणी केली. या घटनेमुळे पोलीस ठाण्याला काही काळ छावणीचे स्वरूप प्राप्त झाले होते.एका आठवड्यापूर्वी सुद्धा काही नागरिकांनी याप्रकरणी तक्रार दाखल केली होती आणि हा गंभीर प्रकार उघडकीस आला ☞(पान २ वर)

### तपासाअंती गुन्हा दाखल करू

आरोपीविरुद्ध सबळ पुरावे जमा करण्यात आले आहेत. दोन वेगवेगळ्या तक्रारीमधून शंभर पेक्षा अधिक नागरिकांच्या तक्रारी व मुद्देमालांची माहिती घेण्यात आली असून तपासाअंती आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात येईल.

**-दिनेश दहातोंडे,**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पो स्टे. नांदगाव पेठ

# युवा स्वाभिमान पक्षाच्या मनपा गटनेतेपदी ज्ञानेश्वर आमले

## शिंदे सेनेचे गटनेते डॉ. राजेंद्र तायडे





**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका निवडणुकीचे निकाल नुकतेच घोषित झाले आहे. निकालामध्ये युवा स्वाभिमान पार्टीला १५ जागा मिळाल्या आहे. त्यामुळे पक्षाच्यावतीने आज बुधवार २० जानेवारी रोजी मनपा गट स्थापित करण्यासाठी नवनिर्वाचित नगरसेवकांची बैठक बोलावली. या बैठकीमध्ये प्रभाग क्रमांक २१ जुनी वस्ती बडनेरा येथून निर्वाचित युवा स्वाभिमान पार्टीचे नगरसेवक ज्ञानेश्वर उर्फ नाना आमले यांची सर्वांच्या संमतीने गटनेतेपदी नियुक्ती करण्याचे ठरविण्यात आले. कोअर कमिटीने त्यांच्या नावाला मंजुरी दिली. नाना आमले गटनेता म्हणून गुरुवारी विभागीय आयुक्तांसमोर आपला दावा सादर करणार आहे.

**शिंदे सेनेचे गटनेते डॉ. राजेंद्र तायडे-** महानगरपालिकेच्या ८७ ☞(पान २ वर)

### नीलेश बदुकले हत्याकांडात नवा खुलासा

# हत्येपूर्वी दोन दिवस रेकी

## आणखी दोघांना अटक




**बोलोरा/प्रतिनिधीः-** तालुक्यातील व्यवसायिक वादातून चांदूर बाजार येथे झालेल्या नीलेश बदुकले यांच्या निर्घृण हत्याकांडात धक्कादायक माहिती समोर आली असून, हत्या करण्यापूर्वी तब्बल दोन दिवस आरोपींनी रेकी केल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणात आणखी दोन आरोपींना अटक करण्यात आल्याने एकूण आरोपींची संख्या आता तीन झाली आहे.

चांदूर बाजार येथील टोम्पे नगर परिसरात राहणारे नीलेश सुरेशराव बदुकले (वय ४२), हे रेती व मुरूम व्यवसायातील नामवंत व्यवसायिक होते. काही काळापूर्वीच ते कुटुंबासह चांदूर बाजार येथे वास्तव्यास ☞(पान २ वर)

# अचलपूर नप मध्ये सभापती पदाच्या निवडणुकीत काँग्रेसचा सुफडा साफ

## -निवडणूक अविरोध



**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर नगरपरिषदेच्या विषय समितीच्या सभापती पदाची निवडणूक खेळीमेळीच्या वातावरणात २० जानेवारी रोजी अतिशय अविरोध पार पडली.अचलपूर नगर परिषद विविध समितीच्या सभापती पदाच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा सुफडा ☞(पान २ वर)

### ■ काँग्रेस चे ४१ पैकी १५ नगरसेवक

अचलपूर न. प मध्ये विविध समितीच्या सभापती पदाच्या निवडणुकीत काँग्रेस चा सुफडा साफ

झाला असून काँग्रेस चे ४१ पैकीं १५ नगरसेवक असताना ही सभापती पदी कोणाची वर्णी नाही. भाजपा ,राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट),एम. आय.एम आणि अपक्ष , प्रहार नगरसेवकाची सभापती पदी निवड झाली आहे. महिला व बालकल्याण सभापती पदी दुर्गा सोनपरोते,पाणी पुरवठा सभापती पदी उपाध्यक्ष खुर्शीदा बानो अत्ताउल्लाशा ,आरोग्य सभापती पदी शमशेर खान बिस्मिल्ला खान ,नियोजन सभापती पदी दर्शना ठाकूर ,शिक्षण सभापती पदी रुखासना बी मो.इसा ,बांधकाम सभापतीपदी दिपाली जवंजाळ अविरोध आहेत.

# राख वाहून नेणाऱ्या सातशे वाहनांची चाके थांबली

## रतन इंडियाच्या धोरणाविरुद्ध तीन दिवसांपासून ठिय्या आंदोलन

### शासन निर्णयाविरुद्ध राबविण्यात आलेली निविदा प्रक्रिया थांबवा

**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-** रतन इंडिया पॉवर लिमिटेडच्या व्यवसायविरोधी धोरणामुळे परिसरातील लघु व सूक्ष्म उद्योजक आणि वाहनधारक संतप्त झाले असून गेल्या तीन दिवसांपासून ठिय्या आंदोलन सुरू आहे. या आंदोलनामुळे राख वाहतूक करणाऱ्या सुमारे ७०० वाहनांची चाके पूर्णपणे थांबली





मार्गदर्शक तत्त्वांच्या विरोधात असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

भारत सरकारच्या विद्युत मंत्रालयाने दिनांक ९ निविदा प्रक्रिया राबविल्याचा आरोप अंबाई ब्रिक्स व ट्रान्सपोर्ट असोसिएशनने केला आहे.निविदेमध्ये सहभागी होण्यासाठी ☞(पान २ वर)

# विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचारी संघटनेची उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयावर धडक

## -प्रलंबित प्रश्नांवर १५ दिवसांचा 'अल्टिमेटम'

**अमरावती/प्रतिनिधीः-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचारी संघटनेने कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित सेवा प्रकरणांबाबत उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयावर धडक दिली. यावेळी सहसंचालकांशी सविस्तर चर्चा करून विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. मात्र आता पुन्हा प्रलंबित प्रश्न मार्गी लागले नाही तर तीव्र आंदोलन करू असा १५ दिवसांचा 'अल्टिमेटम' देण्यात आला. संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे झालेल्या बैठकीत सकारात्मक पाऊल उचलण्यात आले. सेवानिवृत्तीशी संबंधित अडकून ☞(पान २ वर)

■ कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आमचा लढा सुरूच राहील. सहसंचालक प्रशासनाने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता न झाल्यास आम्हाला रस्त्यावर उतरून संघर्ष करावा लागेल.

**- अजय देशमुख,**
अध्यक्ष, विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचारी संघ.



# तिवसा शहरातील पंचवटी चौकाजवळ हरिणाची शिकार!

### नागरिक म्हणतात शिकार बिबट्याने केली तर वनविभागाकडून शिकार कुत्र्यांनी केल्याचा दावा



**तिवसा/प्रतिनिधीः-** शहरापासून काही अंतरावर असलेल्या पंचवटी चौकाजवळील एका शेताच्या परिसरात आज पहाटेच्या सुमारास ३ वर्षीय हरिणाची शिकार झाल्याची बाब उघडकीस आली.मात्र ही शिकार बिबट्याने केली की शेतातील कुत्र्यांनी याबाबत चर्चेला मोठे उधाण आले असून या घटनेला घेऊन स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तिवसा तालुक्यात गेल्या अनेक दिवसांपासून बिबट्याचा वावर वेगवेगळ्या ठिकाणी असल्याची चर्चा सुरू होती. मात्र आता ही चर्चा वास्तवात उतरली की काय? असा प्रश्न व शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पंचवटी चौक परिसरातील वस्तीमध्ये हरणाची शिकार केल्याची घटना समोर आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पंचवटी चौक परिसरालगत जुना टोल ☞(पान २ वर)

# आर्वीत 'सायको'चा रक्तपात

## भाजी बाजारात दोन वृद्धांची निर्घृण हत्या

### -आजीचा गळा आवळून ठार मारण्याचा प्रयत्न






**वर्धा/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील आर्वी शहरात बुधवारी (दि. २१) सकाळी मानसिक आजाराने ग्रस्त २२ वर्षीय तरुणाने शहराच्या मध्यवस्तीत अक्षरशः हैदोस घालत दोन निष्पाप वृद्ध नागरिकांची निर्घृण हत्या केली. इंदिरा चौक, भाजी बाजार आणि आसपासच्या वॉर्डात घडलेल्या या रक्तरंजित घटनेने संपूर्ण शहर सुन्न झाले असून नागरिकांच्या मनात भीती, संताप आणि अस्वस्थता दाटून आली आहे.

मथुरेश गजानन लाडके ऊर्फ मत्या (वय २२, रा. नेताजी वॉर्ड) असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी मानसिक आजाराने ग्रस्त असून त्याची औषध संपली होती, त्यात त्याने बुधवारी सकाळी त्याची आजी वत्सलाबाई सोबत घरगुती वाद झाला. वाद इतका टोकाला गेला की त्याने आजीचा गळा आवळून ठार मारण्याचा प्रयत्न केला. नागरिकांच्या आरडाओरडीनंतर तो तेथून पळून गेला, मात्र त्यानंतर जे घडले, ते आर्वीच्या इतिहासात काळा दिवस ठरला.

बुधवारी सकाळी सुमारे ८ वाजताच्या सुमारास आरोपी नग्न अवस्थेत नेताजी वॉर्डात फिरताना दिसला. राजू गुप्ता यांच्या घरासमोर अंगणात खेळत असलेल्या आठ वर्षांच्या चिमुकलीवर त्याने अचानक हल्ला चढवून गळा दाबण्याचा प्रयत्न केला. क्षणात किंकाळ्या उठल्या. नागरिक धावले. मुलगी कशीबशी सुटली; पण तिला वाचवण्यासाठी गेलेल्या एका व्यक्तीवर आरोपीने ☞(पान २ वर)